किरकोळ अंकास........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10... 4 a.
Repetition pe line 3as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 4 NOVEMBER 1889 NO. 42

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख ४ माहे नोवेंबर सन १८८९ इ० अंक ४२

### गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समइ पतन होते-परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस अहे त्यांनीं अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

### अन्न पचन होण्याचें औषध.

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमूत्र साफ होत नाहीं, पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, पळभागांनें श्वास थांडेरे रगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्यांनें पाकवडी औषध घ्यावें एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डांक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

### AKOLA MEDICAL & SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

### अकोला मेडिकल आणि सर्जिकल होल

आह्मीं येथें पेठेंत लोकांच्या सोई करितां दवाखाना काढिला आहे येथें सर्व रोगांची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय, मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळातीणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल्. एम्. ॲन्ड् एस्.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टीक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा कल्प आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक, दंतशाण, हीं औषधें मिळतील.

### बिरार हॉर्स ॲन्ड कॅटल शो.

वऱ्हाडांतील वार्षिक घोड्यांचे व इतर गुरांचे प्रदर्शन येत्या २१,२२ व २३ तारखेस उमरावती येथें मे० कमिशनर साहेब बहादूर यांचे अध्यक्षते खालीं अंबा यात्रेचे संबंधानें होईल. ६५० रुपयांचीं अगर या पेक्षां जास्त रुपयांचीं इनामें वाटलीं जातील. आणि खरोखर प्रदर्शना करितां आणिलेल्या जनावरास प्रदर्शन होई पावेतों फुकट गवत दिलें जाईल.

J. Cooper Exquire.
Veterinary Superintendent
H. A- D.
Honorary Secretary
Berar Horse and Cattle Show.

### नोटीस

पेठ देऊळगांव व चिखली वगैरे ठिकाणचे साहू लोकांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं राजे बाजीराव देऊळगांव संस्थानचे मालक हे अज्ञान आहेत त्यांचें पालन व त्यांच्या इस्टेटचा वहिवाट आह्मी मातुश्री व आजी राणी अहिल्याबाई साहेब असे उभयतां मिळून करित आहोंत. मागें सावकार लोकास दस्तऐवज वगैरे उभयतांच्या सहीनें करून दिले आहेत अशी वहिवाट ता० ११ ९ ८९ इ० पर्यंत होती या दिवसांपासून राणी अहिल्याबाई साहेब यांनीं आपले गैरकायदेशीर ठरविलेले मुखत्याराचे मारफतीनें एकट्याचे नांवानें वहिवाट चालविण्याचा सुरू करून अज्ञानाचे व संस्थानचें नुकसान करण्याचें आरंभिलें आहे हल्लीं त्यांचे वय वृद्ध झाल्यानें बुद्धीची स्थीरता राहिली नाहीं पाहिजे तिव्हां पाहिजेती गैरशिस्त आणि नुकसानीची कामें करितात तरी ता० ११-९-८९चे पुढें आमचे संमती वांचून आमचे परवानगी शिवाय एकटे राणी अहिल्याबाई साहेब यांस किंवा त्यांचे तर्फेनें कोणतेही मुखत्यारास नवीन कर्ज कोणी देईल किंवा पूर्वीचें कर्ज रुजूं करून घेईल किंवा कोणता एखादा करार करतील तर त्याजबद्दल संस्थान व अज्ञान जबाबदार होणार नाहीं याचा परिणाम खास खुद्द राणी अहिल्याबाई यांचे जातीवर राहील.

याची पत अशी गैरशिस्त व्यवस्था न करण्यासाठीं राणी अहिल्याबाई साहेब व त्यांचे मुखत्यार यांस पाहणगास पाठविली आहे कीं त्यांनें असें करू नये केल्यास ते खुद्द किंवा राणी अहिल्याबाई साहेब यांचे जातीवर बोजा राहील कळावें ता० १२ माहे सप्टेंबर सन १८८९ इ०

(सही)
घनःशाम त्रिंबक कुळमुखत्यार
निशाणी राव जगदेव राजे
बाजीराव अज्ञान पालनकरणार राणी कोंडाबाई
साहेब.

### नोटीस

पारवती भर्द रुंजाजी बुगदे राहणार मौजे बऱ्हाडी तालुके जळगांव जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तूं तारीख १७ अक्टोबर सन १८८९ इसवीचे शुद्धवऱ्हाडी वर्तमानपत्रांत नोटीस दिली ती पावली त्यांतील लिहिलेला मजकूर अक्षरशः सर्व खोटा आहे. ह्या नोटिशीपूर्वी बहुत वेळां व ही नोटीस पावल्यावर तुजला आणण्याकरितां तुझे बापाचे घरीं आह्मी आलों परंतु तुझे व तुझे बापाचे मनांत तुजबद्दल पैसा घेऊन दुसरा नवरा करावा असें आहे ह्याकरितां तूं येण्याचें व बापानें पाठविण्याचे नाकारलें सबब ह्या कामांत तुजला नांदविण्याबद्दल माझी हयगय नसून सर्व हयगय तुझी व तुझ्या बापाची आहे. करितां खर्चाबद्दल मी जबाबदार नाहीं. आतां ह्या नोटिशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझे घरीं येऊन संसार नायकाचे रीतीप्रमाणें करावा नाहींतर ह्या कामीं मजला कायदेशीर रीतीनें काम करण्यास जो खर्च लागेल त्याबद्दल जबाबदारी तुह्मां उभयतांचे शिरावर नोटिशीचे खर्चासुद्धां राहील कळावें तारीख २९ माहे अक्टोबर सन १८८९ इसवी

(सही)
रुंजाजी वल्लद येकोजी बुगदे
राहणार मौजे खडाळ तालुके
आकोट जिल्हा अकोला
निशाणी खुद्द हात नी.

### पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम सस्ती तारीख २९।१०।८९ इ०

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

सिर साष्टांग नमस्कार वि० वि० शेवसी चार ओळी पाठविल्या आहेत त्यांस सुंदर पत्रीं जागा मिळेलच. अलिकडे हवेंत बराच थंडावा आहे. मागील आठवड्यांत पावसानें बरीच धामधूम केली. गांवांतून हिवतापाचा आजार बराच पसरला आहे.

दिवाळीचा सण आनंदानें झाला. येथें दिवाळींत मनुष्यांचे अंगावर नेट फटाके उडविण्याची फार वाईट चाल आहे ती बंद करण्याकडे गांवच्या मुख्यांनीं लक्ष्य दिलें पाहिजे.

येथील सरकारी मराठी शाळेची वार्षिक परीक्षा चालूं महिन्याचे १८ वे तारखेस झाली. सुमारें दीडीच महिने अगाऊ झाली, तरी शाळेचा रिझल्ट फार उत्तम झाला. मास्तरची शाळेची दप्तरची वगैरे स्वच्छता व टापटीप पाहून साहेब बहादूर फार खुष झाले हे लिहिण्यास फार आनंद वाटतो.

मास्तरानें मुलांकडून कसरत वगैरे नानाप्रकारचे खेळ "ऑ" साहेबांस दाखविले ते पाहून सर्वत्रांस संतोष झाला.

परीक्षे करितां भाऊ साहेब सब-डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर साहेब आले होते. त्यांची रहाण्याची सामानसुमान आणून देण्याची वगैरे सरबराई मास्तर लोकांसच करावी लागली, या विषयीं फार दिलगिरी वाटते.

आह्मां ग्रामस्थांचे नशिबानें या शाळेवर मास्तर उत्तम स्वभावाचे सुशिक्षित मिळाले आहेत त्यांस चांगली मदत देऊन आपला फायदा करून घेण्याची कोणीही संधी दवडूं नये.

आपला
गांवांतील "क्ष"

वऱ्हाडसमाचार.

मिति कार्तिक शुद्ध १२ शके १८११

### सेशन खटले.

मागें सेशन ता० २१ पासून सुरू होऊन ता० २४ रोजीं संपले. या सेशनांत एकंदर चार मुकद्दमे निकाल झाले. यापैकीं एक अकोले जिल्ह्यांतील असून बाकी तीन बुलडाणें जिल्ह्यांतील होते या चार पैकीं अकोल्याजिल्ह्यांतील जामोद येथील गंग्या नांवाच्या कैद्यास ३ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली व बुलडाणें जिल्ह्यांतील तीन मुकद्दम्यापैकीं दोन मधील आरोपी दोषमुक्त ठरून एका मुकद्दम्यातील आरोपीस जन्म ठेप झाली. बुलडाणें जिल्ह्यांतील जे तीन मुकद्दमे आले होते त्यांतील झालेल्या चौकशीवरून व सेशन कोर्टात आलेल्या पुराव्यावरून असें स्पष्ट दिसून येते कीं पोलिसाच चांगल्या अनुभवशीर हुशार व कायदेबाज मनुष्याच्या हातून चौकशी झाली नाहीं व त्यामुळेंच त्या जिल्ह्यांतील दोन मुकद्दमे सुटले असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. शेगांव येथील खुनाचा तपास करण्याकरितां नकारउल्ला पो. इ. मलकापूर याची नेमणूक झाली होती परंतु हे गृहस्थ आधीं अल्पवयी व नवे असून पोलीस कामा

च्या अनुभवाचा बहुतेक यांचे ठायीं अभावच आहे. हे तपासणी करणारे गृहस्थ आपल्या कामाचा भरंवसा आमच्या हाताखालील कान्स्टेबलवर ठेवून आपण स्वस्थ ते लोक काय करीत आहेत ह्याचा तमाशा पहात बसले. ह्मणजे हे तपासाकरितां आपले गांवीं गेल्यावर काय तपस झाला व तो कसा झाला हेहीं त्यांना माहित नव्हते. ज्या खुनाचा तपास करावयास हे गेले होते त्या खुनाची माहिती एखाद्या खुनी मुकद्दम्यांत मुकरर केलेले पंचास जी असेल त्याचपेक्षां कांहीं ज्यास्त यांना होती असें आह्माला वाटत नाहीं. तर इन्स्पेक्टर सारख्या दरजाचे लोक जर इतक्या हलगरजीपणानें काम करतील व गांवकरी लोकांवर किंवा आपले हाताखालील ५-६ रुपयांचे ( कॉन्स्टेबलावर ) शिपायावर भंरवसा ठेवून आपण स्वस्थ गढींत अगर चावडींत झोपा घेत बसतील तर खुना सारख्या महत्वाच्या मुकद्दम्यांतील आरोपीचा शोध क्वचितच लागत नाहील व जरी लागला तरी सेशन कोर्टांत कायदेशीर रीतीने फारच थोडे आरोपी शिक्षेस पात्र होतील. व असा प्रकार झाला असतांना गुन्हेगार लोकांस उत्तेजन दिल्या सारखें होईल तरयाकडे वरिष्ट अधिकारी विशेष लक्ष देतील.

पहिला खटला:—आरोपी गंगु रहाणार जामोद हा जातीचा बारी असून यानें त्याच गांवातील भग्या नावाच्या मुलाचा त्याचे अंगावरील दागिने घेण्याचे इराद्यानें ता. ११ जून रोजीं खून केला. या मुकद्दम्यांत मयताचे अंगावरील दागिने आरोपी जवळ सांपडल्याचा व त्याप्रमाणें आरोपीला प्रत्यक्ष खून करतांना पाहिल्याबद्दलचा त्याच्या मुलाचा पुरावा होता. परंतु मुलाच्या झालेल्या जबान्यांत झालेले बरेच फरक पडल्यामुळें व मयताचे अंगावरील चोटा व जखमा एखाद्या ठिकाणाहून पडल्यामुळें होण्यासारख्या आहेत असें डाक्टरनें सांगितल्यावरून खुनाचा आरोप शाबीत न होतां मयताचे अंगावरील मालाचा गैरशिस्त उपयोग केल्या बद्दल इं० पि० को० कलम ४०४ प्रमाणें त्याला तीन वर्षांचे सक्त मजुरीची शिक्षा झाली.

दुसरा खटला:— आरोपी गुजी मर्द मारोती राहणार भादोलें हिनें भाकरींत कांचेचे तुकडे घालून आपल्या नवऱ्यास मरण किंवा मोठी दुखापत करण्याच्या इराद्यानें त्यास विष प्रयोग केल्याचा तिजवर आरोप होता. परंतु सेशन कोर्टांत जी भाकर आणली होती ती व आरोपीनें आपल्या नवऱ्यास जी भाकर वाढली होती ती एकच आहे किंवा नाहीं अशा बद्दलचा संशय झाल्यावरून व आरोपी व तिचा नवरा व त्याची बहीण यां मधील परस्पर संबंध चांगल्या तऱ्हेचे नसल्यामुळें कदाचित् आरोपीलाच कोणत्या तरी रीतीनें लच्यांत घालण्याचा विचार त्या बहीण भावानी केला असावा असा संशय वाटल्या वरून व पुरावा मजबूत नसल्या कारणानें आरोपीस दोष मुक्त केलें.

तिसरा खटला:— आरोपी फेजू, मारोती, व गंगू या त्रिवर्गांनीं शेळगांव येथील एका गणपत नांवाच्या ८।९ वर्षांच्या मुलाला त्याच्या अंगावरील दोन रुप्याचे कडे अजमासे तोळे वजन १२ घेण्याकरितां त्याचा खून केला. गंगी ही जातीची कोल्हाटीन असून बाकीचे आरोपी तिच्या घरीं बसणाऱ्या उठणाऱ्यापैकीं आहेत. या मुकद्दम्यांत आरोपी मारोती यानें पंचाच्या समोर मयताचे अंगावरील दोन कडे आपले घरांतून काढून दिले एवढाच काय तो पुरावा होता. परंतु या कड्यासंबंधानें पंच लोकांच्या ज्या जबान्या झाल्या त्यावरून कोर्टास बराच संशय आला व पोलिसांनीं कारवाई चांगली केली नाहीं असें वाटलें. वरील पुराव्याशिवाय कोणताही दुसरा पुरावा किंवा आरोपी लोकांचा कायदेशीर कबूल जबाब नसल्यामुळें आरोपींस सोडून द्यावें लागेल.

चवथा खटला:—देऊळगांव येथील एका पटव्याचे पुंजा नांवाचे मुलानें आपल्या जातीच्या माणीक नांवाच्या ८ वर्षांच्या मुलाच्या अंगावरील सोन्याची हासली वजन तोळे २ काढून घेऊन त्याला विहिरींत लोटून दिलें. सदहू आरोपी पुंज्या हा जरा भ्रमिष्ट आहे व याचें वय १६ पासून वीस वर्षांचे आंत आहे यांत मुस्तकीम पुरावा एवढाच होता कीं मयताचे अंगावरील हसली आरोपी याजजवळ सांपडली. शिवाय क्रि प्रो. क. १६४ प्रमाणें स्पे. मा. राजा देऊळगांव याच्या समोर झालेला कबूल जबाब एवढाच काय तो होता. सदरील हसलीच्या पुराव्याबद्दल व स्पे. मा. पुढें झालेले कबूल जबाबाबद्दल या मुकद्दम्यांतील असेसरांना व त्याजप्रमाणें आह्माला बराच संशय आहे. परंतु कोर्टाला तितका संशय न वाटल्यावरून त्यानें केदीस जन्म ठेपेची शिक्षा दिली व तो वेडगळ असल्यावरून आरोपीस कैद्याचे शाळेंत पाठवावें व त्याला दिलेली शिक्षा ही कांहीं अंशीं माफ करण्या बद्दल गव्हरनर जनरल साहेबाकडे लिहिण्याचा विचार आहे. वरील हकीकतीवरून लक्ष्यांत येईल कीं, बहुतेक खून दागिन्या प्रीत्यर्थ होतात व हे दागिने मुलांचे अंगावर घालण्याची चाल असल्यामुळें पुष्कळ अल्पवयीं मुलें आपल्या आई बापांच्या लडिवाळपणास्तव व त्यांच्या बरें दिसण्या करितां अकालीं मरण पावतात तर ह्या गोष्टी बद्दल प्रत्येक आईबापानीं आपल्या मुलाचें अंगावर दागिने घालतांना विचार करावा अशी आमची प्रार्थना आहे.

## पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या रिपोर्टावर स्टेट सेक्रेटरीचा ठराव.

पुष्कळ दिवस वाट पहात असलेला सिव्हिल सर्व्हिस संबंधानें स्टेटसेक्रेटरीचा ठराव एकदाचा बाहेर पडला. कमिशनचे अध्यक्ष सर चार्लस टरनर व इतर सभासद ज्यांनीं आपल्या समोर असलेल्या महत्वाच्या संबंधानें सर्व हिंदुस्थानांतील निरानिराळी मतें ऐकून घेण्यांत पुष्कळ दिवस घालविले व ज्यांना हा रिपोर्ट तयार करण्यांत फार परिश्रम पडून बराच काळही खर्च लागला त्यांना स्टेट सेक्रेटरी साहेबांचा ठराव पाहून सखेद आश्चर्य वाटेल असें वाटण्यास मुख्य कारण हें कीं १८७०च्या अक्टाअन्वयें नेटिव लोकांला कोणत्याही मोठमोठ्या जागा देण्याचा सरकारास पूर्ण अखत्यार आहे ही गोष्ट सेक्रेटरी साहेबांचे लक्ष्यांत आज आली. ही गोष्ट जरत्यांस वेळींच सुचली असती तर कमिशनांतील मंडळीस फुकट श्रम पडले नसते. हल्लीं चालू असलेल्या वहिवाटीप्रमाणें नेटिव लोकांना ज्या जागा मिळतात त्यापेक्षां जास्त दरज्याच्या जागा त्यांस मिळाव्या असा सेक्रेटरी साहेबांचा हेतु असावा असा कमिशनचा समज झाला होता. त्या समजाअन्वयें त्यांनीं अशी सल्ला सुचविली कीं सनदी नौकराकरितां ज्या राखून ठेवलेल्या जागा आहेत त्यांपैकीं कांहीं बिनसनदी नौकरांना ज्या जागा मिळतात त्यांत घ्याव्या व प्रॉव्हिन्शिअल सर्व्हिस म्हणून एक निराळीच काढावी. व ह्या सर्व नव्या जागा नेटिवांसच द्याव्या. स्टॅच्युटरी सर्व्हिस ज्या हेतूनें सुरू केली तो हेतु बिलकुल सफल झाला नाहीं सबब तो बंद करावा. परंतु सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेला जाऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांच्या वयाची इयत्ता १९ आहे ती २३ करावी ह्या गोष्टी सुचवितांना कमिशनांतील मंडळीला आपण आपणावर सोंपविलेलें काम फारच समाधानकारक रीतीनें बजावीत आहोंत असें वाटलें. परंतु सेक्रेटरी साहेबाच्या ठरावांतील माहिती शेरा वाचतांच ही त्यांची भ्रांति निवृत्त होईल. प्रथमारंभीं सेक्रेटरी साहेब स्पष्टपणें ह्मणतात कीं "मोठ्या हुद्याचे जागेला योग्य होण्याला प्रमाण लायकी हेच" हें १८३४ सालीं स्थापिलेले धोरण व जें नेहमीं प्रचारांत सुरू आहे त्या धोरणापासून कमिशनच्या सुचना भिन्न आहेत. तथापि कमिशनच्या सर्वच सुचना झुगारून देण्यांत आल्या नाहींत. कमिशनच्या ह्मणण्याप्रमाणें स्टॅच्युटरी सर्व्हिस बंद केली. सिव्हिल सर्व्हिसच्या परिक्षेला जाणाऱ्या उमेदवारांच्या वयाची इयत्ता २१ पासून २३ पर्यंत केली प्रॉव्हिन्शिअल सर्व्हिसची सूचना मंजूर केली. परंतु सनदी नौकराकरितां ज्या जागा आहेत त्यांतून यांत घेऊं नयेत. तथापि प्रॉव्हिन्शिअल सर्व्हिस मधील लोकांना विशेष लायकी दिसून आल्यास सनदी नौकरांच्या जागा देण्यास हरकत नाहीं. प्रत्येक प्रांताच्या सरकारनें त्या त्या प्रांतात ज्या मोठ्या हुद्याच्या जागा नेटिवांस देण्या सारख्या असतील त्यांची एक यादी ठेवावी. व लार्ड डफरिन साहेबांच्या कारकीर्दींत घालून दिलेल्या शर्तींवर ह्या जागा नेटिवांस देत जाव्या. न्यायाच्या व इतर खात्यांत बिनसनदी नौकराच्या मोठमोठ्या जागेवर नेटिव आहेतच तथापि ह्या खात्यांत ज्या जागा सनदी नौकराकरितां राखून ठेवलेल्या आहेत त्या जागेवर यापुढें नेटिव्ह नेमण्यांत यावे. प्रॉव्हिन्शिअल सर्व्हिस पैकीं सर्व जागा फक्त नेटिवा करितांच आहेत तथापि कांहीं विशेष संबंधानें प्रॉव्हिन्शियल सर्व्हिसच्या मोठमोठ्या जागा नेटिव्हांस देणें अगर न देणें किंवा त्या युरोपियनांस देणें हा अधिकार सरकारकडेस आहे. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा पास न होतां जे युरोपियन प्रॉव्हिन्स सर्व्हिसच्या नौकरींत शिरतील त्यांस कोणत्याही प्रकारचा फायदा नाहीं. कारण प्रॉव्हिन्शिअल नोकरींत पगार पेनशन व रजा वगैरेच्या संबंधानें नेटिवांस जे नियम लागूं आहेत तेच नियम युरोपियनासही लागूं असावयाचे. तसेंच नेटिव ब्यारिस्टर, आडव्होकेट, अगर वकील यां पैकीं जे पसंतीनें हायकोर्टाचे न्यायाधीश नेमले जातील त्यांसच पगार, पेन्शन व रजा वगैरेच्या संबंधानें युरोपियनांस लागणारे नियम लागूं केले जातील. येणेंप्रमाणें युरोपियन व नेटीव यास सारखेच हक ठेविले आहेत. परिक्षा विलायतेस व हिंदुस्थानांत एकाच वेळीं व्हाव्या या संबंधानें कमिशनचे ह्मणणें असें आहे कीं इकडच्या हायस्कुलात व कालेजांत जें शिक्षण मिळतें तें इंग्लंडांतील कालेजांत मिळणाऱ्या शिक्षणाशी ताडून पाहतां फार कमी आहे. ह्मणून ज्यांना इंग्रजी शिक्षण मिळालें आहे ज्याचें वर्तन ठाम बनून गेले आहे, ज्याचे ठायीं कोणतेही चांगलें काम करण्याचे धाडस आहे असेच लोक सिव्हिल सर्व्हिसमध्यें भरती करणें चांगले. जे तरुण युरोपियन परीक्षा पास होऊन इकडे लांबवर येतात त्यांना आपल्या इष्टमित्रांचा व आप्ताचा वियोग सहन करावा लागतो. प्रवासांतील दुःखें व परक्या देशांतील अडचणी सोसाव्या लागतात. असे टक्केटोणपे खाऊन ह्यांचें वर्तन जसें बनून जातें तसेंच इकडच्या उमेदवारांच्या अंगीं येण्याला त्यांनीं विलायतेस जाऊन परीक्षा देणें जरूरीचे आहे. या संबंधानें कमिशन हिंदुस्थान सरकार व स्टेट सेक्रेटरी या तिघांचे मत एकच आहे. परीक्षा हिंदुस्थानांत होण्याची जरूरी नाहीं.

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 4, 1889.

## RECENT LEGISLATION.

Much has been said and written about the Mamlatdar's Indemnity Act. Naturally enough there have been two parties representing two divergent and conflicting interests. One faction of the public represents Crawford to his accomplices while the other represents the Bombay government and its peccant servants the Mamlatdars. The first section longed for the dismissal of the Mamlatdars without any regard to their being thrown overboard all their life time while the other section of the public wished that these criminating persons should be continued in their positions of trust and responsibility as if these men had not done any thing against the sound principles of morality and justice. Between these two conflicting interests the Government of India had to steer clear without committing itself either to one error or the other. Both sides were in the wrong. The sin of corruption was rampant in all the places of the Bombay Presidency where Crawford had any thing to do. This state of things has been in existence for the last 20 or 25 years. Many attempted to eradicate the evil but they failed in their attempts. It was a question of great moment with the responsible head of the Bombay Government how to remove the evil root and branch. The present governor, Lord Reay who, it must be owned, is highly esteemed by the people, found his way to extirpate the sin and he succeeded in doing so. The result was that a very large number of subordinate officials were found implicated. It was discovered that some had committed the crime inspite of their ownselves and others had done it with deliberate motives. Taking the fact of promise of indemnity given to officials into consideration to punish all round equally would have been a fatal error on the part of Government. The middle course was to be discovered and the

legislators did discover it. The idea of compensating the Mamlatdars according to their deserts is an idea that ought to satisfy all parties. The criminating officials are no longer to be continued in office while at the same time they are not to be thrown overboard and have been declared exempt from all sorts of prosecutions whether civil or criminal. This solution of the problem ought to satisfy all reasonable minds. This may now be considered as the last scene of the Crawford drama.

## DISCIPLINE AND MORAL TRAINING IN SCHOOLS AND COLLEGES IN INDIA.

(Continued from our last issue.)

Should any local Government find itself unable to provide the requisite system of training from the funds already available, it should arrrnge either to increase its funds from local sources or following the recommendation of the Education Commission in paragraph 543 of its report, to throw more largely on private enterprise the duty of providing higher education, and thereby set free the money required for training institutions. The proposal to attach normal classes to the larger high schools, though not as satisfactory as the establishment of training schools themselves, is nevertheless worthy of consideration. If it be arranged that such classes shall be attached to those high schools only which are under the care of specially selected and competent masters. As the number of good teachers educated at training institutions increases, it should gradually be made a condition that no uncertificated teacher should be appointed to a Government aided school or college; and the Universities should be invited to make the employment of certificated teachers in unaided schools and colleges a condition of affiliation. Until the supply of training institutions is fully developed, local arrangements should be made whereby provisional certificates of competency to teachers possessing certain educational qualifications may be granted after a sufficient period of probation has been passed, subject to confirmation by the Government Inspector.

13. In the opinion of the Governor General in Council the suggestion (which chiefly affects the larger provinces) contained in paragraph 11 of the letter of 31st december. 1887, that trained head masters should be engaged from England for a definite period of five to seven years in order to introduce and establish a standard of dicipline for the emulation of other schools, is deserving of careful attention. The Madras Government thinks that the teaching staff at colleges should be leavened by a larger proportion of English teachers, who have paid attention to the art of teaching; and, at its request, the Secretary of state will be invited to select ing graduates for educational appointment in India to insist on their possessing experience in teaching. In the North Western Provinces and Oudh the question of employing European masters for a few of the leadidg schools for limited periods is, the Government of India is pleased to learn, under consideration. The Governor General in Council is convinced of the valuable stimulus that the example of good teachers from England would give to schools and he would be glad if the Bombay, Bengal, and Punjab Governments could see their way to giving the proposal their further consideration.

14 There remains the question of the extension of a system of teaching which has a direct bearing upon personal conduct & whether an attempt to effect this extension should be made by prescribing moral text books for schools and colleges.

Having given this important question its fullest consideration, the Government of India is satisfied that the end in view would not be attained by prescribing for use in colleges and schools a treatise on ethics or a book of didactic instruction in the rules and priuciples of conduct. It believes that the careful selection and training of teachers provide the most effectual method of establishing a good moral tone in a school but it also considers that the influence of the teacher may be greatly strengthened and the interests of morality promoted by the use in schools of text books having a direct bearing on conduct, either by means of precept or example. The Government of India understands that this view has commended itself to the Syndicate of the Calcutta University, under whose auspices Mr. Tawney, Principal of the Presedency College, has been engaged to prepare a book of selections for the use of candidates for matriculation. The instructions laid down for, Mr. Tawney's guidence in preparing this book are first, that at least three fourths of the book shall consist of prose taken from authors of the present century; second, that at least one half of the prose portion shall consist of extracts having a direct bearing of conduc either by way of precept or example; and, third, that a similar principle shall be as far as possible kept in view in the poetical selections. Thus, the Calcutta University has already taken steps to give effect to what, in the opinion of the Government of India is the most practical way of introducing moral training into the highest class of Indian schools, and furnishing teachers with the opportunity of imparting instruction in morality and in the principles of natural religion to their pupils. All that remains now to be done, in Bengal, at all events, is to supplement this action of the University by providing for the lower grades of schools, and for each class in those grades suitable text books compiled on similar lines. Similar action in other provinces is equally called for; and accordingly the Governor General in Council desires that each local Government and Administration should take this matter at once in hand; and either by the appointment of a Committee or by employing selected individuals who need not necessarily be officials, or by the offer of suitable prizes, effect a revision of the existing Readers in the direction indicated above, or where necessary procure for use in schools an entirely new set of books compiled on these principles. His excellency in Council will be glad to learn from time to time the progress made in each province in this undertaking.

15. The suggestion enumerated in paragraph 1 of this Resolution, for the improvement of discipline in colleges have received favourable consideration by local Governments and Administrations. In Bombay and the Central Provinces the rule as to weekly meetings of college councils will be adopted. In Bengal and the North-Western Provinces and Oudh the rule is considered unnecessary; and in the Punjab, fortnightly meetings have been prescribed. The rule empowering a principal to expel, rusticate, or fine a schclar is accepted everywhere. The rule giving power to a Professor to suspend a student for a limited time, or to fine him without reference to the Principal is accepted by Bombay, Bengal, and the Central Provinces. In the Punjab it is definitely restricted to students of the Professor's own class; and it is understood that this limitation is also contemplated in the three provinces just mentioned. The Governments of Madras and the North Western Provinces and Oudh favour the autocracy of the principal matters of discipline. The Government of India is content with the measure of acceptance which its suggestions as to colleges have met and does not wish to press them further on the Governments which have not found themselves able to adopt them.

No. 4082 I.—In modification of Foreign Department Notification No. 1385-I. dated 29th March 1889, publishing the Hyderabad Assigned Districts Courts Law, 1889, the Governor General in Council is pleased to direct that after section 22 of that Law the following section shall be inserted:

"22 A. (1) The presiding officer of a Civil Court shall not try any suit or other proceeding to which he is a party or in which he is personally interested.

"(2) The presiding officer of an appellate Civil Court under this Law shall not try an appeal against a decree or order passed by himself in another capacity.

"(3) When any such suit, proceeding or appeal as is referred to in sub-section (1) or sub-section (2) comes before any such officer, the officer shall forthwith transmit the record of the case to the Court to which he is immediately subordinate, with a report of the circumstances attending the reference.

"(4) The superior Court shall thereupon dispose of the case under section 25 of the Code of Civil Procedure.

XIV of 1882

"(5) Notwithstanding anything in any other part of this Law, the Court of the Resident shall, for the purposes of this section and of section 555 of the Code of Criminal Procedure 1882, be deemed to be the Court to which the Judicial Commissioner is immediately subordinate and the Court to which an appeal lies from the Court of the Judicial Commissioner, respectively, and any case which the Judicial Commissioner is precluded by either of those sections from disposing of shall be disposed of by the Resident subject to the rules applicable to a like case when disposed of by the Judicial Commissioner."

X of 1882

The services of Mr. F. L. Petre, Officiating Political Agent of the 3rd Class, and First Assistant and Secretary for Berar to the Resident at Hyderabad, are replaced at the disposal of the Government of the North-Western Provinces and Oudh, with effect from the date on which he may be relieved of his duties.

Mr. J. A Crawford, Officiating Political Agent of the 2nd Class, is posted as First Assistant and Secretary for Berar to the Resident at Hyderabad.

We learn with pleasure from the Bombay Gazette that Mr. Mehdi Ali defends the Native States in a leading article in the current month's issue of the nineteenth century against the attack of Sir L. Griffin. We are glad to see that the enlightened people of the Native States have come to see the mischief done by such reckless speakers as the ex-Agent to the Governor General in Central India. They ought to notice such attacks in time and reply to them. It is only they who can give the most effective reply. The object of men of the stamp of Sir Lepel Griffin is to create in the English mind an impression that the people here, the Princes and ... sants, are all barbarous, so that the great English nation which is responsible for the well being of the teeming millions of India should not prey too curiously into the doings of the officials here and give them a *carte blanche*. The establishment of the Indian Political Agency is doing much to thwart the attempts of these Griffins.

The Pioneer's defence of the Government of India from Mr Bradlaugh's exposure of its breach of faith in misappropriating the Famine Insurance Fund is not merely feeble-it is absolutely idiotic. The paper begins by affecting to doubt the fact of the misappropriation. We feel it would be tantamount to insulting the intelligence of our readers were we to seek to disprove the suggestion by offering even the official proofs of the reality of the original Fund and of the purposes to which it was to be "religiously" applied. Not only does this apologist attempt to justify the action of the Government of India in diverting the Fund to general purposes, but it seeks to throw the responsibility of providing relief in time of famine entirely on local Governments, which we are told must either find the necessary money themselves or seek help from Imperial resources. Now the want of money, as the *Pioneer* must know well has almost invariably been the principal difficulty of the local Governments in undertaking measures of relief during seasons of scarcity. It is as much as they can do in ordinary times to meet local requirements from the funds at their disposal which are being steadily whittled down at each successive revision of the provincial contracts. To except them, then, to cope with a famine out of their own limited resources, while the Government of India is annually swallowing up the special revenue which represents the Famine Insurance Fund is merely to trifle with the question. But it seems we are mistaken. According to the *Pioneer*, the Government of India has for years been applying this fund to opening out land locked districts, which formerly were cut off from the great granaries of India." Does the writer refer to the strategic railways of our North-Western Frontier, to the Madras Harbour defences, and other similar and costly works as contributing to this end? And yet it is these works, which are not in any sense protective of the country from the effects of famine, that have for years been absorbing what was once the Famine Insurance Fund.

NOTICE.

Dr. E. Reilly Civil Surgeon Akola is requested to take notice hereby that he owes the undersigned Rs. 996—12—8 as particularized below:—

Due house rent from 21st January to 31st October 1889 at 60 p. m. 561-4 8.

| | |
|---|---|
| Due on two promisory notes executed by him for Rs. 500 each. | 1000-,,-,, |
| Total | 1561-4-8 |
| Deduct | |
| Amount received on account of house rent by bill for repairs | 164-8-,, |
| In cash up to date | 350-,,-,, |
| | 514-8-,, |
| In payment of the first promisory note | 50-,,-,, |
| Total | 564-8-,, |
| Balance due | 996-12-8 |

and that he will please make it convenient for himself to send the amount viz Rs. 996—12—8 to the under signed within 8 days of the receipt of this notice; failing this the under signed will be constrained to institute a Civil action against him for the recovery of the sum together with interest from the date of expiration of the period allowed by this notice at the rate of 2 p. c. per mensem.

Signed Niamat Khan
Billan Khan
of Khamgaon.

## वऱ्हाड

मि. पिटर, फ० अ० रेसिडेंट, हैद्राबाद हे गेल्या गुरुवारीं हैद्राबादेहून अलाहाबादेस आपल्या नवीन कामीं रुजुं होण्यासाठीं जाण्यास निघाले.

मि. क्रार्फर्ड आपल्या हैद्राबाद येथलि फ. अ. रेसिडेंटच्या जागीं गेल्या मंगळवारीं रुजूं झाले.

कर्नल मेकंझी, जु. क. यांनीं पूर्व आफ्रिकेतील गव्हरनरची जागा कबूल केली, व त्या प्रमाणें ते इकडून लवकरच रजा घेऊन आपल्या नवीन जागीं रुजू होण्यास जाणार. त्यांचे जागीं मि. आनर्ड यांची व मि. आनर्ड यांचे सि० आणि से० नज्जाचे जागीं मि० हुशर यांची नेमणूक होणार असें म्हणतात.

मि. एटकीन हेड मास्तर, आकोला हायस्कूल, यांनीं दोन वर्षांची रजा घेतली व ते लवकरच जाणार. त्यांचे जागीं रा. रा. हरी रामचंद्र रोहणखेडकर बी. ए. यांची नेमणूक झाली व रा. रा. पिटके व डांगे यांची फर्स्ट व सेकंड अ० मास्तरचे जागीं नेमणूक झाली.

## वर्तमानसार.

ब्रह्मदेशाच्या उत्तरेस असणाऱ्या चीन नांवाच्या लहानशा प्रांतांत इंग्रज सरकार स्वारी करणार आहे व त्या संबंधानें बऱ्याच जारीनें तयारी चालली आहे.

इराणचे शहांनीं आणीबाणीच्या प्रसंगीं आपल्या राज्यांतून सैन्यास वाट देण्याचें इंग्लंडाशीं कबूल केलें आहे.

शिक्षणावर नवा कर—बंगालच्या खालील प्रदेशांत दारूच्या भट्या लिलावानें देण्याची पद्धत बंगाल सरकार लौकरच बंद करणार. ह्या मुळें सरकारचें उत्पन्न सुमारें १। कोट रुपये कमी होईल असा अजमास आहे. हें नुकसान शिक्षणावर कर बसवून व दुसऱ्या कांहीं करांनीं भरून काढण्याचा विचार आहे. वरील कर शेतकी पासून जमिनदार वगैरे लोकांस होणाऱ्या उत्पन्नावर रुपयास १ पै प्रमाणें बसविण्याचें ठरलें असून त्या बद्दल बंगाल सरकारनें कलेक्टरांचे अभिप्राय मागविले आहेत. वें० वृ०

जर्मनी सरहद्दीवर कडेकोट तयारी चालूं असल्यामुळें फ्रान्सानेंही आपली फौज वाढविण्याचा झपाटा सुरू केला आहे.

पब्लिक वर्क खात्याच्या सेक्रेटरींनीं ५५ व्या वर्षीं पेन्शन घेतलेंच पाहिजे असें ठरविण्याचें स्टेट सेक्रेटरीच्या मनांत आहे.

डर्बी येथील शर्यतींतील एका घोड्याची किंमत १४,००० पौंड आली हा घोडा अमेरिकेच्या एका सावकारानें विकत घेतला आहे. घोड्याची किंमत १,४०,००० रुपये आजपर्यंत कोणी दिल्याचें प्रसिद्ध नाहीं. संपत्तीचा ज्या देशांत धूर निघत आहे त्यांत सगळ्यांचीच किंमत विशेष!

गिनिया प्रांतांत दोन गोऱ्यांचा खून झाल्यावरून तेथील इंग्लिश अधिकाऱ्यानें रहिवाश्यांवर फार जुलूम मांडला आहे. रहिवाशी व हा अधिकारी यांच्यांत मारामारी होऊन अधिकाऱ्याचे चार लोक मेले व ११ जखमी झाले हल्लीं दंगा बराच शांत झाला आहे.

बरेली येथील एका संस्थानिकाची एक भयंकर गोष्ट पुढें लिहिल्या प्रमाणें प्रसिद्ध झाली आहे ती अशीः—हा राजा तेहरी गांवचा असून त्याच्या हद्दींतून सर्जन हानले एक दिवशीं सहल करीत असतां राजाची व त्याची गाठ पडली. त्या वेळीं हानले साहेबांनीं राजाच्या चाबुकस्वारावर चाबूक ओढला. पण तो चाबूक त्याला न लागतां राजाला लागला. त्या बरोबर राजा खवळून गाडीच्या बाहेर आला व डा. हानले यास शिव्या देऊं लागला इतकेंच नाहीं तर त्यास पकडण्या करितां राजानें आपल्या शिपायास हुकूमही पाठविला. पुढें ते शिपाईही शिव्या देऊं लागले व रस्त्यावर एकच घोटाळा उडाला. माझ्याकडून चूक झाली, मी चाबूक स्वारास मारावयास गेलों तों तुह्मास लागला याबद्दल मला क्षमा करा असेंही दाक्तरानें सांगितलें पण राजा ऐकेना. सरतेशेवटीं साहेबानें गर्दी केल्याबद्दल राजावर फिर्याद मांडली आहे वरील माहिती एकपक्षीय असल्यामुळें त्यावर विशेष भरंवसा ठेवतां येत नाहीं. एका गोऱ्या मनुष्याला व त्यांतून दाक्तरास एखादा राजा त्यांतून लहानसा उगीच शिव्या देण्यास तयार होईल असें वाटत नाहीं.

जुक्तीचे प्रकार—चिपळून येथील आमचा बातमीदार लिहितो कीं, "तेथील कोर्टांत एक दिवाणी मुकद्दमा चालला होता, त्यात एक जुक्तीचा प्रकार बाहेर आला आहे. तो असा कीं, एका ऋणकोनें एका कर्जखात्यांत अमूक रकम ५ वर्षांनीं देऊं असें लिहून दिलें होतें. पण लिहिणाराला 'दादोकता'ची माहिती नसल्यामुळें त्यानें ५ वर्षांनीं या शद्बांच्या जागीं ५ वसानीं, असे शद्ब लिहिले होते. त्याचा फायदा धनकोनें करून घेतला, तो असा कीं त्यानें ५ मागें एकाचा आंकडा घालून १५ केले आणि पुढें 'दि' घालून दिली. आणि मुदत ५ वर्षांची होती ती १५ दिवसांची केली. आणि कोर्टांत फिर्याद ठेविली. कोर्टांत वादीचा दावा बुडवून त्याजवर फौजदारी करण्याचा रुकार दिला आहे, व वादीनें द्यावर अपील केलें आहे अशी गंमत झाली आहे. ठा० अ०

गोऱ्या क्लार्कांवर चोरीचा आरोप अडज्यूटंट जनरलच्या आफिसांतील दोन गोरे क्लार्क डेनिंग अणि ओगागयार्णी इंडियन स्पेक्टेटर पत्राचे मालक मि० मलबारी यांची पुण्याच्या रायल फ्यामिली हाटेल मधून एक पेटी चोरून नेली मलबारी त्या हाटेलांत राहत होते व जे डेनिंग हाही त्या हाटेलांत राहत होतो डेनिंग याच्या कडे गॉग हा आला आणि मलबारी हे निजले आहेत असें पाहून त्यांनीं पेटी लुगावली. ह्या पेटींत ३८२५ रुपयांच्या नोटी होत्या मलबारी यांणीं गलबा केला. त्याच संधीस पोलिसची रौंड चालली होती पोलिसांनीं चोरट्याचा पाठ लाग केला आणि पोस्टा नजीक त्यास पकडलें. नोटाची पेटी नजीक पडली होती. त्यांस पुण्याच्या सिटीमाजिस्त्रेटा पुढें उभे केलें. पेटी चोरल्याचें दोघांनीं कबूल केलें साक्षी पुरावा झाल्यावर माजिस्त्रेटांनीं त्यांस सेशन कमिट केलें. हे बऱ्याच हुद्याचे नोकर आहेत.

कंदाहार पर्यंत आगगाडी करावी कीं नाहीं हें ठरावण्यासाठीं व्हाईसराय साहेब सरहद्दीवर जाणार आहेत. तेव्हां वर्तमान पत्राचा बातमीदार बरोबर असूं द्यावयाचा नाहीं असें त्यांनीं ठरविलें आहे. मध्य आशियेंतला सगळा व्यापार रशियानें गुंडाळून इंग्लिशांच्या तोंडास पानें पुसलीं म्हणून ही रेलवे व्हावी असा एक दिखाऊ बूट आहे. अंदरकी रामजाणें. पण अमीर व अफगाण लोक यांस ही रेलवे आवडेल का?

निजामाचा उधळेपणा महाराणी साहेबांचे चिरंजीव मुंबई इलाख्याचे सेनापती हे हैद्राबादेस गेले होते. तेव्हां त्यांच्या आगत स्वागता बद्दल ५ लक्षावर खर्च झाला आहे. एखादा भिकार युरोपियन गेला तरी त्याचें ही चमचमीत अदरातिथ्य होतें. रेसिडेन्सींतील छोट्या बड्या नोकरांस मेजवान्या देण्यासाठीं सालीना एक लक्ष रुपये उडतात. नोकर लोकांचे पगारही फार अनन्वित आहेत कर्जाचा तर बुजबुजाट आहे. तेव्हां हा गाडा किती दिवस चालेल परमेश्वर जाणें

भाड्यानें बायको देणें— एका चिन्यानें १२० डालर घेऊन आपली बायको दुसऱ्या एका चिन्यास १० वर्षें भाड्यानें दिली होती. ही गोष्ट कोर्टांत कांहीं काम चाललें होतें त्या वरून उघडकीस आली. ह्या खटल्यावर टीका करतांना एक चिनीपत्रकर्ता ह्मणतो चिनांत समुद्र किनाऱ्यांस अशा गोष्टी नेहमीं पाहण्यांत येतात तेव्हां ह्यांत मोठीशीं गोष्ट नाहीं.

दिव्या खालीं अंधेर—पासा शिवाय एका मनुष्यापाशीं दोन ब्रिच लोडर बंदुका असलेल्या निजामाच्या पोलिसांनीं पकडल्या चौकशी वरून असें समजलें कीं त्या बंदुका निजाम साहेबांच्या आहेत. कोणी सोद्यानें त्यांच्या खासगींतून त्या उपटुन नेल्या होत्या. ह्या गोष्टीची निजामास दादही नव्हती. खासा बंदोबस्त आहे कीं नाहीं. शु० शू०

लबाड मडम—भुसावळच्या स्टेशनावर परवां एक मौज झाली. एक युरोपियन मडम नूतन जन्मास आलेलें मूल हातांत घेऊन विश्रांति सदनांत बसली होती. तेथें दुसरी एक युरोपियन लेडी आली; तिणें विचारल्यावरून ह्या मुलाला कलकत्यास पोंचविण्या करितां मी जात आहे असें तिणें तिला सांगितलें पुढें गाडी स्टेशनांत आली, तेव्हां ह्या दोन्ही मडमा प्ल्याटफार्मावर गेल्या. तेव्हां त्या मडमेनें आपल्या सोबतीणीस मूल अंमळ हातांत घ्या, मी सामान घेऊन अशीच येतें असें सांगितलें. त्यावरून त्या भावार्थी बाईनें मूल हातांत घेतलें, व ती येण्याची वाट पाहत बसली; परंतु गाडी निघण्याची वेळ झाली तरी आली नाहीं, ह्मणून शोध करूं लागली तों तिचा कोठेंही पत्ता नाहीं! हें मूल पाप कर्माचें होतें काय न कळे! तें लबाड ह्या बाईच्या गळ्यांत घालुन ती फसवून पार झाली! अर्थातच ह्या बाईला तें तान्हें मूल कलकत्यास न्यावें लागलें! दी० बं०

ब्रह्मदेशांतील मेनगुन नांवाचा राजपुत्र पांदिचरी येथून एका जाहाजांत बसून पळून गेला व ही गोष्ट तें जहाज परत आल्यावर अधिकाऱ्यास कळली!

मुंबईच्या बंदरांत एक टर्कीचें लढाऊ गलबत आलें आहे.

गाडी पूर्ण वेगांत असतां गार्डानें टिकिट तपासावें असा जी. आय पी. रेलवेवरील इन्स्पेक्टरचा हुकूम आहे. असें ह्मणतात. चांगलाच हुकूम!

तात्या भिल्लास फांशीची शिक्षा झाली असें ह्मणतात, दुर्दैव बिचाऱ्याचें!

पोर्तुगालचा राजा ता० १९ मिनहू रोजीं मरण पावला.

हिंदुस्थान संबंधानें रशिया व इंग्लंड यांच्यांत लवकरच समेट होईल असें जर्मनींत सरकारी रीतीनें बाहेर आलें आहे. देव पावला.

५५ वर्षें भरल्या नंतर ते ज्या योग्यतेस व अधिकारास पोंहोंचले असते त्या जाग्याचे पेन्शन क्राफर्ड प्रकरणांतील बडतर्फ मामलेदारांस मिळणार असें ह्मणतात! ठा. अ

काश्मीरचे कृष्णकारस्थान अमृत बझार पत्रिकेनें बाहेर काढलें म्हणून आमच्या सरकारास फार राग येऊन त्यानें वर्तमान पत्रांस बातमी देणाऱ्यांस कडक शासन करणारा एक कायदा नुकताच पसार केला आहे या जुलमी कायद्याचे नुसते शद्ब ऐकले तरी आंगावर काटा उभा राहतो. यांत बातमी देणारास व ती मागणाऱ्या पत्रकर्त्यास सारखीच शिक्षा सांगितली आहे. या शिक्षेस दोन वर्षांच्या कैदेपासून जो आरंभ आहे तो त्याची मजल जन्मठेप काळेपाण्या पर्यंत गेलेली आहे! मेहेरबानी इतकीच कीं, बातमी देणारांस व मागणारांस सरकार एकदम उचलून फांशी देत नाहीं! या कायद्यांत अन्यायाचें बीज तरी कसें रुजलें जातें तें पहा. एकाद्या पत्रकर्त्यास एखादी गुप्त बातमी सांपडली व त्यानें प्रसिद्ध केली तर सरकार कोणास दोषी ठरवून या कडक शिक्षेस पात्र करील याचा नियमच नाहीं. त्याच प्रमाणें एकाद्या पत्रकर्त्यांचें व एकाद्या सरकारी नोकराचें वांकडें असल्यास त्या नोकराच्या मनांत त्या पत्रकर्त्यास खड्यांत घालण्याचा विचार येईल तर तो सहज रीतीनें हें काम करूं सकेल एतावतः कोणत्या ही पत्रकर्त्यानें सरकारी नोकराशीं कोणताही संबंध ठेवूं नये असाच या कायद्यांत सरकारचा हेतू दिसतो.

सरकारी कामदारांनीं कर्ज करूं नये असा सरकारचा नियम असतांही कित्येक कामदार त्या नियमाकडे दुर्लक्ष्य करतात असें सरकारास दिसून आल्यावरून त्या नियमाचा अम्मल जारीनें सुरू करावा असा वरिष्ट सरकारचा इलाख्यानिहायच्या सरकारास हुकूम सुटला आहे. ही गोष्ट क्राफर्ड साहेबांच्या उदाहरणावरून सरकारास आठवली असावी हें तर उघडच दिसतें, तथापि सरकारानें आपल्या नोकरांची विशेष रीतीनें काळजी घेऊन जर हा नियम काढला असेल तर त्यांच्या पगाराचें मानही त्या बेतानें केलें पाहिजे हल्लीं असें आढळांत येतें कीं सरकारचे कांहीं नोकर इतक्या भिकार पगारावर काम करीत असतात कीं, त्यांस आपल्या पोटाची भर्ती करण्या करितां अन्य व्यवसाय करण्याची अवश्यकता पडते एवढेंच नव्हे, पण कित्येक सरकारी नोकरांस उदरपूर्ती करितां गल्लो गल्ली भिक्षाही मागावी लागते! अशा स्थितीतील लोकांस कर्ज होऊं नये असें जर आमचें सरकार म्हणूं लागेल तर त्यांचा निभाव कसा लागावा? या करितां सरकारी नोकरांस कर्ज होऊं नये असेंच जर आमच्या सरकारास मनापासून वाटत असेल तर सरकारानें आपल्या प्रत्येक नोकरास त्याचा, त्याच्या बायकोचा व त्याच्या मुलांचे खर्च त्याच्या पगारांत चालले अशी व्यवस्था केली पाहिजे. नाहीं तर इकडे पगार हातावरोटावर मोजावयाचा व तिकडे कर्ज करूं नका म्हणावयाचें यांत मेळच रहाणार नाहीं. ज्या लोकांस ओझ्यांच्या ओझीं पगार मिळत असेल त्यांच्याच करितां जर हा नियम असेल तर आमचें मुळींच कांहीं म्हणणें नाहीं. पु० वै०

बंगाल्यांतील मणीपूरचें राज्य खालसा करण्याची खटपट चालू आहे. कोणावर पाळी पाळीनें गदा येईल याचा नेम नाहीं.

अमेरिकेंत तारवाच्या घांसण्याचें एक यंत्र एका बाईनें तयार केलें आहे.

चांगल्या बटाट्यांत ७५ भाग पाणी. १९ भाग खळ, २ भाग हाडांमधील तत्व, १ भाग खनिज पदार्थ, १ हिस्सा लांकूड व २ हिस्से तेल असतें. के०

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

मालअखेर " ७ " १८९
किरकोळ अंकास.......................८४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढे दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .......०१

Single copy.......................1as.

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10 .. 4 as.
Repetition pe line 3as.

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR.

VOL XVIII AKOLA MONDAY 11 NOVEMBER 1889 NO. 43

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख ११ माहे नोवेंबर सन १८८९ इ० अंक ४३

## गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेत व मूत्र समई पतन होते-परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात हा रोग ज्यांस आहे त्यांनीं अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डांक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचें औषध.

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमूत्र साफ होत नाहीं, पोट दुखतें. पोटांत वायु धरता, छातींत कफ पित्त होऊन जळजळते, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्यानें पाचकवडी औषध घ्यावें एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डांक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

## AKOLA MEDICAL & SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

## अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल

आह्मीं येथें पेठेंत लोकांच्या सोईकरितां दवाखाना काढिला आहे येथें सर्व रोगांची परीक्षा करून योग्य औषधाची योजना कर ण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळंताणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती तारीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल्. एम्. ॲन्ड एस्.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्तशुद्ध करणारा सार्सापेला, पौष्टीक फास्फरसाच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा कलप आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक, दंतशाण, हीं औषधें मिळतील.

नोटीस.

राजुबाई मर्द नथुसिंग राहणार बावनबीर तालुके जळगांव इस खाली सही करणार यांजकडून देण्यांत येते कीं मयत नथुसिंग यानें ज्या इस्टेटाची तुह्मास विल्हेवाट किंवा दुसरी व्यवस्था करण्याचा अधिकार नाहीं त्या गोष्टी आमचे नुकसान होण्याचे मनांत आणून तुह्मी करण्याचें व छनाडाचे उपाय योजिले आहेत व विल्हेवाट लावण्याचे बेतांत आहा करितां कळविलें जात कीं मयत थुसींग याचे जिनगीचे बाबतींत तुह्मास जितका अधिकार आहे त्यापलीकडच्या गोष्टी आणि छळें न करण्याविषयीं या नोटीशीनें कळविलें आहे सबब तुह्मी तसे करूं नये कळावें. तारीख ५ माहे नोव्हेंबर सन १८८९ इ०

( सही )
भवानसिंग डोंगरसिंग वलद विठ्ठलसिंग दस्तुर भवानसिंग राहणार बावनबीर

जाहिरात

या खालीं सहीकरणार यांजकडून तमाम लोकास कळविण्यांत येतें कीं राजुबाई मर्द नथुसिंग ही आमची भावजय असोन तिचा विचार आमचें नुकसान व्हावें ह्मणून मयत नथुसिंग याचे जिंदगीची अधिकार नात्यानें व्यवस्था लावण्याची आहे. करितां याद्वारें कळविण्यांत येतें कीं आजपासून कोणाही काहीं जिंदगी विकत नये घेतल्यास ते रद्द असून तिचे कृत्यामुळें आह्मावर कोणतीही जबाबदारी नाहीं तारीख ५ माहे नोव्हेंबर सन १८८९ इ०

( सही )
भवानसिंग डोंगरसिंग वलद विठ्ठलसिंग दस्तुर भवानसिंग राहणार बावनबीर.

जाहिरात.

जुना वाडा.

अथवा

श्रीमंत बाजीराव बल्लाळ ( थोरले )

पेशवे

यांचे कारकीर्दीवरील

ऐतिहासिक कादम्बरी

किम्मत दर प्रतिस १२ आणे शिवाय बाहेर गांवास २ आणे टपालहांशील.

( पुस्तकें हल्लीं छापत आहेत. नवेंबर १८८९ अखेर विक्रीस तयार होतील. )

टीप.- नफ्याची रकम येथील कांग्रेसला देणगी ह्मणून देण्यांत येईल.

प्रभाकर लक्ष्मण नागपुरकर
वकील, सोलापुर विजापूर

जाहिरात

येत्या डिसेंबर महे यांत पांचवी नाशनल कांग्रेस मुंबईस भरणार आहे त्याकरितां मुंबई शिवाय इतर इलाख्यांतील डेलिगेटस् व विझिटर्स यांच्या राहण्याची वगैरे सोय कांग्रेसकमिटी करणार आहे. मुंबई इलाख्यांतील डेलिगेट व विझिटर्स यांची सोय जागेच्या संकोचामुळें कमेटीस करवत नाहीं असें समजल्यावरून काहीं सद्गृहस्थांच्या सुचनेवरून तो सोय करण्याचें आह्मी योजिलें आहे. तर ज्या कोणास अशी सोय पाहिजे असेल त्यांणीं आम्हांस नवेंबरच्या ता. १५ पासून २० पर्यंतच आंत काय काय सोई पाहिजेत याची खुलासेवार पत्रें पाठवावीं सदर पत्राबरोबर फी दाखल १ रु. पाठवावा. हा रुपया पुढें हिशेबांत मजरा दिली जाईल. सदर तारखे नंतर आलेल्या पत्राप्रमाणें सोइ करण्यास आह्मी बांधले जाणार नाहीं. पत्र पोष्टपेड व उत्तरास तिकीट पाठवावें कळावें.

तारीख २ नवेंबर १८८९

कृष्णाजी निळकंठ साने.
एजंट पाटणकर आणि मंडळी.
ठाकुरद्वार मुंबई.

वऱ्हाडसमाचार.

मिति कार्तिक वद्य ४ शके १८११.

मुलुख सरकार हैदराबादचा कायदा सन १८८९ यांत खालीं लिहिलेले जास्त कलम घालण्यांत आले आहे.

( १ ) ज्या दाव्यांत अगर दुसरे प्रोसिडिंगांत आपण पक्षकार आहों अगर आपला स्वतःचा काहीं संबंध आहे अशा दाव्याची अगर प्रोसिडिंगाची चौकशी सिव्हिल कोर्टाचे कोणतेही मुख्य अधिकाऱ्यानें करूं नये

( २ ) दुसरे न त्यानें आपण केलेला हुकूम नाग अगर हुकूम याजवरील अपेलाची चौकशी या कायद्याप्रमाणें स्थापन झालेल्या 'सिव्हिल अपिलेट' कोर्टाचे मुख्य अधिकाऱ्यानें करूं नये.

( ३ ) असे अपिल, दावा, अगर प्रोसिडिंग अशा अधिकाऱ्यासमोर आल्यास त्यांनीं तावडतोब सर्व कागदपत्र त्या संबंधाच्या हकीकतीसह वरिष्ट कोर्टाकडे पाठवावें.

[४] असे वरिष्ट कोर्टानें अशा मोकद्दम्याचा निकाल सिव्हिल प्रोसिजर कायद्याचे कलम २५ वीस प्रमाणें करावा.

( ५ ) या कायद्याचे इतर भागांत दुसरे रीतीनें ठरविलें असेल तरी या कलमाकरितां आणि क्रिमिनल प्रोसिजर चें कलम ५२६ या करितां ज्युडिशियल कमिशनरचे कोर्ट अलिशान रेसिडेंट साहेबाचे कोर्टाचे अधिकारा खालीं आहे असें समजलें जावें, आणि त्यानें केलेले हकुमाचे विरुद्ध अपील ही सदर साहेबाचे कोर्टाकडेच चालेल. ज्या गोष्टीचा जुडिशियल कमिशनरला निकाल करण्यास प्रतिबंध आहे त्याचा निकाल, ज्युडिशियल कमिशनर साहेबांनीं करण्यास जे नियम लागू पडतील त्याच नियमांचे आधारें रेसिडेंट साहेबानीं त्याचा निकाल करावा.

## बंगल्या वरील चाकर माणसें.

गोरे लोकांजवळ बंगल्यावर खाजगी कामें करण्या करिता तिदान एक दोन तरी नोकर असतात. ह्या नोकरानां त्यांच्या धन्यानें चांगल्या रीतानें वागविलें असतां ते आपल्या धन्याचें कसें दास बनतात व गाच्या उलट वागणुक मिळाली असतां धन्या पासून सुटका करून घेण्या करितां कशी खटपट करतात या संबंधानें अशा चाकरीचा अनुभव घेतलेला एका इंग्रजी पत्राचा बातमीदार असें ह्मणतो:- साहेब लोकांनीं आणि त्यांच्या मेम साहेबांनीं हा गोष्ट पक्की लक्षांत ठेवावी कीं आह्मी नेटिव नोकर केवळ लहान मुला प्रमाणें असतो व आमच्या मार्गें प्रपंचाचें एवढें मोठें झेंगट असतें कीं, तरा ममतालाणानें जर कां आमच्या धन्यानें आह्माला वागविलें तर आह्मी आमच्या यजमानाला केवळ ईश्वर मानतो. उदाहरणार्थ मुंबईतील भायखळा कडचे रहिवाशी एक बडे डाक्टर घ्या. हे गृहस्थ काहीं कारणामुळें विलायतेस गेले असतां त्यांचे जवळील चाकर आपला धनी येई तो पर्यंत दुसऱ्या कोणाजवळ चाकर राहत नाहींत. कदाचित् दुसऱ्याची चाकरी पतकरलीच तर त्यांची अट अशी- आमचा माय बाप धनी आपल्या बंदरावर उतरतांच आह्मी तुमची चाकरी सोडून जाऊं. असेंच एक युरोपियन हेडमास्तर आहेत. त्यांना सांगण्याचा गरज नाहीं. यांच्या जवळच्या चाकर माणसांस जरी कोणी शिपायगिरी अगर जमादारी देण्याचें कबूल केलें तरी ते आपला यजमान सोडून जाणार नाहींत. शिपाईगिरी ह्मणजे एक मोठा हुद्दा असा या लोकांचा साधारण समज आहे. वरील साहेबांचे एक बंधु मुंबईस प्रोफेसर आहेत. यांच्या घरीं जे हुद्देदार चाकर आहेत त्यांस तेथें चाकरीस राहून आज वीस वर्षें झालीं. सुमारें १९ वर्षां पूर्वीं मुंबईस एक कौन्सिलर होते. यांचे जवळ एकजण सुमारें पंचवीस वर्षें चाकरीस होता. व हा मनुष्य चाकरीवर असतांनाच मरण पावला. पुढें यांचीं मुलेंही वरील साहेबांजवळ राहिल तिथपर्यंत पेन्शन घेऊन जाईपर्यंत. होतीं.

चागले, ममतेनें वागविणार, कदर जाणणार जे गोरे लोकांत सरदार असतात त्यांचे च जवळ नोकर टिकून रहातात. वर सांगितलेलीं उदाहरणें अशाच लोकांची झाली. आतां याच्या उलट कांहीं इंग्रज सरदार बहादुर असे आहेत कीं आपल्या चाकरांना शिविगाळ करणें, त्यांच्या अंगावर चवताळून दात ओठ चावीत धावून जाणें, त्यांना लाथांनीं, बुक्यांनीं, काठ्यांनीं वगैरे खूब झोडपणें हें ज्यांचें भूषण याशिवाय त्यांस चैन पडत नाहीं.

आमच्या ठायीं सदसद् बुद्धीचा वास नसेल. तथापि आपला धनी आपल्याला कसें वागवितो हे जनावरांस देखील कळतें. हिंसक प्राणी देखील ममतेनें वागविणाऱ्या धन्याच्या कह्यात वागतात. तर मग ज्या धन्याजवळ आम्ही चाकरीस राहतो, तो धनी आम्हांस कसें वागवील हें थोड्या दिवसांच्या अनुभवानें समजण्या पुरती अक्कल असलीच पाहिजे. अमुक एक साहेब चांगले वागवीत नाहीं असें लक्ष्यांत आलें म्हणजे ती बातमी एक दुसऱ्या जवळ सांगतो याप्रमाणें ती सर्व चाकरांत पसरते. नंतर ते आपापसांत म्हणतात. गड्यानों आतां या राजेश्रींचा हुकूम मानू नये अगर त्याच्याशीं दांडगाईनें वागावें म्हणजे हे महाराज आपोआप आपल्याला चाकरीवरून दूर करतील. आपण होऊन चाकरी सोडून जाणें बरें नाहीं! तसें केलें असतां चाकरी केल्या दिवसाचा पगार आपणास मिळणार नाहीं. विनाकारण आपलें नुकसान आपल्या हातानें करून घेणें ठीक नाहीं. असा एकदां त्यांचा कट झाला म्हणजे वरील प्रमाणें वागण्यास एकएकच सुरवात करितो. साहेबाची मर्जी खपा होते. परंतु या मंडळीस संतोष होतो. कारण रागाचे झपाट्यांत साहेब याना चाकरी वरून काढून टाकितात, या गृहस्थाची कटकट आयतीच चुकते. व आपल्या देशीं जाऊन स्वस्थपणें दिवस आनंदांत घालवितो.

आमच्या देशांत आलेल्या साहेब लोकांस चांगले इमानी, विश्वासू चाकर ठेवण्याची इच्छा असेल तर त्याना फार पैसे खर्च करणें नको किंवा त्यांची मनधरणी करणें नको. फक्त त्यांनीं कांहीं गोष्टी जरूर लक्ष्यांत ठेवाव्या. त्या ह्या कीं एखादा चाकर ठेवला आणि त्याला जर फक्त बायको आहे पण मुलें वगैरे नाहींत तर त्याला बायकोसाठीं दिवाळीचे वेळीं दोन किंवा चार रुपये किंमतीचें लुगडें इनाम दिलें म्हणजे झालें तो तें उपकार नेहमीं स्मरतो. बायको असून मुलें बाळें ही असलीं तर मधून मधून त्यांना खाऊ देत जावा. जर त्याचें लग्न झालें नसेल तर लग्नासाठीं जर कां त्याला पन्नास पाऊणशें रुपये दिले तर झाला गडी खुष. जर त्याचे हातून एखादा अन्याय घडला तर त्याचे अंगावर रागानें चवताळून न जातां त्याला आपल्या जवळ बोलाऊन त्याचें काम काय व तें बजावण्यांत त्याची काय चुकी हे त्यास चांगलें समजाऊन सांगावें. जर त्याचे हातून गैरसावधपणामुळें तुमचें एखादें भांडें कुंडें फुटलें तर त्याला मारठाण करूं नका अगर दंड हा करूं नका. परंतु त्याला त्या भांड्याची मूळ किंमत काय व फुटल्यामुळें नुकसान काय झालें हें सांगा व त्याचा अपराध क्षमा करा. मग पहा तो तुम्ही केलेली क्षमा रात्रंदिवस विसरणार नाहीं.

या देशांत प्रथमतः जे आर्य लोक आले. व वसाहत करून राहिले त्यांनीं या देशांतील मुळच्या रहिवाशांना याप्रमाणेंच ममताळूपणानें वागवून अगदीं आपलेसें करून टाकिलें. तमच्या पहाण्यांत असेल कीं पुष्कळशा गावांत पिढीनपिढी जे कोणाची नोकरी बजावीत आहेत त्यांना जास्त वेतन देण्याचें जरी कोणी कबूल केलें तरी ते आपल्या धन्याची चाकरी सोडून नवा धनी करीत नाहींत. आतां आमच्या इकडच्या कांहीं गोऱ्या लोकांची काय स्थिती आहे कीं ते जिकडे जिकडे जातील तेथें त्यांना कडक अंमल बसवावासा वाटतो. आपल्या राज्याची बळकटी म्हणजे इकडच्या लोकांना आपली तख्यत गाढवासारख्या निमूटपणानें सोसायला लावणें असा त्यांचा समज ते असें समजतात कीं हा देश जो हस्तगत झाला तो राजकीय कावण्यानें नाहीं तर तरवारीचे जोरावर. गड्यानों कोंवळ्या वाढत्या रोपावर जर दगड ठेवला तर तें वाकतें व त्याला पानें फुटून येऊन त्याचें सुरेख झाड बनत नाहीं हे तुम्ही विसरतां हे ठीक नव्हे!

यंदा मुंबईस भरणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या समारंभाची तयारी बहुतेक आटोपत आली आहे. भायखळ्यास एक मोठें विस्तीर्ण पटांगण भाड्यानें घेऊन त्यावर मंडप उभारला आहे. या मंडपांत सभेचें काम चालणार. येणाऱ्या पाहुण्यास उतरण्यासाठीं तीन ठिकाणीं सोई केल्या आहेत. प्रेमचंद भाईच्या ताब्यांतील इस्पिताळच्या जागेंत, त्यांच्या बंगल्यांत, व मंडपाजवळ दिलेल्या तंबूत मिळून सुमारें ६०० लोकांची उतरण्याची सोय आहे प्रथक प्रथक जातींच्या लोकांना खाण्यापिण्या संबंधानें जशी व्यवस्था पाहिजे तशी केली आहे. साहेब लोकांना व साहेबी थाटाचा अन्नव्यवहार ज्यांस पाहिजे आहे त्यांना प्रत्येक दिवसा बद्दल प्रत्येक इसमा मागें दोन रुपये द्यावे लागतील. देशी चालीं प्रमाणें राहणाऱ्या लोकांस प्रत्येक इसमास फक्त चार रुपये सहा दिवसा बद्दल द्यावे लागतील. या व्यवस्थेचा एकंदर सर्व खर्च ४०,००० रुपये पडेल असा अंदाजा आहे. या पैकीं हजार रुपये येणाऱ्या डेलीगेटांच्या फी पासून उत्पन्न होतील. प्रत्येक डेलीगेटास फी आठ रुपये ठेविली आहे. बाकीची रक्कम वर्गणीनें जमा होत आहे. मि. ह्यूम साहेबांचा असा मानस आहे कीं यंदा सभेनें हातीं घेतल्या विषया पैकीं फक्त एकाच गोष्टीचा पूर्ण विचार करावा. चहोंकडे बखोरल्यानें सर्वच कामें अर्धीं होऊन फार श्रम होतात. ही सूचना मान्य झाल्यास पोलीस, आबकारी, वगैरे गोष्टी एकीकडेस ठेवून फक्त कायदे कौन्सीलच्या संबंधानें विचार होईल. सभा दर वर्षीं न होतां प्रत्येक पांचवें वर्षीं व्हावी अशी एक सूचना आहे.

सदरहू सूचना केवळ पैशाच्याच दृष्टीनें पाहिली असतां कदाचित् बरी वाटेल परंतु इतर कारणांचा विचार केला असता पांच वर्षांनीं सभा भरणें आजकालच्या स्थितीस कांहीं योग्य नाहीं पांच वर्षांच्या ऐवजी तीन वर्षांची मुदत करावी असें आह्माला वाटतें. कारण एवढा मोठा काळ गेल्यावर सभेसंबंधानें लोकांच्या अंगीं शिथिलता बरीच उत्पन्न होईल. हल्लीं एक वर्षाचा जरी काळ आहे तरी देखील दरसाल लोकांना जागृत करावें लागतें. फार लांब कशाला आमच्या वऱ्हाडांतच अद्याप निवडणुकीचें काम सुरू झालें नाहीं व इतकें दिवस कांग्रेस कमिटीला जागृत करितां करितां आतां कोठें मंडळी कामास लागली आहे या वर्षीच्या सभेचे प्रेसिडेंट मि० वेडरबर्न साहेब होणार आहेत असें समजतें व गुदस्ताप्रमाणें या सुमारास सामाजिक सुधारणेची सभाही भरली जाईल.

ता. २७ दिजंबरपासन सभेच्या कामास सुरवात होऊन काम ४ दिवस चालेल. मागचे वर्षीं मुसलमान मंडळीनें सभा उलथून पाडण्याचा विचार केला होता म्हणून मागले सालीं सभेस डेलीगेट यंदाच्या दुप्पट होते. ती भिती यंदा नाहीं.

नोटीस.

सिताराम वलद घहाद्राजी अमनकार रहाणार मौजे लोंधवाडे यास खालीं सही करणार नोटिशीचा जबाब देतो कीं तुम्ही तारिख १९ माहे अक्टोबर सन १८८९ इसवीचे वैशंपे वर्तमान पत्रांत नोटीस दिली पावली त्यांत तुम्ही सर्व लबाडीचा मजकूर लिहिला आहे माझी बायको ती तुमची बहीण ही तुमचे घरी पांच वर्षांपासून आहे म्हणोन लिहितां फार आश्चर्य आहे. अशी बायको दिल्यानें फारकत मिळत नसते. मी जें दुसरें लग्न केलें हें तुमचे बहिणीस फारकत देऊन सोडण्याचे हेतूनें केलें नाहीं. दोन्ही बायका वागविण्याचे हिंमतीनें केलेलें आहे हे पक्कें लक्ष्यांत ठेवावें. लग्न झाल्या पासून तुमची बहीण आह्मी वागवीत नाहीं अशा कारणानें आजपर्यंत तुमचे घरी कधींच राहिलेली नाहीं. जगरुढी प्रमाणें माहेरी म्हणून तुम्ही जेव्हां जेव्हां घेऊन गेले तेव्हां तेव्हां राहिलेली आहे शिवाय दुसरे कारणानें कधीच राहिलेली नाहीं. माझे घरी तिजला ज्वर येऊ लागला होता तेव्हां तुम्ही आपले घरीं नेलेली होती तेव्हांपासून मी पुष्कळ वेळां नेण्यास आलो परंतु तुम्ही पाठवीत नाहीं हे तुम्हांस योग्य नाहीं ही नोटीस पावताच आमचे घरी तुमचे बहिणीस आणून घालावी याप्रमाणें तुम्ही करणार नाही तर तुम्हीच अपराधी व्हाल अशा खोटे मजकुराची नोटीस दिल्यानें लग्नाचा हक्क उडत नाहीं हें पक्कें समजावें. कळावें तारीख ७ माहे नवेंबर सन १८८९ इ०

(सही)

सिताराम वलद सखाराम भगत.

नोटीस.

रा. रा. खंडू रामजी माळी रहाणार मौजे नायगांव तालुके मलकापुर यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे कडेस आमची ज्वारी कसबे वडनेर भोलजी येथील मापाची एक खंडी १ हिशेब करून निघाली ती दर खंडीस ५० रुपये भावा प्रमाणें तुम्ही कबूल करून मिती कार्तिक शुद्ध १ संवत १९४६ देण्याचा करार केला असून अद्यापपर्यंत सदरहु रुपये दिले नाहींत करितां ही नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसाचे आंत तुम्ही वरील रुपये आणून देऊन पावती घ्यावी. नाहींपेक्षां दर खंडीस रुपये ६० प्रमाणें भाव व या नोटिशीचा खर्च दावा करून भरून घेतला जाईल हे ह्या नोटिशीनें अगाऊ कळविलें. आहे. कळावें. ता. ९ माहे नवेंबर सन १८८९ इ०

(सही)

गणपत रंभाजी माळी वडनेर भोलजी ता० मलकापूर दस्तुर खुद्द.

नोटीस.

रा. तुकाराम वलद मुकुंदा माळी चोपडे राहाणार मौजे कोलासर तालुके मलकापूर यांस खालीं सही करणार यांज कडून नोटीस देण्यात येते कीं माझी धाकटी बहीण नामें मालन ही तुमचा धाकटा मुलगा नामें कृष्णा यास दिली असून लग्न वगैरे होऊन बरीच वर्षे जाहाली आहेत परंतु लग्न होण्याचे पूर्वी व लग्नांत आपसात तंटा जाहाल्यामुळें बेबनाव जाहला त्यावरून तुम्हीं माझे बहाणीस तुमचे घरीं असतांना अगदी त्रासून सोडलें व चांगल्या रीतीनें वागविलें नाहीं हल्लीं तीन वर्षांपासून तिजला न वागविता आमचे घरी लाऊन दिली आहे आम्हीं घेऊन जाण्या विषयीं बरेंच वेळा म्हटलें परंतु तुम्हीं नेलें नाहीं करितां दरमहा रुपये ५ प्रमाणें तिचे अन्नवस्त्राचें तीन वर्षांचे एकूण रुपये १८० रोख देऊन पावती घ्यावी व पुढच्याही खर्चाची सोय करावी नाहींपेक्षां रीतीप्रमाणें कोर्टातून सर्व खर्चासुद्धां घेतले जातील दुसरें याच मुद्दयावर तुम्ही रा. खंडुमाळी नायगांवकर याची मुलगी नामें नायजी ही गंधर्वानें सवत केली आहे असें न करण्याविषयीं व माझे बहिणीस वागविण्याविषयीं वडनेर व नायगांव येथील पंचामार्फत सांगितले तथापि तुम्ही न ऐकतां फारकत गंधर्व लागल्यावर देतो म्हणून सांगितलें. व त्याप्रमाणें गंधर्व करून घेऊन फारकत अजून दिली नाहीं व या बद्दल सदरील पंच मंडळी साक्षीदार आहेत. आतां असें ही कळवितो कीं सदरील १८० रुपये व फारकत नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत द्यावे असें न केल्यास जाती रिवाजाप्रमाणें आह्मी मुलीची व्यवस्था करून मग तुमचा कोणचेही प्रकारचा हक्क संबंध राहणार नाहीं व त्याबद्दलही आम्ही जबाबदारही धरले जाणार नाहीं. करितां या नोटिशीनें कळविलें आहे. कळावें ता. ९ माहे नवेंबर सन १८८९ इ०

[सही]

गणपत रंभाजी माळी राहणार वडनेर भोलजी ता० मलकापुर दस्तुर खुद्द.

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 11, 1889.

## THE IZARDARS AND THEIR GRIEVANCES.

The rights of the Izardars seem to be very much disputed of late. Most of the Izardars happen to be in the Wun District and it is there that their rights appear to be questioned. The right of cutting wood on their Izaras and the right to allow cattle to graze on their estates are some of their rights that are disputed. The old Kowls and the new Kowls are the two kinds of leases under which the Izardars hold their Izara

lands, and there is nothing to show in the documents securing the estates to the Izardars that the Government specially reserved any of these rights to themselves. The lands are given to them and in the absence of any conditions setting limitations upon their rights the Izardars would appear to be *prima facie* absolutely entitled to everything appurtenant to the land. Holding of immoveable property always carries with it the trees growing upon such property as also the right to graze cattle and in short to do anything not inconsistent with the tenure under which the property is held. This being the case why any restriction is now tried to be placed on these unquestionable rights of the Izardars, we cannot understand.

The present Deputy Commissioner of the Wun District would appear to have notions with regard to the rights of Izardars which at least to us do not appear to be consistent with any reasonable interpretation of the leases granted to Izardars by Government. He seems to think that the Izardars have no business or right to fell trees on their ground and specially teak wood. Of late there have been prosecutions under the Forest rules under the Deputy Commissioner's orders. One of them a very noticeable case went up in criminal revision before the principal High Court and the decision of the two lower Courts was upset. The facts are briefly these:— The Izardar of Durgada an old Kowl Izara cut certain teak trees on his Izara with a view, it is said, to take them away to another Izara village of his but as he alleges with a view to local use. The teak wood logs were attached by a Forest officer and under the Deputy Commissioner's orders a prosecution was started against the Izardar. The Tahsildar fined the Izardar 150 and the Deputy Commissioner who had ordered the prosecution of the Izardar himself tried the appeal and reduced the fine by one half The case went up to the High Court and the conviction was set aside on a technical point, viz, that the prosecution was started after six months from the time the teak was noticed. The High Court however expressed an opinion and we think very correctly that in its opinion the Government had no rights reserved to it in the forests or trees on the Izara villages. The case has been sent back for being tried under a section of the Penal Code regarding the disobedience of an order *lawfully* promulgated by a public servant.

This is only one of many such cases and on the final determination of the issue involved in the decision of the case depends the fate of a great many Izardars and we think both the Izardars and Government ought to spare no pains to get a final solution of the question involved in this case by employing such legal talent as may be available.

We think the Forest rules do not at all apply to teak or any other kind of wood on Izara villages. The rules describe the Forests to which they are applicable and the only kinds of forests which are within the purview of the rules are (1) forests *wholly* belonging to government; (2) forests belonging to government but in which individual persons or bodies of persons have proprietary or other rights; and (3) forests owned by individuals in which Government have forest rights. The very next section says all other forests except those mentioned above are *absolutely* at the disposal of the owners. That being the case we have to see under which of these three heads, if any, do the Izara forests or trees come. The Deputy Commissioner would seem to put them under the third heading; that is to say he would maintain that Government has forest rights in the Izara trees. Now what is there to show that Government *has* reserved these rights in trees in Izara villages. It is for the Deputy Commissioner to make out as best as he can that the rights have been so reserved by Government. Unless this is shown the case for Government appears hopeless. The Kowls under which the Izaras are held and which are the best repositaries of the rights of Government so far as the Izaras are concerned, certainly do not reserve this right. The forest rules again came into existence long after the Izaras and they could not possibly have any retrospective effect. The rights of Izardars previously obtained could not be overridden by rules which came subsequently into force, even on the assumption that the Forest rules can possibly be interpreted so as to have any application to the Izara trees.

But we wonder why there should be such a particular anxiety about preserving wood on the Izara lands. The Izardars know their own interests better than Government and they can certainly be credited with an amount of sense which might exclude the possibility of any wanton destruction of the wood on their estates to their own detriment. But supposing for a moment, that they did so, how could Government be a loser if the Izardars were the owners of the trees and chose to destroy them.

We do not know what the Izardars' Association which we think has been specially formed with a view to represent their grievances to Government has been doing. Bodies like this and the local Sarvajanik Sabha ought to take up this and similar questions. Where is the good otherwise of such institutions.

In the new revenue Code which is being circulated with a view to obtain opinions regarding it, a chapter on Izaras could, we believe, be added with advantage. It is not safe to leave a wide latitude to the Deputy Commissioner in the matter of interpreting rules in connection with such important rights of a body like that of the Izardars and the sooner the rules on the subject are cleared up and systematically codified the better. The dissatisfaction caused to a great many landholders deserves to be removed by a blow at the very root of all this evil.

---

We are glad to announce that Mr. Hari Ramchandra Rohinkhedker B. A. the first assestant master in the Akola High school has been appointed officiating Head master in consequence of two years' furlough that has been granted to Mr. Aitken, head master Akola High school. We firmly believe that Mr. Rohinkhedker is a man of wonderful energy. If he makes a right use of the stock of energy he is possessed of, the Akola High school will, no doubt, occupy a conspicuous position in all the educational institutions of Berar. Two years is a considerably long period during which Mr. Rohinkhedkar will, we earnestly hope, establish his claims to the Permanent Post by relieving the position of the High school to which it has been reduced under the regime of Mr. Aitken This could only be effected by securing the intelligent and hearty co-operation of his tried assistants. The present chance that has been justly given to Mr Rohinkhedkar will give him a fair opportunity of showing that he is not only useful in the educational line but would have been equally or more useful in the Revenue department to which his claims have not been hither to fairly recognized.

## CORRESPONDENCE.

Ellichpur, Berars
6th November 1889

To
The Editor of "Berar Samachar"

Please insert the following lines in a corner of your valuable journal.

*National Congress*— A large and influential meeting was held in the city of Ellichpur on 5th November 1889 for the purpose of electing delegates to attend at the ensuing national congress to be held in Bombay in the month of December next. Printed invitations were issued and circulated by the secretaries of the congress divisional Committee of this District announcing the object of the meeting and the time at which it was to be held. About 700 people consisting of Inamdars. Jagirdars, Deshmukhs, Deshpandeys, Vakeels, Merchants and Sowcars were present on the occasion. The place was tastefully decorated with plantain trees and leaves of mango trees. Banners were suspended on both sides of the main entrance above which was fixed a board on which were glaringly written the words "*God bless Empress Victoria*" and "*National Congress.*" The proceedings of the meeting commenced at 4 p. m. Mr. Govind Rao Narayen Deshmukh of Ellichpur being voted to the chair. The president made a short speech when Mr. G. S. Khapurde our well known Pleader of Amraoti, commenced his oration and dwelt at great length on the aims and objects of the National Congress and the various resolutions passed at the last Allahabad Congress. Then rose another equally known pleader of Amraoti— Mr. Mudholker who also delivered an excellent speech and proposed "that the ensuing congress should direct its special attention to the subject of reforms of the Legislative Councils and the question of giving greater facilities to the natives of India to enter the higher branches of the Public service. The third speaker was a Mohomedan gentleman by name Mr. Gulam Ahamad of Pimpalgaon Raja, who had specially come for the meeting. He ably discussed the aims and objects of the National Congress and impressed upon the minds of the audience the deplorable condition of the Mohamedans, who are averse to the Congress movements. He vehemently affirmed that objects of "National Congress" are most laudable and loyal and expressed his great regret coreligionists residing in the city of Ellichpur who have cut off their connection with this praiseworthy movement. This speaker was often interrupted with *cheers* and the cries of *yes & no.* The remaining speeches were excellent though short. Nine resolutions were proposed, seconded and passed unanimously with acclamation. Twelve *delegates* consisting of Pleaders and Merchants were elected to be present at the ensuing congress. Great enthusiasm prevailed at the meeting, the proceedings of which terminated with a vote of thanks to the chairman and the Almighty God.

Yours truly
"X"

---

पोचः—परतवाडा 'नवीन रहिवाशी' विरुद्धचा आपलें एक 'ढ' पत्र पावलें. स्थलसंकोचास्तव पुढील खेपेस घेऊं.

## वऱ्हाड

मि॰ स्पौडन सा॰ कमिशनर हे रजेवरून परत आले व गेल्या ता॰ ९ रोजीं त्यांनी आपल्या कामाचा चार्ज घेतला.

कांग्रेसला जाण्यासाठीं डेलिगेट निवडण्या करितां येथें येत्या ता॰ १ दिजंबर रोजीं जाहीर सभा होण्याचें ठरलें आहे.

वाशीम जिल्ह्यांत कांग्रेसची व्यवस्था करण्याचे काम रा॰ सा. देवराव विनायक यांनीं पतकरलें आहे. व बुलढाणें जिल्ह्याचें काम रा॰ रा॰ गोविंद विश्वनाथ वकील व शंकर गोविंद वकील यांनीं पतकरलें आहे.

गेल्या वकिलीच्या परीक्षेचा निकाल ता॰ १ नोवेंबर सन १८८९ च्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झाला आहे. मेसर्स, व्यंकटेश कृष्ण देसाई, श्रीकृष्ण चिमणाजी देशपांडे, विश्वनाथ कृष्ण गर्दे हे तीन गृहस्थ पसार झाले.

मि॰ हैदरअलीखान अस्याची पांस अ॰ कमिशनरचे सर्व मुलकी अधिकार देण्यांत आले.

ता॰ २२--११--८९ चे इंडिया ग्याझिटवरून —मि॰ आत्माराम भिकाजी ए॰ अ॰ क॰ से॰ क्ला॰ यांनीं पेनशन घेतल्यामुळें मि॰ अजुद्या प्रसाद ए॰ अ॰ क॰ थ॰ क्ला॰ चे से॰ क्ला॰, मि॰ माणिकशा रतनजी दस्तूर ए॰ अ॰ क॰ फो॰ क्ला॰ चे थ॰ क्ला॰, मि॰ केशवराव जयकृष्ण ए॰ अ॰ क॰ फि॰ क्ला॰ चे फो॰ क्ला॰ झाले व मि॰ एदलजी संजाना क्ला॰ आ॰ को॰ यांस ए॰ अ॰ क॰ फि॰ क्ला॰ नेमलें.

जु॰ क॰ चे क्ला॰ आ॰ को॰ चे जागीं रा॰ रा॰ त्र्यंबक गणेश इलिचपुरचे क्ला॰ आ॰ को॰ यांची नेमणूक होणार असें कळतें.

कर्नल स्पान्स्की सा. यांनीं बुलठाण्यास जाऊन डे. क. चे कामाचा चार्ज घेतला. मि. यासिनखा अ. क. हे तेथेंच रहाणार किंवा त्यांची दुसरीकडे बदली होणार हें कळलें नाहीं.

डा. कूपर सा. दवऱ्यावरून आले आहेत व गुरांचें प्रदर्शन होईपर्यंत त्यांचा उमरावतीस मुक्काम होईल असें वाटतें. प्रदर्शन येत्या ता. २१।२२ व २३ या दिवशीं उमरावतीस भरणार आहे.

मि. एदलजी संजाना ए. अ. क. यांची बडनेर कोर्टावर नेमणुक होणार. असें कळतें.

मि. समसुद्दीन अ. क. हे उमरावतीस येऊन कामावर रुजूं झाले.

मे. राईट सा. इ. ज. पोलिस, मेज्, जिल्ट्रेशन व स्टांप हे तपासणी साठीं सिरोंचास गेले होते ते परत आले.

मि. आस्टीन गांवाचे गृहस्थाची नेमणूक पार्टिकुलेअर मधून वऱ्हाडांत फर्स्ट क्लास अ. क. चे जागीं झाल्याचें कळतें.

सिकंदराबाद क्यान्टोनमेंट येथील पोलीस खात्याची व्यवस्था मुलुख अमानी हैदराबाद येथील इन्स्पेकटर जनरल आफ पोलिस यांच्या हातीं दिली जाईल.

---

## वर्तमानसार.

हैद्राबाद संस्थानचीं कृष्णकारस्थानें काय काय असतील याची कल्पनाही करवत नाहीं. या संस्थानच्या बखेड्याची एकेक नी नी गोष्ट एकावी तों तों नवल करण्यासारखा घडतें व जे प्रकार एकूं येतात ते जर सर्व खरे असले तर या संस्थानच्या पैशाला घंहूनडून तुजच्या लाल्यामुळे प्रजेची स्थिति कितपतशी चांगली असेल याचेंही अनुमान होतें. डेक्कन मायनिंग कंपनीचें व सरदार अब्दुल हक्काचें प्रकरण झाल्यास फार दिवस लोटले नाहींत, तोंच सालारजंग यांच्या कर्जाची भानगड उपस्थित झाली. हैद्राबाद रेकार्ड नांवाच्या पत्रांत या संबंधाचा जो मजकूर आला आहे त्यावरून कर्नल मार्शल ज्यांना लार्ड डफरीन साहेबांनीं तरुण निजामाच्या संरक्षणासाठीं नेमिलें होते, यांनीं कर्जाचे आंकडे फुगवून तयार केले असें दिसतें. निजाम सरकार हे सर सालरजंग यांचे अतोनात दिसणारें कर्ज फेडण्यास नाखुष होते असें म्हणतात; परंतु त्यांना निरुपायानें कर्ज फेडण्याची गोष्ट कबूल करावी लागली. पहिल्या सालारजंगाच्या वेळचें तीस लख रुपये कर्ज ह्मणून जें दाखविलें आहे, तें हल्लींच दिवाण नबाव असमानजहा यांनीं चार्ज घेण्यापूर्वीं मोठ्या लगबगीनें कर्नल मार्शल यांनीं निव्वळ बनावट रोखे सावकार लोकांकडून तयार करवून केलेलें आहे. असा भयंकर आरोप हैद्राबाद रेकार्ड पत्रांत करण्यांत आला आहे. या संबंधीं चौकशी करण्या करितां नबाब विकार उल्मुलुख यांच्या अध्यक्षतेखालीं संस्थानच्या कामगारांची एक कमेटी नेमली आहे, पण या कमेटीच्या हातून कृष्णकारस्थानें उघड होण्याची आशा फारशी नाहीं असेंही सदर पत्रांतील लेखावरून दिसतें. इंग्रज सरकार या बखेड्यांत मन घालून तरुण निजामाचें होणारें नुकसान थांबवील काय?

ट्रामवे— नासिकरोड रेल्वेस्टेशनापासून नासिक गावापर्यंत जो ट्रामवे होण्याचें पूर्वीं ठरलें होतें, तिचें कारखान्यास भगूर येथें नुकतीच सुरुवात झाली आहे येते फेब्रुवारींत ट्राम सुरू करण्याचा ट्रामवे कंपनीचा करार आहे. तोंपर्यंत बहुतकरून ही ट्रामवे चालू होईल.

सरकारी नोकरांच्या संबंधी— हिंदुस्थान सरकारचा एक ठराव ग्याझेट आफ इंडियांत प्रसिद्ध झाला आहे व त्यांत निरनिराळ्या स्थानिक सरकारांनीं आपल्या हाताखालच्या नोकरांची कर्जबाजारीपणाची स्थिति आहे कीं काय त्याचा विशेष दक्षतेनें शोध ठेवावा असें हाटलें आहे. दोन वर्षेंपर्यंत ज्या नोकरांचा निम्मा पगार सरकारानें लावून दिलेला आहे असें आढळेल त्याच्या सर्व देण्याघेण्याचा तपास करावा असें ही सदर ठरावांत ह्मटलें आहे.

टाइम्स आफ इंडिया पत्रावरून असें समजतें कीं, सरकारानें मि० ए. एफ. मेकानकी यांस मि० आर्थर क्राफर्ड यांचे आफिशिअल चरित्र तयार करण्याकरितां स्पेशल ड्यूटीवर नेमिलें आहेत. या चरित्राचे प्रूफशीट क्राफर्ड साहेब स्वतां तपासण्याचें कबूल करतील तर चरित्र खात्री लायक होणार आहे. मि० क्राफर्ड यांची हाल्लीं बाहेर आलेली वर्तणूक एकीकडे ठेविली तर यांचे सारखा हुषार सिव्हिलियन आतां मिळणें कठीण! ! या पुरुषाचें चरित्र ह्मणजे हिंदुस्थानचे इतिहासांत नोंद करून ठेवण्यासारखें आहे. तेव्हां अशा पुरुषाचें चरित्र असणें फार अवश्य आहे.

देवदर्शनास ह्मणून जाऊन तेथें देवीची तोंडें पहात बसण्याचा एका रंगेलानें क्रम सुरू केला आहे याची स्वतःची देवी नसल्यामुळे हा स्वकर्तव्य सोडून अगदीं वेडा होण्याच्या बेतांत आहे. एकदां थोबाड रंगलें तरी हा शुद्धीवर येत नाहीं असें एक गुप्त हेर कळवितो.

चालू सालची म्याट्रीक्युलेशनची परीक्षा ता० १८ नवंबर रोजीं मुंबई, पुणें अमदाबाद, बेळगाव व कराची येथें होणार. याबद्दलची सविस्तर माहिती गेले सरकारी ग्याझेट भाग २ रा यांत दिली आहे.

ज० मि०

यंदां राष्टीय सभेच्या खर्चीकरितां एका थोर गृहस्थानीं १०,००० रु. उसने दिले असून मुंबईस आज तागाईत सु. १०००० रु. जमले आहेत. तसेंच प्रत्येक डेलिगेटला १२ रु. व प्रेक्षकाला ५ रु० या प्रमाणें फी आहे, तें उत्पन्नही बरेंच होईल शिवाय बाहेर गांवची वर्गणी. अशी खर्चीसंबंधाची व्यवस्था झाल्याचें कळतें.

पार्लमेंट सभेचे एक प्रसिद्ध मेंबर मि. ब्राडलासाहेब यांची प्रकृति एकाएकीं फारच बिघडली होती, परंतु हल्लीं ती बरी असून येत्या १४ वे तारखेस ते इकडे येणार व काँग्रेसच्या सभेस हजर असणार असें ह्मणतात. यांनीं काँग्रेसच्या ह्मणण्याप्रमाणें कायदे कौन्सिलची सुधारणा करण्याबद्दल एक कायद्याचा मसुदा तयार करून पार्लमेंटकडे पाठविला आहे. या बद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडे आहेत.

मामलेदारांच्या माफीचा कायदा अखेर जसाचा तसा पास झाला. या योगानें एवढेंच झालें कीं, त्या लोकांवर खटले होण्याची भीति राहिली नाहीं. बाकी इतर रीतीनें जें नुकसान व्हावयाचें तें होणारच. या प्रकरणांत बडतर्फ झालेल्या लोकांना पेनशनची मुदत होइपर्यंत भर पगार व पुढें पेनशन देणार म्हणतात. परत वचन भंगामुळें झालेली अपली नाचक्की अशानें कमी होईल असें मात्र सरकारानें समजूं नये. गेंडे सोंडेस नाहीं आतो.

विलायतेस जाणारी आगबोट मुंबईहून दर शनवारीं निघावी असें एकदांचें ठरलें.

सर सालारजंगाचे धाकटे चिरंजीव यांचा निजाम सरकारच्या एका बहिणीशीं विवाह होण्याचें घाटत आहे असें समजतें.

अंबालहरीकेतें याच चांगल्या आधारावरून असें कळलें आहे कीं मिस्टर क्राफर्ड साहेब यांना निजाम सरकारानें दहा हजार रुपये दरमहा पगार देऊन आपले दिवाण नेमिलें आहे.

रेव्हिन्यु खात्यांतील लोकांस मिळत असलेली माताळची सुट्टी बंद करण्याचें सरकारांत घाटत आहे असें कळतें.

क० त०

नेपाळच्या हल्लींच्या संस्थानिकाची कारकीर्द फार खराब आहे व तो कारस्थान करून इंग्रजी राज्यास धक्का आणील अशी भीति आहे, या करितां सरकारानें वेळींच बंदोबस्त करावा अशी इंडियन मिरर पत्राची सूचना आहे.

नेपाळ व चीन यांच्या दरम्यान गुप्त तह झाल्याचें बाहेर पडलें आहे चीन देशाचें इंग्रजांशीं पक्कें हाडवैर पडलें आहे असें ही सांगतात.

सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा पुढच्या वर्षाच्या जूनच्या २ तारखेस होणार.

न्या. सिं.

नामदार मि० स्याम्याम यांच्या मागें मि० बद्रुद्दीन तयबजी हे आडव्होकेट जनरल होणार असें ह्मणतात.

गेल्या २० वर्षांत अमेरिकेंत २० लक्ष नवीन शेतें लागवडींत आलीं, आणि उत्पन्न दुपटीनें वाढलें ह्मणजे ६०० कोट रुपयांचें उत्पन्न २० वर्षांत झालें.

वेड्याच्या दवाखान्याच्या भोंवतालीं ससे सोडून द्यावें ह्मणजे त्यांच्या कडे पाहून वेड्यांचें समाधान होतें असें व्हिटकोम्ब ह्मणतात.

ब्रिस्टल येथें धुराच्या दिव्याच्या कारखान्यांत संप माजल्यामुळे शहरभर अंधेरच अंधेर झाला होता. अशा काळोखांत कोणी दिवाबत्ती लावण्याचा प्रयत्न केल्यास त्याला बरालच मार.

आइसलंड या बेटांत ७० हजारांवर वस्ती असून त्या ठिकाणीं नाटक नाहीं, पोलीस नाहीं, तुरुंग नाहीं, व न्याय कोर्टमिलल बोलावयासच नको.

वर्तमानपत्रें छापण्याचें नवीन यंत्र निघालें आहे त्यांत, अक्षरांचे खिळे नाहींत, तर ते छापावयाच्या वेळेस आंतल्या आंत तयार होतात.

एके ठिकाणीं सरोवरांत तरंगणारीं लहान लहान बेटें आहेत. त्यांवर कोळी लोक जाऊन बसतात व मासे धरतात. या बेटाच्या बुडाशीं शेवाळ असतें.

चीन देशांत बायकांस कोणत्या योग्यतेच्या समजतात या बद्दल नुकतेंच एका पत्रांत छपून प्रसिद्ध झालें आहे. स्त्रीपुरुषांतील भेदाचीं तत्वें अशीं आहेत :—आकाश आणि पाताळ यांत जितकें अंतर आहे तितकेंच स्त्रीपुरुषाच्या स्वभावांत आहे. २ तसेंच दोघांच्याही शरीरावरून भिन्नपणा दिसतो. ३ सर्व अनर्थाचें कारण स्त्री; या करितां स्त्रियांनीं पुरुषाच्या अंकित असावें ह्मणजे समृद्धी होते. ४ स्त्रिया पुरुषापेक्षां हलक्या प्रतिच्या आहेत. ५ स्त्रियांस शिक्षण देणें ह्मणजे त्यांनीं पुरुषांच्या अधीन वचनांत रहावें या पलीकडे शिक्षण देणें ह्मणजे अनर्थकारक आहे. ६ स्त्रियांस स्वतंत्र सुख होणें नाहीं. त्यांचें जीवित पुरुषांकरितांच आहे. ७ पुत्रवती झाल्यास तिला अर्धांगी ह्मणतां येईल.

के०

विद्यार्थी दशा संपली,— पण वास्तविक पहातां ती अखेरपर्यंत संपत नाहीं हें खरें, तेव्हां उदरपोषणाच्या मार्गाला लागणें ह्मणजे एक प्रकारचें शिक्षण अवश्य असतें तेथें मात्र सरकारचा बिलकुल संबंध नाहीं. पत्रकार, छापखानवाले, व्यापाऱ्यानें आणि लेखक मंडळी यांच्या स्वाधीन तो सारा कारभार ह्मणून त्यांच्या संबंधानें उल्लेख करणें जरूर आहे तो आतां पुढल्या खेपीं किंवा आणखी कधीं तरी करूं.

मि. ब्राडला यांची प्रकृती पुनः बिघडली ती अजून ताळ्यावर आली नाहीं. गेल्या रात्रीं त्यांना झोंप मात्र बरी आली —असें कालच्या टाइम्स आफ इंडियांत २ ऱ्या तारखेच्या तारेंत लिहिलें आहे.

लार्ड डफरिन यांस लंडनच्या चेंबर आफ कामर्स या मंडळानें ता. ३० रोजीं रात्रीं मेजवानी दिली. त्या प्रसंगीं त्यांणीं व्यापारसंबंधाचेंच भाषण केलें. त्यांत हिंदुस्थान व इंग्लंड यांचा हल्लींचा संबंध कमी झाला तर इंग्लंडांतील उद्योग धंदे करणाऱ्या प्रदेशांतील प्रत्येक घराण्याचें नुकसान होईल असें ते बोलले. तसेंच ब्रह्म देशांत ब्रिटिश लोकांनीं आपलें भांडवल पेरून रेल्वे केली तर इंग्लंडचा चीन देशाशीं मोठा व्यापार वाढेल असें सुचविलें. शिवाय नेटिव संस्थानांत हात घालूं नये असें आपलें मत आहे तथापि काश्मीरच्या महाराजास पदच्युत केलें हें ठीक केलें व काश्मीरांत आमच्या लोकांनीं उद्योग करावा असें आपल्यास वाटतें असें त्यांणीं स्पष्ट सांगितलें.

उंदीर दुष्काळ पाडूं शकतात काय? उंदीर फार त्रासदायक असतात ते कापडांची व दाण्याची नासाडी करतात ह्याचा आपणा सर्वांना अनुभव आहे परंतु चीनामध्यें काहीं देशांत उंदीर दुष्काळ पाडतात असें समजतें. या देशांत उंदीर फारच आहेत ते सर्व दाणादुणा व गवत खाऊन फडशा पाडितात व त्यामुळें कधीं कधीं दुष्काळही पडतो. तेथें उंदीर इतके आहेत कीं, ते रस्त्यावरसुद्धां पडतात व त्यामुळें रस्ते सर्व भरून जातात व त्यावरून जाण्याची फार पंचाईत पडते. त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न चालला आहे चिनी लोक उंदीर खातात असें असून इतके कसे वाढले हें समजत नाहीं.

दिव्याच्या मदतीनें मासे धरण्याची नवीन युक्ति पतंग वगैरे लहान प्राणी दिव्याला इतके भुलून जातात कीं, ते त्याच्या सभोंवती फिरत असतात इतकेंच नाहीं तर फिरून जणुकाय तृप्ति होत नाहीं ह्मणून दिव्याच्या ज्योतीवर उडी घेतात आणि मरतात माशांचीही गोष्ट अशीच आहे दिव्याच्या दांड्या सभोंवतीं ते फार येतात असें समजतें याचा उपयोग कांहीं लोक करूं लागले आहेत. ते पाण्यामध्यें दिवे नेतात मासे या दिव्यांना भुलतात व धांवत येऊन त्याच्या सभोंवती फिरूं लागतात ते इतके बेफाम होतात कीं, त्यांना सहज पकडतां येते. विजेचा ही उपयोग ह्या कामाकडे करितात.

सु. प.

विलायतच्या टाईम्स पत्राचा क्याप्टन चार्लेस नांवाचा एक बातमीदार मुद्दाम या देशांत येऊन नेटिव संस्थानांतील माहिती मिळविणार आहे असें समजतें.

पु० वै०

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास.........................०४
नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ...........०।

Advertisements
Below 10 lines ... 2R
per line over10... 4 a
Repetition pe line 3a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 18 NOVEMBER 1889 | NO. 44

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख १८ माहे नोवेंबर सन १८८९ इ० | अंक ४४

## गरमीचे रोगावर औषध.

शारिरांत गरमी होऊन धातु बिघडतें व ती स्त्रीसंग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोपेंत व मुत्र समई पतन होते- परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्यांनीं अवलेह घ्यावा. गोड व अनुभाविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डांक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचें औषध.

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमूत्र साफ होत नाहीं, पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन मळमळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्यांनीं पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डांक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

## AKOLA MEDICAL & SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

## अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल

आम्हीं येथें पेठेंत लोकांच्या सोईकरितां दवाखाना काढिला आहे. येथें सर्व रोगांची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळांतिणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरि वामन भट. एल्. एम्. ॲन्ड् एस्.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरिला, पौष्टीक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा कल्प आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक, दंतशाण, हीं औषधें मिळतील.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतोलच असें समजूं नये

परतवाडा तारीख ७-११-८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः

हवामान—पावसानें आपल्या कामाचा पूणर्पणें राजीनामा दिला त्याचा चार्ज थंडीनें घेतला. व इतक्यांतच अमल जारीनें सुरू केला.

कॉंग्रेस— ही सभा तारिख ९ मंगळवार रोजीं शहर इलिचपुर येथें भरली होती मंडळी सरासरी ६--७ शें होती. इलिचपुर जिल्ह्यांतून बारा डेलीगेट निवडले गेले. अवई खरी कां खोटी —येथील कांहीं इसम नवी पत्ता काढणार आहेत अशा अवई आहे ती कांहीं अंशीं खरी ही आहे. येथें नववी पत्ता असणें हे फार जरूरीचें आहे व फायद्याचें ही आहे. परंतु त्या मंडळीस एवढेच सांगणें आहे कीं, "नवेनऊ दिवस" या प्रमाणें मात्र करूं नये.

शाळा-येथील हेडमास्तर मि. सदाशिव गोविंद दामले यांची प्रकृती नादुरस्त असल्या मुळें ते आणखी पांच सहा महिन्याची सीक रजा घेऊन मुंबई कडे निघून गेले त्यांना ईश्वर लवकरच आराम देवो. येथील ७ वे यत्तेतील विद्यार्थ्यांनी लायब्ररी काढली आहे म्हणून मागें आपणांस कळविलेंच आहे. त्या प्रमाणें त्यांना वर्गणीचा वगैरे कागद तयार करून यत्तेतील सर्व मुलांच्या वर्गणीच्या आकड्यासह सह्या वगैरे घेतल्या. आतां ती बाल लायब्ररी मोडणार अशी ही बातमी आहे कां तर कोणी वर्गणी देत नाहीं म्हणून. तेव्हां "तेरड्याचा रंग तीन दिवस" या म्हणी प्रमाणें आरंभी बेबाच्या देठा पासून आरोळी मारली व मग मट दिशी खाली बसले तर मग " + नाहीं आणि कावळ्याला करतात अगंत्रण या प्रमाणें त्यांनीं केलें हें निर्विवाद आहे पुरें त्याची चर्चा कशाला पाहिजे. पत्रकर्तेराव पत्र फार लांबलें हे खरें तथापि आपण मागल्या माझ्या पत्रांस आपल्या पत्राची अमोल्य जागा दिलीत हें पाहून हें दुसरे पत्र लिहिण्याची आज उमेद येऊन धाडस केलें आहे तर मागल्या प्रमाणें ह्याला ही जागा द्याल अशी आशा आहे कळावें लोभ असावा हे विंनती.

आपला
"नवीन रहिवाशी"

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. पुढील चार ओळीस घेत्या अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

चिखलदरा तारीख ७--११--८९

अलीकडे थंडी बरीच पडूं लागली आहे. गांवांत हीव तापाचा आजार जारीनें सुरुं आहे. पूर्वींचे चीफ कान्स्टेबल यांनीं रजेवरून परत येऊन कामाचा चार्ज घेतला. मेहेरबान डेप्युटी कमिशनर साहेब बहादूर यांची स्वारी येथें आली आहे. आठ दहा दिवस मुकाम आहे असें ऐकतों. येथील शाळा मास्तर बरेंच दिवसा पासून पोटशूळाचे व्यथेनें मांदे आहेत पुष्कळ औषधें घेतलीं व पोटावर भिलावेही घातले तरी गुण नाहीं. आठदहा दिवसा पासून बिचाऱ्यास हीव ताप येऊ लागला आहे. सर्व दिवस आणि रात्र बिछान्यावर पडला रहातो उठण्या बसण्याची ताकद नाहीं. बदली विषयीं व रजेविषयीं सरासरी दहा बारा रिपोर्ट केले तरी गरिबाची दाद लागत नाहीं. असें होत होत बिचाऱ्यास येथेंच आराम होवो म्हणजे झालें. गरिबांचा त्राता परमेश्वरच असतो. अखेरीस त्रासून राजीनामा सुद्धां देण्यास तयार झाला आहे. हाहर! परतंत्रता फार कठीण आहे. इतके दुःख सोसून पोटा करितां राहणें भाग आहे. एलिचपुर जिल्ह्याचे डे. ए. इं. मिस्तर केशव ब्रम्हगिरी पाळेकर हे फार विचारी, दयाळु व निष्पक्षपाती आहेत. परंतु ईश्वर त्यांना अद्याप त्या बिचाऱ्याची सुटका करण्या विषयीं कां बुद्धी देत नाहीं हें कळत नाहीं. पत्रविस्तार फार झाला म्हणून पुरें करितों. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला एक
"ड"

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

साष्टांग नमस्कार विनंती विशेष पुढील चार ओळीस आपले येत्या पत्रीं अवश्य मिळेल म्हणून आपले कडेस धाव घेतली आहे.

मी फिरत फिरत धुगांव तालुका आणि जिल्हा उमरावती या गावीं गेलों तें वेळेस सायंकाळ झाली असल्यामुळें ते दिवशीं माझा मुकाम तेथें झाला. मी बाजारांत मुशाफर खान्यांत उतरलों होतों बाजारांत असलेले झाडांची शोभा पाहून मला असें वाटलें कीं ह्या गांवांची रचना फार सुरेख असून देखावा ही बरा आहे. इतक्यांत गांवातील कांहीं मंडळी तेथें आली होती त्यांना मी गांवसंबंधीं माहिती विचारल्या वरून त्यांनीं सांगितल्यावरून असें दिसून येतें कीं ह्या गांवास लोकल कमेटी, शाळागृह, पोष्ट आफिस, व हिंदुस्थानीं स्कूलही आहे. ही मोठी आनंदाची गोष्ट आहे परंतु उणीव हीच कीं लोकल कमेटींत असलेले मेंबर यांनीं आपलीं कामें बरोबर रीतीनें केल्यास असलेली उणीव दूर होण्यासारखी आहे परंतु तसें होणें कठीण, कारण मेंबर लोकांना व कारभारी यांना इतर कामें पुष्कळ असून त्या कामांत त्यांचा वेळ जातो व कांहीं मेंबर मुळींच गांवांत नसतात तरी स्वतंत्र कारभारी व मेंबर नेमल्यास कमेटीचें काम उत्तम रीतीनें होऊन गांवची शोभा विशेष होण्यासारखी आहे असें वरील जमलेल्या मंडळीनें सांगितल्यावरून दिसतें. व त्या प्रमाणें दुसरें दिवशीं गांवांत जातांना मला उणीव दिसून आली तोही कीं गांवकरी लोकांना गांवच्या मानानें बाहेर दिशेस जाण्याचा फार त्रास आहे तो सहज दूर होण्यासारखा असून त्याकडेस कमेटीचे लक्ष्य नाहीं असें असण्याचें कारण कमेटी दाराकडे दुसरी पुष्कळ कामें आहेत हें होय पत्र विस्तार फार झाला याज बद्दल माफी असावी.

एक
"फिरस्त."

मुक्काम चिखली ता० १३।११।८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. लिहिण्यास कारण कीं आपले येथील वकील रा. रा. गोविंद विश्वनाथ देशपांडे व शंकर गोविंद हे ता. ११ माहे नोव्हेंबर सन १८८९ इ. रोजीं येथें येऊन त्यांनीं तालुक्यातील, व येथील लोकांची सभा बाजारात भरविली. प्रथम सभेचा उद्देश शंकर गोविंद यांनीं कळविला त्या नंतर गोविंद विश्वनाथ यांनीं राष्ट्रीय सभा उत्पन्न होण्याचीं कारणें व तिचा हेतू व तिनें आज पर्यंत केलेलीं कृत्यें कळविली व सर्वांचें या सभेसंबंधानें जें आज पर्यंत अज्ञान होतें तें नाहींसें केलें व नंतर सर्वानुमतें या सभेला साह्य करावें असें ठरून या तालुक्या करितां एक चौदा इसमाची कमेटी नेमण्यांत आली उभयतां वकिलांनीं भाषणें फार सुरेख केलीं व त्यांनीं ह्या सार्वजनिक कृत्याबद्दल इतके लांब येऊन जे हाणून श्रम घेतले आहेत त्याबद्दल त्यांचे जितके आभार मानले तितके थोडेच आहेत. कळावें.

आपला 'क्ष'

मु० मेहकर ता० १४।११।८९ इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. येथें श्रीबालाजीची यात्रा येत्या महिन्याच्या शुद्ध ९ स भरणार आहे त्या प्रित्यर्थ बाहेरगांवची बरीच मंडळी येईल असा अंदाजा आहे. मंडळीला निमंत्रण दिल्या जाणार आहेत व त्याच प्रमाणें ब्राम्हण, हरदास, गवई, बाजंत्री वगैरे गुणी मंडळी ही यात्रेस बोलावण्याचा कमेटीचा विचार झाला आहे व त्या प्रमाणें निमंत्रणेंही गेलीं आहेत. हल्लीं जिकडे तिकडे सामान तयार करण्यांत मंडप उभारण्यास मंडळी अगदी गुंतून गेली आहे. चालेल्या तयारी वरून समारंभ फार मोठा व रमणीय होईल असें वाटतें तर बाहेरगावच्या लोकांनीं ही महोत्सव पाहण्याची संधी गमावू नये असें मला वाटतें.

ह्या वरील खटपटी येथील मंडळी गुंतली आहेत सर्व आंनद चालला आहे तोंच परवा ता. १२ मनिहु रोजी अकोले कर वकील रा. रा. गोविंद विश्वनाथ देशपांडे यांनीं इथें येऊन राष्ट्रीय सभे संबंधानें एक फार सुरेख व्याख्यान दिलें व इथें त्या सभेकरितां एक १७ इसमाची तालुका कमेटी स्थापित केली. व्याख्यान बाळाजी समोर नवीन तयार होत असलेल्या मंडपांत झालें व श्रोतृ वृंद बराच जमला होता. राष्ट्रीय सभे संबंधानें या गांवांत ही पहिलीच सभा होय. वरील इसम मनकूर यांनीं इतक्या लांबवर येऊन इकडील मंडळीचें राष्ट्रीय सभे सारख्या महत्वाच्या विषया संबंधीं असलेलें अज्ञान नाहींसें केलें त्याजबद्दल सर्वांवर त्याचे मोठे उपकार झाले आहेत. व असेच सार्वजनिक कृत्या बद्दल आमची हिंदुस्थानवासी मंडळी आणखी कांहीं वर्षे श्रम करील तर हिंदुस्थानचें कल्पाण होईल यांत कांहीं संशय नाहीं कळावें ही विनंती.

आपला

"क्ष"

---

वऱ्हाडसमाचार.

---

मिति कार्तिक वद्य १० शके १८११

## वऱ्हाड शिक्षक समाज

उमरावती हायस्कुलांतील ज्या मोठ्या दालनांत पहिला वर्ग बसतो तेथें यंदाचा शिक्षक समाज भरला. मंडळीस बसण्याकरितां व्यवस्थापक मंडळींनीं श्रम घेऊन चांगली सोयकर जागा तयार केली होती. शाळेच्या मुख्य गेटाकडे तोंड करून अध्यक्षाचें स्थान होतें. त्यांच्या मागें इन्स्पेक्टींग आफिसराकरितां खुर्च्या मांडल्या होत्या पुढें खुर्च्यांच्या दोन रांगा असून त्यामागें प्रत्येक बाजूस बाकांच्या तीन तीन रांगा होत्या. येथें शिक्षक बसत. अकोला व उमरावती येथील मुलींच्या शाळांवरील मास्तरणी ही येत असत. त्यांच्यासाठीं अध्यक्षाच्या डाव्या हाताकडच्या खोलींत बैठक केली होती. खोलीतून दालनांत येण्याकरितां जें मोठें दार आहे त्यास चिकाचा पडदा लाविला होता. एकंदरींत त्यांचे करितां केलेला जागा चांगली पडदपोशीची होती. मंडळी आपल्या इष्टमित्राकडे उतरते. एकेकाचे घरीं दोन दोन तीन तीन निदान पाहुणे असतात. परक्या ठिकाणीं असल्यामुळें वेळेवर जेवणखाण आटोपण्यास साधारण अडचण असते तथापि सोमवार तारीख ११ रोजीं ११ वाजण्याचे पूर्वींच बहुतेक मंडळी येऊन आपआपल्या जागेवर बसली होती. पहिलेच दिवशीं मंडळी सुमारें १२९ वर होती. बरोबर ११ वाजतां मेहरबान डायरेक्टर साहेब बहादुर आपल्या इन्स्पेक्टींग मंडळीसह आले. साहेब येतांच सर्व लोक उठून उभे राहिले. साहेबांनीं सर्वांस आतां आपण बसावें असें सांगून बोलण्यास सुरवात केली ते ह्मणाले:—

तुमचा सर्वांची येथें भेट झाली हें पाहून मला फार आनंद वाटतो. आतां आपल्या कामास सुरवात झाली हें सांगण्यापूर्वीं मला तुह्माला दोन तीन गोष्टी सांगावयाच्या आहेत. आज सकाळीं मि. तळवळकर व इन्स्पेक्टर मंडळीं मजकडेस आली होती त्यांच्या जवळ मी ह्या गोष्टी काढल्या. तेही या गोष्टींचा विचार करतील. व तुह्मी ही करावा. त्या गोष्टी ह्या ( १ ) लोकल बोर्डसच्या ताब्यांत कोणत्या शाळा द्याव्या? त्यांचे कडेस काय अधिकार द्यावे? त्यांचे हातीं पैशाची किती रकम द्यावी? व तिची व्यवस्था त्यांनीं कशी करावी वगैरे. ह्या पहिल्या गोष्टीचा विचार इन्स्पेक्टिंग आफिसरांनीं करावा. मी या प्रांतांत अगदीं नवा आहे. या करितां ते जी मला विचारपूर्वक सल्ला देतील तिनें मला चांगली मदत होईल. ( २ ) इन्टरस्कूल रुल— ह्मणजे एका शाळेतून दुसऱ्या शाळेंत मुलगा गेला असतां त्यास कोणते नियम लागूं असावे कीं जेणें करून त्या मुलावर एक प्रकारचा दाब राहून त्यांस विनाकारण शाळा सोडण्याचा वगैरे प्रसंग येणार नाहीं. ( ३ ) प्रिफेक्ट पद्धत. ही पद्धत तुह्मास आपल्या शाळांतून सुरूं करितां येईल अगर नाहीं याचा तुह्मी विचार करावा. ही पद्धत मॉनीटोरिअल पद्धतीपेक्षां निराळी आहे. मॉनीटोरियल पद्धतीमध्यें प्रत्येक वर्गांत एक मुलगा मुख्य नेमतात. तो सर्व मुलावर आपला दाब ठेवितो. प्रिफेक्ट पद्धत अशी नाहीं यांत वरल्या वर्गांतील ह्मणजे पहिल्या वर्गांतील चार पांच मुलास कांहीं अधिकार दिलेले असतात. हीं मुलें सर्व मुलांवर आपली नजर ठेवितात. आतां हीं मुलें म्हणजे चांगली बुद्धीवान असलीच पाहिजे असें नाहीं. परंतु त्यांच्या ठायीं कांहीं तरी असें गुण पाहिजेत कीं त्या मुळें त्यांचें वजन दुसऱ्या मुलांवर पडेल. ही पद्धत मी जे कबसाहेबांनीं मुंबईचे एल्फिस्टन हायस्कुलांत सुरूं केली आहे तेथें ती उत्तम तऱ्हेनें चालू आहे. वरील दोन गोष्टींचा विचार शिक्षक समाजांतील लोकांनीं करावा. आतां आपल्या कामास सुरवात झाली असें सांगून मी बसता.

नंतर मी. ब्यारेट साहेब उठून गेल्यावर अध्यक्ष मि. तळवळकर यांनीं कामाची सुरवात केली. मि. पिंपळखरे यांनीं सन १८८९ सालचा रिपोर्ट वाचला. तो सर्वानुमतें पसंत झाला. प्रांतांतील शाळांतून चवथ्या, व सहाव्या इयत्तांतील विद्यार्थ्यांच्या पुस्त्या पाहून त्यातून उत्तम पुस्त्यांची निवड करण्यासाठीं एक सब कमेटी नेमली व सेक्रेटरी पिंपळखरे यांनीं शिक्षक समाजाच्या व्यवस्थापक सभासदां कडून इन्स्पेक्टिंग अधिकाऱ्यांचे मंडळी कडे विचार करण्यास पाठविण्या जोग्या ज्या कांहीं महत्वाच्या सूचना आल्या होत्या व ज्या मे. ए. इ. यांज कडेस पाठविण्यांत आल्या त्या वाचून दाखविल्या. तेथल्या तेथेंच आणखी दोन सूचना एक दोन गृहस्थांनीं केल्या. त्या ह्या ( १ ) सहावे इयत्तेतील मुलांस शुद्धलेखन हा विषय नाहीं त्या मुळें ते हा विषय विसरतात. व वरच्या इयत्तेत तो आला म्हणजे तो विषय घालावा ( २ ) सहाव्या इयत्तेत इंग्रजी व्याकरणाचे नियम ठेविलेले नाहींत. सातवे इयत्तेत ७५ नियम आहेत. इतके नियम व्याकरण कठीण असल्या मुळें तेथें फार जड जातात. सबब या पैकीं पहिले २० नियम सहावे इयत्तेंत ठेवावे. वरील दोन्ही सूचनांच्या संबंधानें बरीच चर्चा झाली. कोणी म्हणत हा फेरफार करण्याची जरूर आहे. कोणी म्हणत असा फेरफार करण्याचा बिलकुल जरूर नाहीं. शेवटी बरीच भवती नभवती होऊन जास्त मतानें असें ठरलें कीं ह्या सूचना घेण्याची कांहीं जरूर नाहीं. इयत्तेंत पुस्तकें दुसरी घालण्याचा अधिकार डिरेक्टर साहेबांस आहे. या शिवाय कोणत्या ही तऱ्हेचा फेरफार करण्यास डायरेक्टर साहेबास रेसिडेंट साहेबांची मंजुरात घ्यावी लागते. एवढी गोष्ट जर शिक्षका पैकीं कोणाच्या ध्यानांत आली असती तर ह्या सूचना कदाचित् निघाल्या ही नसत्या. व निघत्याच तर त्यांचा निकाल विनाकारण वेळ खर्च न होता एकदम झाला असता. तथापि या विषयाच्या वादा पासुन कांहीं लाभही झाला. तो असा. जे नियम सातव्या इयत्तेंत समजणें कठीण आहेत त्या पैकीं कांहीं नियम खालच्या इयत्तेंत ठेवावें असें जे मास्तर ह्मणतात व असें ह्मणणारे बहुतेक हेडमास्तर आहेत त्यांत त्यांचा केवळ आपल्या कामाचा बोजा दुसऱ्यावर घालावा असा दिसतो. ही गोष्ट भर समाजांत दिसण्यांत आली. हा एक फायदाच झाला. दुसरा फायदा असा कीं सहावे इयत्तेंत शुद्धलेखन नाहीं सबब तें शिकविण अगर त्याचेकडे लक्ष्य देणें जरूर नाहीं असा कांहीं लोकांचा चुकी मुळें गैर समज झाला होता तो मिटला. दुसरे दिवशीं सकाळीं सबकमिटीनें पसंत केलेल्या पुस्त्या पाहून बक्षिसांचा निकाल झाला. मागल्या साला पेक्षां यंदा पुष्कळ पुस्त्या आल्या. व अक्षरांच्या वळणांत विशेष फरक दिसण्यांत आला. यावरून हें उत्तेजन चालू ठेविलें असतां उत्तरोत्तर अक्षरें चांगलीं सुधारतील व चांगलें लिहिणाराची संख्या जास्त जास्त होत जाईल असा सबकमिटीनें अभिप्राय दिल्यावरून पुढल्या वर्षी करितां यंदाच्या इतकींच बक्षिसें कायम केलीं. एक बक्षीस उर्दू सहावे इयत्ते करितां जास्त ठेरविण्यांत आले. आतां या पुस्त्या संबंधानें जास्त ठराव असा झाला कीं त्या फुलस्कयाप कागदावर लिहिलेल्या पाहिजेत. व सहावे इयत्तेंतील मुलांनीं किल्याचा उतारा न करितां अमुक एक मायन्याचा उतारा आपल्या पुस्त्यावर करावा. हा मायना निदान दोन महिने अगोदर कळविण्याची तजवीज ठेवण्यांत येईल. इयत्ता ३, ४ व ५ यांत मोडीवाचन सुलभ कसें करितां येईल या संबंधानें बरीच चर्चा झाली. कांहींकांचें ह्मणणें मुंबई प्रांतांत तशी छापील मोडी क्रमिक पुस्तकें आहेत तशीं आपल्या शाळांतून ठेवावीं. कांहींकांचें ह्मणणें ज्या मास्तरांचीं अक्षरें चांगलीं असतील त्यांच्याकडून पुस्त्या लिहून घेऊन त्यांचीं फायलें प्रत्येक शाळेंत ठेवावीं. या संबंधानें चर्चा होताच प्रत्येकानें आपआपली अडचण सांगितली. त्या अडचणी आपोआप समज झाला असतां कशी दूर होतात व ज्या कामांत पडावे तेथील पत्रव्यवर कितीही कठीण लिपींत असला तरी कसा सरासरी वाचतां येतो हें सांगितलें. उदाहरणार्थ पोलीसची डायरी. तेथील वाकबगार मनुष्या शिवाय कोणाला त्यांतील एक अक्षरही काढतां येणार नाहीं.

सरते शेवटी फाईल ठेवण्याची सूचना मान्य झाली. तिसरे दिवशीं पुढील सालाकरितां खर्चाचे अंदाजपत्रक पसार करतांना या सालच्या शिक्षक समाजाची हकीकत छापून सर्वांस पुस्तकें द्यावी ह्मणून ३० रुपयांची रकम मंजुर केली. ही मंजुरात फक्त या साला पुरतीच आहे. पुढील सालाकरितां समाजाचे अध्यक्ष रा. रा. हरि रामचंद्र रोहीणखेडकर बी. ए. अकोला हायस्कूलचे हेडमास्तर यांस नेमिले. व सेक्रेटरी रा. रा. कृष्णाजी मल्हार पैठणकर व रा. रा. विष्णु नारायण डांगे बी. ए. यांस नेमिले. व दुसरे व्यवस्थापक सभासद आहेत तेच कायम ठेविले. रा. रा. बळवंतराव तालिममास्तर हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज अकोला यांनीं लिहून आणलेला निबंध रा. रा. कृष्णाजी मल्हार यांनीं वाचून दाखविला. त्यांतील विषय कवाईत ह्मणजे (ड्रिल) अलीकडेस पुण्यांतील शाळांतून ज्या पद्धतीवर शिकण्यात येते तशी. अशी कवाईत आपल्या शाळांतून शिकविण्यास काय तजवाज केली पाहिजे याविषयीं पुष्कळ वाटाघाट झाली. कवाईतीपासून शरीरच्या प्रत्येक भागास चळनवळन मिळाल्या मुळें शरीर नेहमीं साफ राहतें. आंगीं चिटनेटकेपणा येतो. व्यवस्थेशीर पोषाख वापरण्याची सवय लागते. एकाचा हुकूम सर्वांनीं कसा पाळावा याची शिस्त लागते. व तो मनुष्य नेहमीं टापटिपीनें राहतो वगैरे कवाईती पासून होणारे अनेक फायदे रोहिणखेडकर यांनीं स्पष्ट करून सांगितले. नंतर बळवंतराव यांनीं २ दिवसांत श्रम करून तयार केलेल्या मुलांची ड्रिल पाहुन सर्वांस आनंद वाटला. बळवंतराव यांचे कडेस इतर तालीम मास्तरांनीं जाऊन तेथें १५ दिवस राहून त्यांचे पासून हा गुण संपादावा ह्मणून त्यांस डे. ए. इ. कडून तितके दिवसांची रजा देता येईल किंवा नाहीं याविषयीं वाद होऊन असें ठरलें कीं ही सूचना इन्स्पेक्टींग मंडळीकडेस पाठवावी. शिवाय त्यांना प्रत्येक समाजास येण्याची परवानगी असावी. शेवटलें दिवशीं ह्मणजे चवथे दिवशीं मुलीस मुलांप्रमाणें स्कालरशिप मिळावी व मुला प्रमाणें बक्षिसें मिळावी अशी शाळा मास्तरणीकडून सूचना आली ती सर्वानुमतें पास होऊन पुढें पाठविण्याविषयीं ठरलें. येणेंप्रमाणें समाजांत कामें झाली याशिवाय वर्ग शिकविणें व व्याख्यानें देणें व निबंध वाचणें वगैरे पूर्वी प्रोग्राममध्यें ठरविल्याप्रमाणें त्या त्या गृहस्थाकडून बजावण्यांत आलें. शेवटले दिवशीं समाजाचे मंडळीचा फोटो घेतला नंतर समाजाच्या सेक्रेटरीनें व इन्स्पेक्टर मि. महाजनी यांनीं आपआपल्या कामाचे रिपोर्ट वाचले. शेवटीं डायरेक्टर साहेबांचें भाषण झालें.

मेहरबान डायरेक्टर साहेबांचें भाषण खालीं लिहिल्या प्रमाणें झालें. "ज्या ज्या लोकांनीं कानफरन्स मध्यें कामें केलीं त्यांचे आभार मी मनापासून मानतों. इन्स्पेक्टींग स्टाफनें लोकल बोर्डला शाळे संबंधी किती अधिकार द्यावे या विषयीं फार चांगला विचार केला व त्यांनीं केलेल्या सूचना मला बऱ्या वाटतात. येथें एकदोन मुद्या संबंधी मला बोलावयाचें आहे. मी टिपून आ-

णिले आहेत. अशी एक सुचना झाली आहे की "मुलांच्या शाळेंत पगारी विद्यार्थ्यांच्या जागा ठेवाव्या व मुलींच्या शाळेंतून जीं बक्षिसें दिलीं जातात, त्यांची किंमत मुलांच्या बक्षिसा पेक्षां ज्यास्त असावी" या विषयीं मला एवढेंच सांगावयाचे आहे कीं पैसा जितका गैर सोय न करितां कमी खर्च करवेल तितका करावा असा सरकारचा हेतु आहे. मुलांच्या शाळेतून पांचवे इयत्ते पासून पगारी विद्यार्थ्यांच्या जागा आहेत व मुलींच्या शाळेंतून त्या जागा नसण्याचें कारण एवढेंच दिसतें कीं तेथें पाचवी इयत्ता मुळींच चालत नाहीं. तथापि त्यांच्या करिता विशेष सोय करणें जरूर आहे. बक्षिसांच्या संबंधानें मला असें वाटतें कीं हल्लीं बक्षिस देण्याची जी रीत आहे ती बरोबर नाहीं. माझें मत असें आहे कीं बक्षिस देणें तें जो मुलगा खरोखर उत्तम असेल त्यालाच द्यावें म्हणजे तीस मुर्ख मुलांत जो पहिला येईल त्याला देऊं नये तर आदी जो हुशार त्यालाच मिळावें. या संबंधानें मुलींकरितां विशेष सोय करणें जरूर आहे. नीतिशिक्षणाविषयीं मला असें वाटतें कीं शंभर पुस्तकें नीतींची शिकविण्यापेक्षां एका मास्तराचें स्वतःचे शुद्ध वर्तन अधिक श्रेयस्कर आहे. तथापि अशीं पुस्तकें असणें वाईट नाहीं. या संबंधानें इंग्लंडांत फार चांगली सोय आहे. तेथें बोर्डिंग हाऊसमुळें मुलांच्या वर्तनावर विशेष परिणाम होतो. इंग्लिश मुलांची व हिंदुमुलांची मी तुलना करूं इच्छित नाहीं. युरोपखंडांतील दुसऱ्या राष्ट्रांतील मुलें व इंग्लंडांतील मुलें यांतच मला तुलना केली पाहिजे. इंग्लंडांतील मुलें जीं त्यांच्या धैर्याविषयीं, खरेपणाविषयीं प्रसिद्ध आहेत तशीं युरोपांतील दुसऱ्या देशांतील मुलें प्रसिद्ध नाहींत. ती मुलें इंग्लिश मुलांपेक्षां हुशार व बुद्धिमान असतील. इंग्लंडांत अनेक शाळांतील मुलांत नीतिविषयीं स्पर्धा असते. एखाद्या मुलाला उनाड, टवाळी असें म्हटल्या पासून जितकें वाईट वाटतें तितकें दुसर कशा पासून ही वाटत नाहीं. अनेक बोर्डिंग हाउसेस मध्यें सुद्धा अशी स्पर्धा चालू असतें आणि ह्याच मुळें इंग्लिश मुलें इतकी नीतिमान् निपजतात. बोर्डिंगांची प्राचीन काळा पासून जी नीतिविषयीं कीर्ति चालत आली आहे ती तशीच पुढें चालावी असें त्यांतील रहिवाशांना वाटत असतें. अशा प्रकारचीं बोर्डिंगे जर हिंदुस्थानांत झालीं तर हिंदुमुलें तशीं कां निपजूं नये ह्यास काहीं कारण देतां येणार नाही. शारीर शिक्षणा मध्यें अलिकडे कवाईत (ड्रिल) ही फार आवडू लागली आहे व मला ही पण ती बरी वाटते व तिकडे जितकें लक्ष देववेल तितकें द्यावें. अकोलें येथील कसरती मास्तरानें जशी मेहनत करून कवाईत माहिती करून घेतली तशी इतर कसरती मास्तरांनें करावें व त्यांनां अकोल्यास येण्याची जरूर आहे असें मला वाटत नाहीं. त्यांनीं कानफरन्सला येण्याची परवानगी असावी अशी एक सूचना आहे ती फार चांगली आहे. बोलावयाचें होतें त्या पेक्षां मी जास्त बोललो ह्या बद्दल मी माफी मागतो. कान्फरन्सचें काम संपलें असें मी सांगतो.


# The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 18, 1889.


## THE SOCIAL REFORM QUESTION.

At the last Congress at Allahabad the promoters of the movement of social reform amongst Hindus took the opportunity of getting together a social conference to discuss social questions. The objections to the Congress movement which is a political movement of a constitutional basis, could take no exception to this movement as it was intended purely to ameliorate the social condition of the people of this country. The leaders of Hindu society had long been thinking of reform in matters social as in other matters; and the ideas of reform were developing coevally. They were perfectly aware that one sided activity and progress would not be durable; it would be placing it on the shifting basis of sand and they were intent on simultaneous development in all departments of progress. Dewan Bahadur Raghunathrow who is himself a very earnest Hindu reformer, had, we suppose, the honor of starting a social conference. At the last year's social Conference at Allahabad, under the presidentship of Mr. Sabhapathy of Madras, it was decided to have provincial associations with a view to promote social reforms. Mr Deorao Vinayak our townsman was honored with the Secretaryship of the Berar Social reform Association; and he has to account at this year's Bombay Social Conference as to what he has been able to achieve during the year. Raosaheb Deorao Vinayak has tried to do a great deal in the matter. A meeting was held at Akola and such as were willing to adopt certain reforms put their signatures to a paper on which the rules had been put down. A similar meeting was held at Amraoti on the night of 13th November when a few more signatures were obtained.

The one great thing that is a block in the way of reform social is the great conservative instinct of the people and the ignorance in which the masses are involved at the present stage of society in this country. The aversion from any thing novel, anything which lies out of the every day beaten routine of life is so great that the orthodox community are not prepared to make any changes in the present social system. The shastras enjoin certain things but even they are not followed in practice, and custom and hard and fast custom is all in all. The people are not prepared to have a change in any thing because of the existence, as they allege, of certain custom. The educated classes are a bit advanced but it is now to be seen how far they are going to commit themselves to the rules proposed and settled by our people here. Now is the time to test the pabulum of the educated classes. Now is the time to see what is the moral strength of this advanced band. In a question like this the readers must remember that any success which they expect to achieve is simply by compromising their views with those of the people amongst whom they live. The go-a-head reform would not do at all. They must remember that they have to secure a hearing from and the sympathy of the masses whom they must carry along with them; and therefore the reforms proposed must be such as would be acceptable to both parties if possible. It is a great mistake to suppose that if the two parties do not agree to a certain age as the marriageable age of their girls and sons, that therefore it is useless to have any idea of social reform. You must ask the orthodox to commit themselves in black and white to some definite thing which they are prepared to accept. Of course that cannot prevent people who choose and who dare to go a bit forward and do something which amounts to a greater reform. But the chief value of an association like this is that it fixes the people down to something and there is a moral influence lent to the whole movement which secures the permance of the reform achieved.

Mr. Dayaram Gidumal Shahani S. C. S. has started a scheme of enlisting members to a company formed of such as are agreed upon certain points of reform. This company is to be registered under the Companies Registration Act and thus legal sanction is to be attached to the rules agreed upon, so that they are enforceable as law in our ordinary Courts. The Poona scheme based on this principle fixes the limit of the marriageable age of boys and girls and curtails the expenditure to be incurred by parties to the marriage. The Akola scheme based on the same model does the same regard being had to the condition of society in Berar. This scheme, it has now been arranged, will be duly inculcated for opinion. The duty of the leaders is to convince the public of the utility of the measures proposed and secure people as members of the Association. The educational department in the province ought, we believe, to be a great help to us in the matter of social reform. The masters in the several towns and villages represent an intelligence more than what is found there and their employers that is the Government will, we are sure, be only too glad to find that they are working in a cause which they could have no objection to and wold like to promote.

## THE OFFICIAL SECRET ACT.

The above act was recently passed by the Legislative Council of India. We might say it at once that there was not the slighest necessity for passing this measure. The reasons given by His Excellency the Viceroy in his speech on the Bill are not such as should have necessitated the measure. The publication in the Patrika of the state document regarding the affairs of Cashmir is not such as should have any way endangered the safety of the Empire. Moreover it was a document not true in all respects. Further the publication of this document was much desired by the public because the avowed policy of the British Government is the protection of the people of India and the preservation intact of the states of the Native Princes. The deposition of the Maharaja of Cashmere was a direct contradiction of this much proclaimed policy. People were naturally auxions to know why should such a good and noble government dethrone a Prince who had apparently done nothing prejudicial to the British interests in India. Could the publication of this document be regarded as newspaper enterprise? Why it is life and soul to the people of India that their princes should be left unmolested that the extent of their territories should be left undisturbed and that the people of India should enjoy all the benefits which Her Majestys subjects are entitled to. Any infringement of this pledge given to them by their rules would be rightly looked upon with suspicion. In this state of entrence suspicion and anxiety the policy of the Government would be the subject of severe criticism, and the publication of the document was only to tell the Government that their policy is not entirely in consonance with the one which is duned into our ears every moment of our existence It is extremely wrong of our Government to be so severe with its subjects because the subject has been successful in pointing out inconsistency in their action. The Pioneer and the Times of India may publish purports of state documents with impunity but the native newspaper writers ought not to do it. This is indeed like enacting one law for whites and another for the blacks. Had Native journals ever attempted to go into the state secrets regarding the out—Indian foreign policy of our Government and that too on occasions more than one, the Government would have been justified in passing the above measure. This publication was brought out in self-defence. The Natives of India ought to learn two lessons from this measure vix—the policy of our rulers is not so pure and fair as we have been tought to believe and that we should be careful and well guarded as regards our actions in respect of our rulers. It would be thousand times better if we direct our attention to self and social improvement than pay into political secrets.

## वऱ्हाड

क. मेकंझी साहेब ज्यु. क. व हायकोर्टचे जज्ज हे येत्या ता. २१ रोजीं रजेवर जाणार व ते आपल्या जागेचा चार्ज क. स्पान्स्की यांस देणार असें ह्मणतात.

मि. मार्शल साहेब ए. अ. क. यांची मलकापूर कोर्टावर नेमणूक झाल्या प्रमाणे ते लवकरच तें कोर्ट सुरूं करतील.

क्याप्टन. डेव्हीस ए. अ. क. इलिचपूर यांस बुलढाण्यास बदलले आणि क्या. डेव्हीस साहेबांच्या जागीं क्याप्टन हेअरची नेमणूक झाली आहे.

मि. आर्देसर दिनसाजी ए. अ. क. यांनीं दोन महिन्यांची रजा घेतल्या मुळें त्यांचे जागीं मि. यासिनखान यांस नेमिलें होतें परंतु क. स्पान्स्की पुन्हा बदलणार ह्मणून ही नेमणूक कायम रहाणार नाहीं असा अजमास आहे.

मार्जी सरसांकरंजगांचे सेक्रेटरी यांचे विरंजीव मि. फरयूमजी अ. क. यांची अकोल्यास नेमणूक झाली आहे.

गाडऊन आस्टीन यांस उमरावतीस पहिला वर्ग अ. क. नेमिलें.


## जाहिरात.

यंदाचे राष्ट्रीय सभेस सभा पाहण्याचे इच्छेनें ज्यांस मुंबईस जाणें असेल त्यांनीं आपलीं नांवें खालीं सही करणाराकडे २४ नोव्हेंबरचे आंत कळवावी.

रंगनाथ नरसिंव्ह मुधोळकर.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं ज्या लोकांचें उत्पन्न ९९ रुपयांचेवर आहे अशा लोकांवर जनरल कमेटीने सन १८८९ ९० साला करितां टॅक्सफंडचा केलेला ठराव तारीख ९-११-८९ रोजीं कायम केला आहे त्या प्रमाणें सर्वांनीं आपापले नांवावर ठराव पाहून ज्यांस अपील अर्ज करणें असतील त्यांनीं तारीख १७-१२-८९ रोजीं जनरल कमेटी भरणार आहे त्याचे पूर्वी करावेत जे नियमा प्रमाणें अर्ज करणार नाहींत त्यांची तक्रार पुढें ऐकिली जाणार नाहीं. कळावें. तारीख १७।११।८९

Hari Ramchandra.,
Secretary
A. M. C


## वर्तमानसार

गेल्या ७व्वेतारखेस सवाळीं १० वाजल्यावर निजाम सरकारचे दिवाण सर आस्मनजाहा हे मुंबई येथें चाळीस मनुष्यासह राजपुत्र यांस भेटण्याकरितां गेले होते.

जर्मनी, आस्ट्रिया व इटली या त्रिकुटास टर्की सामील झाली असें नोवि वेम्याकेंतें ह्मणतात असें लं. तारीख ८ च्या तारिवरून समजतें.

क्रीट बेटांतील लोकांनीं आमचें संरक्षण करा ह्मणून रशियास विनंती केली असें लं० च्या ता. ८ च्या तारेवरून कळतें.

सोमाली किनाऱ्यावरील डर्त फोर्ड बंदरावर जर्मनीनें आपलें निशाण लावलें.

—काश्मीरच्या कौन्सिलरनें माजि दिवाण लछमनदास यांजवर दीड लक्षाची फिर्याद केली आहे त्यांनीं सहा महिन्यांची मुदत मागून घेतली आहे असें समजतें.

राजपुत्र प्रिन्स आलबर्ट विक्टर यांची स्वारी तारिख १५ शुक्रवार रोजीं सकाळीं हैदराबादेस पोंचून रविवारीं रात्रीं दहा वाजतां मद्रासेस जाण्याकरितां तेथून निघेल.

सु० प०

ग्यासलेट तेलानें कपडे धुतले असतां साफ निघतात अशी एक विलायतेस युक्ती निघाली आहे. धोब्याच्या पोटावर पाय येणार!

तिबेटी लोक सरहद्दीवर पुन्हां त्रास देऊं लागले आहेत या लोकांनीं गरवाल सरहद्दीवर आपलें एक नाकें बसविलें असून त्या रस्त्यानें जाणारापासून ते फी घेणार. यांस मागें हाकलून देण्याकरतां लवकरच एक गुरखा फौज पाठविण्यांत येणार आहे.

सरहद्दीच्या पलीकडे सरकारच्या हुकमावाचून कोणी ही जाऊं नये असें हिंदुस्थानसरकारानें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे कां!

प्रिन्स आलबर्ट व्हिक्टर काठेवाडांतही जाणार आहेत.

निरनिराळ्या लोकांपासून धापा देऊन पैसे उपटणारा एक लुच्चा नुकतांच फ्रान्स पोलिसानें पकडला आहे.

इजिप्तांत पुन्हा दंगा सुरू झाला आहे कित्येक फौजेनें बंड करण्यास सुरवांत केली आहे. या फौजेस तेथील गांवकरी मिळाले असून त्यांनीं तेथील स्टेशनावर हल्ला केला. हजारों मनुष्यें ठार मेलीं व तेथील दारूगोळा बंडखोरांनीं लुटला.

विलायतेतील शील्ड नांवच्या शहरीं ट्राम्वे हाकणारांनीं कट केला असून सर्व व्यापार बंद पडला आहे.

झांझिबार येथें पुन्हा दंगा सुरू झाला आहे डा. पीटर नांवाचा व त्याचे साथीदार यास तेथील आरब लोकांनीं ठार मारले साथीदारांपैकीं फक्त एक युरोपियन जगला जिकडे तिकडे या युरोपियनावरच धाड कां?

तांजीरस नांवाच्या शहरीं मूर लोकांनीं मोठा दंगा केला आहे.

एक ह्मातारा मनुष्य ह्मणतो हल्लीं तंट्या ह्मणून जो मनुष्य धरला आहे, तो खरा तंट्या नव्हे. दुसरा एक ह्मणतो, हा खरा तंट्या आहे, परंतु ह्याची फाशीची शिक्षा कायम केली कीं, ह्याच्या जवळ जादुच्या गोळ्या आहेत, त्यांचे सामर्थ्यानें तो पळून जाईल.

टा० अ०

नेटिव राजांचे कैवारी— मि० हिरालाल कुमार नांवाचे एत्तद्देशीय गृहस्थ हल्लीं विलायतेंत आक्सफर्ड येथें आहेत. त्यांस सरलेपेल ग्रिफिन सारखे खाष्ट आंग्लो इंडियन विलायतेस जाऊन नेटीव राजास बद्द करितात हे सहन न होऊन, त्यांनीं ' इंडियन अपील ' नांवाचे एक मासिक पुस्तक नेटीव राजांची बाजू दाखविण्या करितां इंग्लंडांत काढण्यास सुरवात केली आहे. ह्या मासिक पुस्तकाच्या सुमारें २००० प्रती त्यांणी पार्लमेंटाच्या सभासदांस व इतर राजकारणी पुरुषांस वाटल्या व असाच क्रम पुढें ते चालू ठेवणार आहेत, व ह्या पुस्तकाचे खर्चा करितां त्यांनीं आमच्या नेटीव राजापाशीं द्रव्याची मदत मागितली आहे.

अमोलिक अश्व— डर्बी येथील शर्तीतील एका घोड्याची किंमत १४००० पौंड आली. हा घोडा अमेरिकेच्या एका सावकारानें विकत घेतला आहे. घोड्याची किंमत १४०००० रुपये आजपर्यंत दिल्याचें कोठेंच प्रसिद्ध नाहीं. संपत्तीचा ज्या देशांत धूर निघतो आहे त्यांत सगळ्याची किंमत विशेष

गोरे चोर— मि० मलबारी यांची चोरी करणारे दोघे गोरे चोर डेनिंग आणि गॉगिन यांस काल सेशन जज्ज मि. क्रो यांनीं सहा सहा महिन्यांची सक्त मजुरीच्या ठेपा दिल्या.

पूर्णायुजी मनुष्यें— जिल्हा लिंगसुगूर इलाखा निजाम येथून अ.ह्मांस एक गृहस्थ कळवितो कीं, जहागीर गांव मेदीकन हाल येथें सोमप्पा या नांवचा पाटील असून त्याचें वय आज १०५ वर्षांचें अहे. व त्याची बायको त्याह्हून दोन वर्षांची लहान अजजिवंत असून वडील मुलगा ८० वर्षे वयाचा आहे. हा खर्ड्यांच्या लढाईच्या व टिपु सुलतानाच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगतो! पुण्यवान!

झार लोकांची कमाई— अमूर नदीस सैबीरियांतून ज्या नद्या मिळतात त्या नद्याच्या वाळूतून गेल्या २० वर्षांत झार लोकांनीं २६ कोट रुपये किंमतीचें सोनें काढलें असें समजतें. ह्यावरून सोन्याच्या खाणीतून ह्या नद्यांचे ओघ आलेत असें दिसतें.

लोखंड व दगड यांचा एक जीव— करण्याचें एक नवें लुकण काढलें आहे. दगडांत लोखंड बळकट बसवावयाचे असेंत तेडांत राळपातळ करून नीचनविटांचा गाळीव भुगा घालून ती सणसणीत तापवावी. नंतर ज्या दगडांत लोखंड बसवावयाचे असेत त्या भोकांत लोखंड घालून भोकाची रिती जागा भरे इतकें हें लुकण त्या भोकांत भरावें. लुकण थंड झाल्यावर तें लोखंड पूर्ण बळकट झालें असें समजावें. इतर लुकणावर हवेनें जसा वाईट परिणाम घडतो किंवा त्यानें लोखंडाचा जसा खराबा होतो तसा ह्या लुकणानें होत नाहीं ह्मणून हें फार उत्तम लुकण होय.

न्या० सिं०

कायम रहाणारे मामलेदार काफर्ड ग्राह्याच्या तावडीतून सुटलेल्या मामलेदारांची यादी ग्याझेट आफ इंडिया मध्यें छापली आहे ती अशी:—

रा० सा० लक्ष्मण मोरेश्वर देशपांडे.
" " रामचंद्र यशवंत चोबल.
" " देवराव कचेश्वर चिंचोलीकर.
" " विष्णु रघुनाथ केळकर.
" " वासुदेव रामचंद्र पटवर्धन.
" " जनार्दन एकनाथ सहस्त्र बुद्धे.
रा. रा. लक्ष्मण चिंतामण फडके.
" " बाळकृष्ण गोविंद शिंदेकर.
" " गणेश पांडुरंग ठकार.
" " मोरो रघुनाथ बिवलकर
" " सखाराम चिमणाजी जोशी.
" " रामराव हणमंत राजगुरू.

मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकार यांच्या मध्यें पत्रव्यवहार होऊन यांच्या खटल्याची पक्की छान झाली आहे. तेव्हां हे काफर्ड वणव्यांतुन कुंकवासह सुटले तेव्हां बिचारे खरोखरच मोठे दैववान असें म्हटलें पाहिजे. बाकीच्यांच्या दैवाची वाट अद्याप लागावयाची आहे. हें कंटाळवाणें प्रकर्ण एकदां मिटून जिकडे तिकडे स्थीरस्थावर होईल तो सुदीन.

रेलवेचा वेग— विजेच्या जोरानें चालणारी रेलवे तयार होऊन पूर्णावस्थेस आली ह्मणजे रेलवेनें दर तासास ३०० मैल सहज जातां येईल असें ह्मणतात.

नेटिवाची बढती— हल्लीं सरकारचे अडव्होकेट जनरल लाथ्याम आहेत. त्यांनीं चाकरी सोडल्यावर त्यांच्या जागीं ऑ० बद्रुद्दीन तय्यबजी यांची नेमणूक होणार असें इंग्रजीपत्रांत लिहिलें आहे. असें झाल्यास न्यायाचें तोंड उजळ होईल.

निजाम कर्ज काढणार— निजाम स्टेट रेलवे व दुसऱ्या लोकोपयोगी कामांच्या मागण्या करण्याकरितां विलायतच्या बाजारांत निजाम सरकार २५०००० पौंड कर्ज काढणार असें ह्मणतात.

द्रव्याचा ऊत एका धनवान बाईनें महाराणी साहेबाचे चिरंजीव व युवराज प्रिन्स आफ वेल्स यांच्याकडे रजिस्टर पत्र तून १०००० पौंडाच्या ब्यांकनोटी पाठविल्या मला पुरून उतरण्यासारखी संपत्ती माझ्यापाशीं आहे ह्मणून हा पैसा आपल्यास दिला आहे याची माफी असावी असें बाईनें आपल्या पत्रांत लिहिलें आहे. पैशाचा सद्व्यय करण्यासारखीं धर्मकृत्य या बाईस दिसलींच नाहींत कीं काय?

मोठा शोध— युक्लीड साहेबांनीं सिद्धांताची जीं पुस्तकें केलीं त्यांपैकीं कांहीं अगदींच नाहींशीं झाली आहेत. त्यांपैकीं कांहीं पुस्तकांच्या संस्कृत प्रती जयपूर लायब्ररींत सांपडल्या आहेत असें ह्मणतात. यावरून संस्कृतांत असलेल्या मूळ प्रतीवरून युक्लीड साहेबांनीं इंग्रजी प्रती केल्या कीं इंग्रजी प्रतीच कोणी संस्कृतांत भाषांतर केलें याचा नक्की शोध होणें अवश्य आहे.

शु. सू.

गेल्या वर्षीं तीन कोटी रुपये टांकसाळेतून पाडले म्हणतात व ह्या उप्पर तांब्याचें नाणें मुंबईस न पाडतां कलकत्त्यास पाडणार. कारण तिकडे तें काम मुंबईपेक्षां फार सुरव होतें.

क० त०

स्पर्शजन्य रोगाविषयीं कायदा पुन्हा सुरू होणार, परंतु यास नांव मात्र वेगळें मिळणार. लष्करी तळाविषयींच्या नियमांतच स्पर्शजन्य रोगाचा बंदोबस्त करण्यांत येणार.

कागदांत शक्ति किती असते हें पाहणें असल्यास ब्यांक आफ इंग्लंडची नोट घ्यावी व हातांत चुरडावी. नंतर तिच्या एका टोकास १६० शेर वजन बांधलें असतां ती फाटत नाहीं.

येती राष्ट्रीय सभा झाल्यावर कांहीं निवडक लोकांनीं इंग्लंडांत जाऊन सर्व देशभर फिरावें व राष्ट्रीय सभेसंबंधीं भाषणें करावीं. असा विचार चालू आहे.

बर्फाचा थर पडला असतां त्यांत फुलझाडें उगवतात असें समजलें आहे. हीं झाडें एकदोन दिवसच वर्षांतून फुलतात.

परवान्यावांचून फटाकड्यांच्या पेट्या विकूं नये ह्मणून मुंबईची म्युनिसिपालिटी सक्ती करीत आहे.

रशियांत तपासल्यावांचून पत्र जात नाहीं व बाहेर येत नाहीं. तसेंच आतां हिंदुस्थानांत झालें आहे.

आलजेरियांत टोळांनीं फार नासाडी करून सोडली आहे. यांची बाढही विलक्षण. एक टोळीण ८० अंडीं घालते.

पैसे मिळवून त्यांचें पुढें काय करावयाचें हें कित्येकांस न समजल्यामुळें तें द्रव्य संचय करितात, व शेवटीं वेड लागून धोंडे मारूं लागतात.

भ्रमाहून चीनला जाण्याचा रस्ता पुन्हां सुरू ठेवणार. हा रस्ता आज ११-१२ वर्षे बंद पडला आहे.

ज्याला जपान ह्मणतात त्यांत ३००० बेटांचा समावेश होतो.

एकलक्ष रुपये खर्च करून ह्मैसूरचे महाराज विद्यालयाकरिता एक टौलेनंग इमारत बांधणार आहेत.

के०

दिवाण बहादुर रु० रघुनाथराव ह्यांनीं थोडे दिवसांपूर्वीं एक व्याख्यान देतांना " रूढी " या शद्बाची व्याख्या सांगितली ती ही ते ह्मणाले:—

माझ्या मतें ' रूढी ' ही एक राक्षसी आहे. ती विचार, न्याय व राष्ट्रोन्नती यांस खाऊन टाकते. या राक्षसीस जिंकण्यास कशाही सभ्यता, कितीही शिक्षण, कसाही विचार, कोणतीही सुधारणा करण्याचा अवश्यकता, किंवा कोणाचीही धर्मप्रीति अगर देशप्रिती, समर्थ नसते. कोणासही विचारा तुह्मी आपले अंग कां गोंदतां, आपले अवयतांवर डाग कां देतां, आपलें कान कां छेदतां, कोणत्याही विधवेचे तिच्या मर्जी विरूद्ध वपन कां करितां आपली कंबर बारीक कां करितां, आपले पाय लहान कां करितां, उष्णदेशांत काळीज जाळणारा दारू कां पितां? तर याचें ठाम उत्तर तुह्मांला हेंच मिळेल कीं आमच्या देशांत अशी रुढी आहे ह्मणून. शेवटीं ते ह्मणाले कीं, हिंदुधर्म शास्त्रांत रूढीचें प्रमाण सर्वांचे शेवटीं घेतलें आहे. श्रुति, सुक्तें आणि स्मृत्या यांहून रुढीचें प्रमाण कांहीं बलवान नाहीं.

न्या. सु.

√ मध्य प्रदेशांतील टेनन्सी व ल्यांड रेव्हेन्यू हे दोन्ही आक्ट हिंदुस्थान सरकारच्या लेजिसलेटिव कौन्सिलांत पास झाले ते पास होतांना इकडून गेलेल्या शेंकडों मतांचा बिलकूल विचार झाला नाहीं हें पाहून फार खेद वाटतो.

सु० सिं०

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास..........................८४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisements
Below 10 lines... 1R
per line over10... 4 a
Repetition pe line 3A

VOL XXIII AKOLA MONDAY 25 NOVEMBER 1889 NO. 45

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख २५ माहे नोवेंबर सन १८८९ इ० अंक ४५

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं ज्या लोकांचें उत्पन्न ९९ रुपयांचेवर आहे अशा लोकांवर जनरल कमेटीने सन १८८९-९० साला करितां टीनफंडचा केलेला ठराव तारीख ९-११-८९ रोजीं कायम केला आहे त्या प्रमानें कमेटीनें नांवनिसिवार यादी शहरच्या चावडींत लाविली आहे ताजनापेठची ग्रॅनमार्केटांत व सरकारी नोकराची टीन हालांत लाविली आहे त्या प्रमाणें सर्वांनीं आपापले नांवावर ठराव पाहून ज्यांस अपील अर्ज करणें असतील त्यांनीं तारीख १७-१२-८९ रोजीं जनरल कमेटी भरणार आहे त्याचे पूर्वी करावेत जे नियमा प्रमाणें अर्ज करणार नाहींत त्यांची तक्रार पुढें ऐकिली जाणार नाहीं. कळावें. तारीख १७।११।८९

Hari Ramchandra.
Secretary
A. M. C.

NATIONAL CONGRESS.

1. Orders for boarding and lodging for Delegates and Visitors to the coming National Congress will be registered upon 30th November, on payment of Rs. 5 by moneyorder or a reference in Bombay, by Mr. Narain Hari the well-known proprietor of the "Tea and Coffee House, Hindu Hotel, and Hindu Bakery."

2. The registration fee of Rs. 5 will be deducted when settling the accounts.

3. Rates per head for board and lodge.

| Class accommodation per diem | | | Rs | A. |
|---|---|---|---|---|
| I | Do. | Do. | 1 | 8 |
| II | Do. | Do. | 1 | 0 |
| III | Do. | Do. | 0 | 10 |

4. The above rates will be reduced if a sufficiently large number of persons register their names.

5. A few names more than secured at present will enable Mr. Narayan Hari to engage Bunglows or houses in the vicinity of the Congress Mundup.

6. The Delegates and Visitors will kindly communicate to Mr. Narayan Hari, the class of accomodation they want, when they will come down and how long they will put up with him.

Persons coming without registering their names will be charged double the above rates, if rooms be available or will be denied admission for want of accomodation.

7. For detailed particulars regarding board lodging &c. apply to the undersigned enclosing a half anna postal stamp for reply.

8. Every paper both in English and Vernacular which will copy the above advertisement from its next issue until December 25th and send their such copies to the undersigned will be honored free of charge board and lodge for its editor or proprietor for 5 days during the Congress season.

Bombay 10th Novr. 1889.

Narayan Hari
Proprietor Hindu Hotel
Umarkhadi Bombay.

## पाक

साळंमीश्री पाक घेतला असता धातुची मजबुती होउन शक्ती वाढते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस द्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळयास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळयेते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ३० दिवस द्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गांत होणारी आग, तिडाक, धुनापरमा, मेहरोग मूत्र फुष्कळ आणी गढून होते तो, हे रोग दूर होउन धातु शुद्ध होते बळ येते स्त्री संगाची ईछा होते दर दिवस २ तोळे प्रमाणे ६० दिवस द्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळयास येणारी अवारी भोवळ पित्ताचे उपव हे रोग दूर होऊन रक्तशुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेते दरदिवस २ तोळे प्रमाणें ४५ दिवस द्या

वरलिहीलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ०९ |
| ३२ | २ | ०।३ |
| ४८ | ३ | ०।३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज. माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशीव पुणें.—

अकोला जिल्ह्याचे जिल्हा बोर्डाचे मेंबरांच्या नेमणुका झाल्या त्या खालीं लिहिल्या प्रमाणें:—

निवडलेले (३०)

अकोलें तालुका बोर्ड.

१ रा. रा. विनायक नारायण
२ रा. रा. किशनसिंग जयरामसिंग.
३ रा. रा. गोविंदराव लक्ष्मण
४ मि. मिरझा अबासबेग
५ रा. रा. पांडुरंग बापुजी
६ रा. रा. मुगुटराव बळवंतराव.

आकोट तालुका बोर्ड.

७ मि. नुरोदिन व० बाहोदीन काजी
८ रा. रा. बापु व० जानजी पाटील
९ रा. रा. रामराव परशराम
१० रा. रा. किसन व० चंद्रभान
११ रा. रा. मुकुंदराव नंदाजी
१२ रा. रा. गबुसिंग यशवंतराव

बाळापूर तालुका बोर्ड.

१३ रा. रा पोपटलाल परशराम
१४ रा. रा. भावसिंग रामजी
१५ रा. रा. रामराव भगवंतराव
१६ रा. रा. नरसिंगराव मारुतीराव
१७ रा. रा. गणपतराव देवराव
१८ रा. रा. विठोबा व० पुंजाजी

खामगांव तालुका बोर्ड.

१९ रा. रा. आबाराव नानराव
२० रा. रा. सोनाजी भवानी
२१ रा. रा. अजबसिंग महितापसिंग
२२ रा. रा. कृष्णाजी अमरसिंग
२३ रा. रा. शामलाल ओंकारदास
२४ रा. रा. बळवंतराव कानुजी

जळगांव तालुका बोर्ड.

२५ रा. रा. मल्हारराव खुशालराव
२६ रा. रा. शामराव प्रल्हाद
२७ रा. रा. गोपाळ गणेश
२८ रा. रा. पांडोबा विठोबा
२९ रा. रा. [illegible] रामचंद्र
३० रा. रा. दिनानाथ गोपाळ

सरकारांतून नेमलेले मेंबर (६)

१ मि. स्पार्किंग टायर, मेसर्स ग्याडम आणि कंपनी खामगांव यांचे एजंट,

२ मि. आर. एटकिन, एजंट ब्यांक आफ आफ बॉबे अकोला.

३ मि. दत्तात्रय विष्णु वकील अकोला

४ जयकृष्ण बगाजी व्यापारी अकोला

५ मि. खाजाफकुद्दीन जहागिरदार महान

६ मि. सखाराम जयकृष्ण देशपांडे बाळापूर.

उमरावती जिल्ह्याचे जिल्हा बोर्डचे सभासद नेमस्त झाले ते येणेंप्रमाणें:—

निवडलेले मेंबर

उमरावती तालुका बोर्ड

१ रा. रामचंद्र रिनको उमरावती
२ रा. रामराव बाजीराव अंजनगांवबारी.
३ रा. देवराव चंपतराव बडनेरी
४ रा. बक्षीलाल कालीनलाल राहाटगांव.
५ रा. सेख रहिमान उमरावती.
६ रा. रामप्रताप हेमराज उमरावती

मोर्शी तालुका बोर्ड

७ रा. पंढरी रामकृष्ण पिंपळखुटा
८ रा. शिवराम बासुदेव बेलुरा
९ रा. सखाराम राजुजी रायपूर
१० रा. सरुपचंद हजारीमल काटपूर
११ रा. मांजिराम रामलाल खानापूर
१२ रा. गुलाबराव सोनाजी खेड

चांदुर तालुकाबोर्ड

१३ रा. खुशाल रामजी सतरगांव
१४ रा. बाळकृष्ण भास्कर जळके
१५ रा. तुकाराम मंडाजी अंजनसिंगीं
१६ रा. दद्दु लक्ष्मण तिवसा
१७ रा. शंकर सुरेभान गऊळखेड
१८ रा. गोविंदराव अनंदराव अंजनसिंगी

मुर्तीजापूर तालुका बोर्ड

१९ रा. पिरथमजी रामजी गऊळखेड
२० रा. सखाराम यंकोजी कानळेश्वर
२१ रा. गोविंद महादेव बापुरी
२२ रा. वामनराव अनंदराव माहोखेड
२३ मि. दोराबजी कावसजी मुर्तीजापूर
२४ रा. अमृतराव खुशालराव मुर्तीजापूर

सरकारांतून नेमलेले मेंबर

१ रा. तहाशिलदार उमरावती
२ रा तहाशिलदार मोर्शी
३ रा. तहाशिलदार चांदूर
४ रा. तहाशिलदार मुर्तीजापूर
५ रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे उमरावती
६ मि. जोन मोरान उमरावती.

अडिशनल रेसिडेंट साहेबांनीं वरील फेरिस्ताच्या अखेरीस फर्माविलें आहे कीं हा जिल्हाबोर्ड पुढील वर्षाच्या पहिल्या तारखे पासून अस्तित्वांत येईल.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळून असतीलच असें समजू नये

मुक्काम वाशीम ता. २०।११।८९

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० सुमारें एक महिन्या पासून आपल्या भेटीस येण्यास फावलें नाहीं. त्यामुळें वाईट वाटतें. असो. हल्लीं हवा बरी असून पिकें फार सुंदर आहेत. अजून बाजारभावांत फारशी स्वस्ताई झाली नाहीं. हल्लीं रोगराई झाली नाहीं. ताप खोकला कोठें कोठें आहे.

येथें श्री बाला साहेबांचे प्रसिद्ध मंदिरांत गेल्या महिन्यांत चोरांनीं हात शिरकाविला व श्री बालासाहेबाची रुप्याची हजार बाराशे तोळ्यांची प्रभावळी व लक्ष्मीची मूर्ति व इतर कांहीं सामान उपटलें व पलायन केलें असें लोकांना कळल्यावर चोरांच्या धारिष्टा विषयीं विचार करून लोक मोठ्या आचंब्यात पडलें. लहान सहान ठिकाणीं चोऱ्या होतात; तेथें बंदोबस्त कमी ह्मणून होतात असें लोक समजतात. परंतु श्री बालासाहेबाचे मंदिरा विषयीं तसें नाहीं. हें मंदीर ह्मणजे केवळ किल्याच्या भिंती आहेत. सभोंवार बुरूज आहेत तेही मोठे उंच आहेत. दरवाजावर चौकीपहारा असतो आंत गुजराथी, पुजारी व चाकर माणसें अशीं बरींच माणसें आंत असतात. असा बंदोबस्त असतां देवाच्या ठिकाणींही चोर चोरी करण्यास चुकले नाहींत. तेव्हां अशा गोष्टीस काय ह्मणावें हें समजत नाहीं. ह्या चोरीपासून बहुतेक लोकांना वाईट वाटलें. बालासाहेबांची स्थापना होऊन सुमारें १०६ वर्षें झाली. ह्या काळांत श्रीजीवर असा दुर्घट प्रसंग कधींच आला नव्हता. ही चोरी भाऊबिजेचे दिवशीं रात्रीं झाली असें ह्मणतात. ही चोरी करून चोर गेल्यावर पोलिसांचा तपास चालू झाला. पुढें ह्या चोरीचा तपास शेगांवाकडे लागला असें ह्मणतात. कारण ह्या चोरीतील चोर चोरी केल्यावर जिनगीचे वांटे करून कांहींनीं त्यां पैकीं रेल्वे मार्गानें मारवाडाकडे जाण्या करितां आगगाडीचा रस्ता सुधारला. परंतु ईश्वरी लीला विचित्र. त्यांचे कर्माचें पाप उघडकीस आलें व ते शेगांव येथें कांहींजण पकडले गेले. ही बातमी येथें कळल्यावर येथील पोलिसा-

नें त्या चोरांनां येथें आणिलें व ते चोर कबूल होऊन आणखी राहिले चोर पकडले गेले. श्री लक्ष्मीची मूर्ति नाहींशी झाली होती ती चोरांनीं येथून तीन चार कोसांवर शेतांत पुरून टाकिली होती. तीही पोलिसांनीं पत्यांत आणिली. व ती मूर्ति येथें काल रोजीं आणिलेली लोकांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहून त्यांना अत्यानंद झाला. चोरींतील बहुतेक माल येथील पोलिसांनीं पत्यांत आणिला असें ह्मणतात. ह्या कामीं मि. बलदेवसिंग दादासाहेब पोलीस इन्स्पेक्टर व मि. सायना फीफ साहेब या उभयतांनीं अविश्रांत श्रम घेतले व ही चोरी पत्यांत आणिली ह्या बद्दल त्यांची तारीफ जितकी करावी तितकी थोडीच. ईश्वरा असे बाणीदार हुशार पोलिस कामदार यांची चांगली भरभराट कर व त्यांचे हातून लोकांना सुख देऊन त्यांची सुकिर्ति लोकांत वाढीव. अजून हा मुकद्दमा कोर्टांत गेला नाहीं. तिकडे गेल्यावर चोरांना काय शिक्षा होईल तें मागाहून कळवीन.

येथील इं. म. शाळेंतील हेडमास्तर मि. पुरुषोत्तम गणेश केळकर यांची बदली बढतीवर इलिचपुरास झाल्या प्रमाणें ते तारीख १८-११-८९ इसवी रोजीं आपल्या कामावर रुजूं होण्या करितां निघून गेले हे तिकडे अझून कायमचे गेले नाहींत. परंतु थोडक्या दिवसा साठीं तरी वरिष्टांनीं त्यांना तिकडे नेमिलें. व त्यांचे श्रमाची चीज केली. यामुळें वरिष्ठांच्या गुणग्राहीपणाची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच. मि० केळकर येथें ११ वर्षें होते. ह्या काळांत त्यांणी येथील शाळेंत फार सुधारणा केली. ह्यांचे सारखा गंभीर मनाचा उदार शांतवृत्तीचा खऱ्या स्वभावाचा परोपकार बुद्धी या सर्व गुणांनीं हे गृहस्थ लहानापासून मोठ्यापर्यंत आवडते झाले होते. ह्याच्या हाता खालीं दहा बारा असिस्टंन्ट मास्तर लहान मोठ्या पगाराचे होते परंतु ते कधीं कोणाला एक शद्बानें न दुखवितां सरकारी काम मोठ्या सिताफीनें करून घेत असत. ह्यांच्या वियोगानें बहुतांना वाईट वाटेंत परंतु बढतीवर गेल्यामुळें सर्वांना आनंद वाटत आहे. ह्या काळीं बढती मिळणें मोठें कठीण आहे. आधीं जागा खालीं होत नाहींत. तशांत एखादी कधीं खाली झाली तर ताजा दमाचा मनुष्य त्या जाग्यावर आणण्या विषयीं विचार नेहमीं घोळत असतातच परंतु शाळा खात्या विषयीं तसें नाहीं. कारण शाळा खात्यांत केटोचें प्रिन्सिपल लागूं करणारी मंडळी नाहीं (Cato's Principle) ते व्हां ह्या खात्यांतील मंडळीनें बढती विषयीं आशा सोडूं नये. काम चांगलें केलें असतां कधींना कधीं बढती खचीत मिळेल मि. केळकर यांचे जागीं कोणी लिमये नांवाचे गृहस्थ येत आहेत, ते ही चांगले सुशिक्षित आहेत व केळकराप्रमाणें येथें प्रीती संपादन करितील अशी लोकांना उमेद आहे. ह्या जिल्ह्यांत फक्त एकच इंग्रजी शाळा राहिली आहे. तिचें संरक्षण आपल्या बालका प्रमाणें केल्यास ही कांहीं दिवस टिकाव धरील. कारण लोकांना विद्येची अभिरुची मुळींच नाहीं याला एक उदाहरण असें समजण्यांत आलें कीं वार्षिक परीक्षा चालली असतां एक मुलगा परिक्षेस बसला असतांही व परीक्षा चालूं असतां कोणी एक गृहस्थ त्या मुलास जेवण्यासाठीं बोलावण्यास आला व मुलास बोलाऊ लागला. तेव्हां मुलगा सध्यां येण्यास रिकामा नाहीं असें त्यांस सांगितल्यावर ही त्यानें उत्तर केलें कीं मुलगा जेऊन आल्यावर मग उत्तरें देईल अशी येथें विद्येची रुची आहे हे विनंती.

आपला "क्ष"

---

पुसद, वऱ्हाड ता. २०।११।८९

हवामान— अलीकडे चांगलीच थंडी पडूं लागली आहे. ऋतुमानाप्रमाणें सकाळीं व सायंकाळी आंगाला झोंबणारा गार वारा सुटत असतो. आज आकाश आभ्राच्छादीत झालें आहे. ह्यापासून तुरीस अपाय घडेल असें वाटतें. रब्बीच्या पेरण्या अजून सर्व संपल्या नाहींत. खरिपाची पिकें अद्याप पक्कीं उत्तम आहेत.

मे. तहशिलदार साहेब यांची स्वारी तालुक्यांत गेली होती ती २ दिवसापूर्वीं परत आली. सिव्हिल सर्जन साहेब दवाखान्याची तपासणी करण्यास आले होते ते परत गेले.

अकोले येथून रा. देवराव जी वकील यां जकडून सामाजिक सुधारणे संबंधीं नियम आले होते. त्यांचा विचार करण्याकरितां येथें दोन दिवस गांवांतील लोकांची सभा झाली. तींतील कांहीं नियम येथील लोकांस पसंत पडले, कांहीं कित्येकांस पसंत पडले नाहींत माझें मतें हें सर्व नियम उत्तम आहेत. आतां हे पाळिले ह्मणजे कांहीं अडचणी येतील त्या सोसिल्या पाहिजेत. हे नियम धर्मा विरुद्ध अगदीं नाहींत तरी येथें एक शंका निघाली होती कीं, हे श्रीमत् शंकराचार्यांनीं मान्य केलेले असते ह्मणजे उत्तम होतें. माझ्या मत हे नियम श्रीकडे व श्रीक्षेत्रीं मोठमोठ्या विद्वान पंडितांकडे पाठवावी व त्यांची संमति मिळवावी. ती मिळण्यास कांहींच अडचण पडणार नाहीं. असें झालें ह्मणजे जुन्यामताचे दुराग्रही जे लोक आहेत त्यांस हे मान्य होतील. तरी अकोलेकर मंडळीस माझें हात जोडून इतकेंच सांगणें आहे कीं, त्यांनीं ह्याचा अवश्य विचार करावा. व शास्त्री लोकांची ह्यांस अनुकुळ अशीं मतें मिळवावी. येथील तहशिलदार रा. रा. दादासा० यांनीं सामाजिक सुधारणे संबंधीं नियम समजावून देण्याचे कामांत व त्यासंबंधीं सभा भरवून चर्चा करण्याचे कामांत बरेंच लक्ष घातलें त्या बद्दल ते स्तुतीला पात्र आहेत.

येथील शाळेंत घड्याळ नाहीं ह्मणून गांवांतील सावकार लोकांनीं वर्गणीनें २१ रुपये जमविले व शाळेकरितां एक घड्याळ आणि एक तास विकत घेऊन द्यावयाचा ह्मणून ठरविलें. वर्गणी देणारांचीं नावें पुढें सवडीनुसार कळवीन. येथील मराठी शाळागृहास कंपाउंड नसल्यामुळें गुरांचा मोठा उपद्रव होतो.

गांवांतून कचेरीपर्यंत जी सडक केली आहे ती ह्या बरसातींत वाहून गेली आहे तिच्या दुरस्तीची अद्याप कांहीं व्यवस्था झाली नाहीं

काल रोजीं राष्ट्रीय सभेचे काय उद्देश आहेत हे समजून सांगण्याकरितां मंगरुळपीर येथून रा. लक्ष्मण आत्माराम महाजन हे आले होते. ह्मणून काल सायंकाळीं ५ वाजतां लायब्ररींत गांवकऱ्यांची सभा झाली तींत फयाजुद्दीन काजीसा० हे अध्यक्षस्थानीं होते. सभेच्या कामास सव्वापांच वाजतां सुरवात झाली. रा. लक्ष्मणरावांनीं राष्ट्रीय सभेचे उद्देश व तिची सर्व हकीकत सांगतली आणि त्यानंतर एका गृहस्थानें सुरस व चटकदार भाषण केलें यंदाच्या सभेकरितां ह्या तालुक्याचे वतीनें कांहीं मुक्त्यार मुंबईस पाठवावें ह्मणून सूचना केली. त्याप्रमाणें रा. गोविंदराव व्यंकटराव राजे उदाराम, मे. फयाजुद्दीन काजीसा० रफ्युद्दीनजी सवदागर व लक्ष्मणराव आत्माराम ह्यास मुक्त्यार पाठवावयाचे ह्मणून ठरलें. शेवटीं पानसुपारी वाटणें झाल्यावर "राणी सरकारचा जयजयकार असो" असें ह्मणून सभा विसर्जन झाली. रा. लक्ष्मणरावांनीं हे दुसरे तालुक्यांतून येथें येऊन येथच्या लोकांस ह्या गोष्टी सांगितल्या, हें त्यांस मोठें भूषणार्ह आहे. त्यांचा ह्या तालुक्यांतील मुख्यगांवीं म्हणजे उमरखेड व मुळावें ह्या गांवीं जाण्याचा उद्देश आहे व त्या प्रमाणें ते आज रोजीं उमरखेड येथें निघून गेले कळावें.

आपला "क्ष"

---

वऱ्हाडसमाचार.

मिति मार्गशीष शुद्ध ३ शके १८११

## तीस वर्षांतील व्यवस्था

हिंदुस्थानचा राज्य कारभार इ. स १८५७पर्यंत कंपनी सरकारा कडेस होता. ह्या सालीं सर्व हिंदुस्थानभर जें मोठें बंड झालें त्याचा समूळ मोड करून जिकडे तिकडे शांतता केल्यावर राणी सरकार व पार्लमेंट यांनीं हिंदुस्थानच्या राज्य व्यवस्थेचें सूत्र खुद्द आपल्या हातीं घेतलें. या गोष्टीस एक पिढी म्हणजे तीस वर्षें होऊन गेलीं. एवढ्या काळांत हिंदुस्थानवर राज्य व्यवस्थेचे परिणाम काय काय झाले या संबंधानें स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं आपलें मिनीट थोडक्यांत लिहून ठेविलें आहे तें असें ते म्हणतातः—

इ. स. १८५८ चा हिंदुस्थानचा नकाशा पहा आणि इ. स. १८८९ सालचा हिंदुस्थानचा नकाशा पहा या दोहोंत तुम्हांला तफावत बिल्कुल दिसणार नाहीं त्या वेळीं जो आमचे कडेस हिंदुस्थानचा भाग होता तितकाच आतां ही आहे. तेव्हां पेक्षां जास्त संस्थानें खालसा करण्यांत आलीं नाहींत. नाहीं म्हणण्यास भूतानच्या डोंगराळ प्रांताच्या पायथ्या कडील प्रदेश व केटा सभोंवतालचा प्रांत केवळ सरहद्दीच्या संरक्षणा करितां घेणें जरूर होतें. ब्रह्मदेश तर आमच्या गळ्यांत बळजबरीनें बांधला. परंतु वास्तवीक पाहतां हा प्रांत हिंदुस्थानचा भागच नव्हे आतां जीं जीं संस्थानें तेथील राजपुत्र अज्ञान असल्या मुळें आमच्या ताब्यांत होतीं तीं संस्थानें ज्याचीं त्यास देण्यांत आलीं वचन भंग न करता सर्व संस्थाना पेक्षां ज्याचा वसूल जास्त असें म्हैसूरचें संस्थान तेथील मूळच्या राज घराण्यांतील पुरुषाचें स्वाधीन केलें. त्या प्रमाणेंच बडोदें संस्थानचे राजास पदच्युत केलें असतां तें संस्थान पुन्हा त्याच घराण्यांतील पुरुषाच्या ताब्यांत दिलें.

आतां आतील व्यवस्थे संबंधानें पहा. इ. स. १८७१ सालीं जी लोक संख्येची गणती केली व त्या गणतीची इ. स. १८८१ सालीं जी फेर तपासणी झाली त्या वरून एकंदर लोक संख्या किती, त्यांत पुरुष किती व बायका किती, त्यांच्या भिन्न भिन्न जाती कोणत्या, त्यांचे निरनिराळे धर्म कोणते, ते कोणकोणते धंदे करितात, दाट वस्ती कोणते प्रांतांत, पातळ वस्ती कोणते प्रांतांत, वगैरे पुष्कळशा गोष्टींचा उत्तम खुलासा झाला आहे. लोकांची आमदानी वगैरे वस्तुतः कशी आहे याची फार काळजीनें चौकशी करून खुलासेवार सर्व हकीकतीचा रिपोर्ट करण्या कडे सरकारचें लक्ष लागलें आहे. प्रजेच्या सुख दुःखाची कारणें काय आहेत या विषयीं शांतपणानें सरकार विचार करित असल्या मुळें असलेलीं दुःखें आतां लवकरच काढून टाकतां येतील असा भरंवसा आहे. लोक हिता करितां व शास्त्र ज्ञान प्रसार व्हावा म्हणून पीक पाण्याचे तक्ते, धान्याच्या भावचे रिपोर्ट, व्यापारांतील चळवळी व जन्म मरणाचे रीपोर्ट हमेशा छापून प्रसिद्ध होत असतात. कामाचा बंदोबस्त उत्तम व्हावा म्हणून, व हिंदु करितां हिंदुस्थानांत ही हमेशा चालत असलेली ओरड ऐकून बिनसनदी नोकराच्या मोठ मोठ्या पगाराच्या जागा युरोपियन अगर युरेशीयनांस न देतां नेटिव्ह लोकांना देण्यांत येत आहेत. निरनिराळ्या खात्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांना स्वतंत्र अधिकार दिले आहेत. व या खात्यांचीं कामें सुमारें दसपट वाढलीं आहेत. पैशा संबंधानें खर्च वगैरे करण्यास स्थानिक सरकारास आपआपल्या ताब्यांतील पैशाचा व्यय करण्याचा अधिकार स्वतंत्र रीतीनें दिला आहे. न्यायाधिशांनां समरी चौकशीचे अधिकार ठेविले आहेत. म्युनसीप्यालिटी व डिस्ट्रीक्ट बोर्ड यांजवर स्थानिक कामांचा बोजा टाकल्या मुळें तीं कामें सुरळीत चाललीं आहेत.

कायद्याच्या व्यवस्थे संबंधानें हिंदुस्थानाला मोठा फायदा झाला आहे. जमीनीच्या वसूला संबंधानें प्रत्येक स्थानिक सरकारचा निरनिराळा कायदा आहे. तसेंच प्रत्येक खात्यांत त्यास लागू पडतील असे नियम केले आहेत. हे कायदे फार स्पष्ट असल्यामुळें काम चालविण्यास फार सुलभ मार्ग झाला आहे. पुष्कळ नेटिव्ह लोक इनसाफाचे कामावर नेमिले आहेत. ते आपलीं कामें फार शहाणपणानें व इमानानें करीत आहेत. सुप्रीम कोर्टें मोडून त्यांच्या जागीं हायकोर्टांची स्थापना केली आहे. प्रत्येक प्रांतांत दिवाणी व मुलकी कामें एकत्र न ठेवितां तीं वेगळीं वेगळीं केलीं आहेत. त्यामुळें दोन्ही कामांचा बंदोबस्त उत्तम तऱ्हेनें चालला आहे. फौजदारी कामगार व पोलीस कामगार हे एक नसून यांचे ही अधिकार वेगळे वेगळे आहेत. पोलीस खात्यांत मात्र अजून पुष्कळशी उणीव आहे. व त्या खात्यांत सुधारणा होणें जरूर आहे. खरा तपास लागण्यास अजून फारसा मार्ग काढलेला नाहीं. बहुतेक भरंवसा कैद्याच्या कबुलायतीवरच ठेवावा लागतो पुरावा मिळविण्या करितां उन्हांत फिरण्याचे श्रम करण्या पेक्षां मारून ह्मणून एखाद्या

कबूल करविणें हें काम फारच सोपें आहे. तथापि यांत ही हळु हळु सुधारणा होत चालली आहे व डाके, खून, घरफोडी रस्ते लूट वगैरे अपराधांची संख्या बरीच कमी होत आली आहे. तुरुंगाच्या व्यवस्थेंत फारच सुधारणेचे फेरफार झाले आहेत या मुळें कदाचित् कैद्यानां आपणास शिक्षा झालीच नाहीं असें भासण्याचा संभव आहे.

आमच्या अंमलाखालच्या प्रांतांत शांतता व व्यापार नटिपणें चालावे ह्मणून आह्मी सदोदीत उद्योग करीत असतां आह्मी नेटीव संस्थानाकडे बिलकूल दुर्लक्ष्य केलें नाहीं. ह्या संस्थानांतून जे पोलिटिकल रेसिडेंट नेमिले आहेत ते आपल्या वजनानें व आपल्या शुद्ध आचरणानें ज्या सुधारणांच्या योगानें राष्ट्रास चांगलेपणा येतो अशा सुधारणाकडे संस्थानिकांचें लक्ष्य वेधित आहेत. त्यांना आपला वसूल उधळेपणानें खर्च न करूं देतां त्या वसुलाचा उपयोग ज्या मुळें लोकांची स्थिती सुधारते, खटल्यांची चौकशी वक्तशीर व व्हावी तशी होते, विद्या वृद्धि होते, इमारती, तळीं, विहिरी, तलाव वगैरे लोकोपयोगी कामें होतात, व्यापार वाढतो, वगैरे सर्वोपयोगी कामाकडेस करण्यास त्यांना प्रवृत्त करणें हे काम कांहीं लहान सहान नव्हे. हल्लीं असें एकही संस्थान नाहीं कीं जेथें थोडी बहुत तरी सुधारणा झाली नाहीं. नवीन सडका झाल्या आहेत. आगगाडीचा मार्गही झपाट्यानें सुरूच आहे व्यापाराच्या संबंधानें मनाई दूर करण्यांत आली आहे. पूर्वी जसा अन्याय होत असे तसा होणें आतां अगदीं बंद झालें आहे. मीठ, अफू, दारू व इतर मद्य या संबंधानें आमच्याशीं त्यांचे जे करार मदार झाले आहेत ते फार समाधानकारक आहेत. ह्मणून या बाबतींत आह्मांस फारसा हात घालण्याचा प्रसंग येत नाहीं. बंडाचे सालीं आह्मांस तोबरा मिळाला तो आह्मी विसरलों नाहीं. पूर्वी गोरी फौज ४०,००० होती ती आतां ७२,००० केली आहे काळी फौज २,५०,००० होती ती आतां कमी केली आहे ह्मणजे फक्त १,५२,००० आहे. एकंदर १०३ तोफखाने आहेत. त्यांपैकीं ८८ वर गोरे लोक आहेत.

---

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 25, 1889.

## VERNACULAR LANGUAGES.

A few days ago an announcement appeared in the papers that Vernaculars of India were introduced in English Universities. Professors qualified to teach one or the other vernacular were appointed to give lessons in them. This announcement is of itself sufficient to put the people of this country to shame for their unaccountable negligence in this respect. It is a matter of every day experience that we meet in our daily transactions people speaking different dialects prevalent in this country. In Courts books of account written in various characters are often brought for the inspection of Courts, and great difficulty is often experienced in deciphering them. Railways having been made accessible almost to all even to such as live in the districts far away from the centres of civilization, have facilitated travelling on the whole continent of India. The Maratha meets with the Punjabee and civilities are exchanged between them. The Bengalee on his way to England has to pass through Bombay and comes in contact with people speaking Gujrathi language. The Madrasee while travelling in outlying districts of Kattywar finds it an enormously difficult task to make himself sufficiently intelligible in respect of things most essential to his very existence. Travellers from Madras have often to take an interpreter with them when they travel in Northern India. No doubt knowledge of English has made things more tolerable than before in regard to persons who have acquired that language. But it must be clearly understood that English language is not and ought not to be expected to be, in the long future, the language of the whole continent. Under these circumstances it is a matter of great regret that people of this country should not stir themselves up in finding out means to learn one or the other of the many important languages obtaining in this country. Matters appear worse when we take into consideration the fact that when hundreds of educated people gather in assemblies such as those of the National Congress, this vital question should not occur to them. Pandita Ramabai in her recent lectures on America has very rightly blamed the leaders of Indian society in not using vernacular in their meetings of the Congress. The use of the English language prevents a major portion of the Indian population from taking any abiding interest in the Congress movement.

In a town like Bombay in all schools of all descriptions knowledge of Marathi and Gujrathi should be made compulsory. To come nearer home, it is a matter of surprise and still no body seems to have thought about it, nor even the Educational conference of the Province that Hindi has not been introduced in schools of primary character in the whole of Berar. People do essentially require it. The Central Provinces and the Nizam's Dominions are in close proximity to the Berars. Excepting a few Marathi and a few Hindu stani Districts, the language of Central Provinces is Hindi pure and simple. Hindustani written in Arabic characters is slightly different from Hindi. Hindustani or Urdu is the language of Moglai Dominions. Beyond the Central Provinces lie the Districts of the N. W. P. In those districts the prevalent language is Hindi or modified Urdu. Thus it becomes a matter imperative necessity for the people of Berars to acquire some knowledge either of Hindi or Urdu. But strangely enough these important languages are not taught in schools, along with the language of the country. It is a wholesome rule in the Presidency of Bombay that pure Urdu schools are required to teach along with it, a knowledge of Marathi. If we mistake not the same rule obtains here. If so, why not extend the rule to pure Marathi schools and make them teach either Hindi or Urdu as required by the people. The educational conference ought to have taken this subject in hand and discussed it in all its bearings. But engrossed as we are with matters not important to us or at any rate not within the range of probabilities, vital questions such as these are passed over in silence. In the Universities of India there ought to be introduced for higher degrees subjects such as knowledge of modern languages of India. In almost all English and European Universities there are chairs founded for teaching modern European languages; and degrees are conferred upon persons who make modern European languages as their special study.

Upon this plan, it appears Indian Vernaculars are to be introduced in English Universities and the London University, if we mistake not, has taken the lead in the matter. While we in India to whom our vernaculars are more important than they are to Englishmen in England, drag away the length of our existence without trying to secure things such as these and making the world better than we found it ourselves for our future generations. This subject is worth the consideration of our social conference that is shortly to be held in December next at Bombay. Will some gentleman from Berar take it up and introduce the same there? We shall feel highly grateful to him.

## THE VICEROY ON EDUCATION.

Lord Lansdowne, the present Viceroy of India, in his reply to the address accorded to him at Peshawar by the Afghan Church Mission thus said:-

"If I could venture to give you a word of advice on an occasion like the present, I should be inclined to ask you to remember that education in the true sense of the word means a good deal more than book-learning, and that your object should be to obtain while you are studying here that larger kind of education which consists not merely in proficiency in your school work, but in the organisation of those qualities which are indispensable in order to make either a good schoolboy or a good citizen. Loyalty, respect for authority, modesty and self-respect, truthfulness (I see the words honor and truth written upon the scroll which decorates the wall above your heads) and a keen sense of honour- these are lessons which no amount of reading will teach effectually unless it be supplemented by other influences."

These remarks of the Viceroy are worthy of careful consideration. The present educational status of native youths does not come up to what it ought. This is mainly owing to the radical defect that underlies the system of education that is at present prevalent in India. Certain books on different subjects are prescribed to be taught in schools and teachers think it their chief duty to make their students cram those books irrespective of other considerations. Education in its true sense of the word is the proper development of all the mental faculties and "consists in the organization of those qualities which are indispensable in order to make either a good schoolboy or a good citizen." Teachers and students should carefully bear in mind the above remark made by the Viceroy and should try as far as possible to come up to the ideal standard pointed out by Lord Landsdowne.

---

Mr. Girrao Ramchandra Tahsildar at Amraoti is transferred to Elichpur. We think the change was desirable in the interests of the public. Mr. Girrao was a hard working man but when a man in a Tahsildar's position stays in a Taluka for years past, friendships and dislikes grow up naturally enough and we think the present transfer was therefore opportune. In the Bombay Presidency the transfers are made at stated periods and it is understood that officers are not to be allowed to stay very long in particular places. Mr. Krishnaji Hari's and Mr. N. P. Joshi's transfers are consequent on the above transfers. Both officers were popular and it is to be hoped that they become equally popular where they go.

## वऱ्हाड.

'ब्रहिमन्जी धर्मशाळें'त काल रोजीं 'राष्ट्रीय सभे' साठीं मुखत्यार निवडण्या करितां जाहीरसभा भरली. त्यांतील विशेष गोष्टि पुढील अंकीं नमूद करूं.

क्याप्टन् सी. जे. बी. एच्. ड्रेस्नर साहेब यांस बुंदेलखडांतून वऱ्हाडांत आसि० कमिशनर वर्ग ३ नेमिलें आहे. लष्करी खात्यांतली कर्नल, क्याप्टन मंडळीची वऱ्हाडांत भरती करितांना मधून मधून नवीन नेमणुकीचे वेळीं तरी कांहीं सिव्हिलियन घेतील तर आमच्या प्रांताचें विशेष कल्पाण होणार आहे. आमच्या लिहिण्याचा मुद्दा विशिष्ट व्यक्तीस अनुलक्षून नसून सर्व साधारण आहे. तशांत क्या. ड्रेस्नर आह्मांस अगदींच अनोळखी आहेत. तेव्हां भलता संशयही येणार नाहीं.

आमचे मित्र रा. रा. गंगाराम आत्माराम सबनवीस यांची उमरावती हायस्कुलांतील चवथे असिस्टंटचे पन्नास रुपये पगावर बढती झाली हें कळविण्यास आनंद वाटतो. यांचा अभ्यास दुसऱ्या बी. ए. च्या परीक्षे पर्यंत झालेला आहे तेव्हां हायस्कुलांतल्या जागीं ही नेमणूक झाली हें फार बरें झालें.

मि. शमसुद्दीन अलिखान बहादूर असि. कमि. यांस फर्स्ट क्लास माजिस्ट्रेटचे अधिकार दिले आहेत.

रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर ए. अ. क. यांस असि. कमिशनरचे सर्व रेव्हिन्यु अधिकार मिळाले आहेत.

गेल्या शुक्रवारच्या 'प्रमोद सिंधू' वरून कळतें कीं श्रीअंबा जत्रा व गुरांचें प्रदर्शन हीं दोन्ही सुयंत्रपणें मि. इलियट साहेबांनीं सुरू केली. प्रदर्शना साठीं घोडा फार थोडा आला आहे हें ठीक नाहीं.

रा. रा. पुरुषोत्तम गणेश केळकर हे परत वाड्याचे हेड मास्तर रा. रा. सदाशिव गोविंद दामले यांच्या सहा महिन्यांच्या रजेत काम करण्यासाठीं गेल्या मंगळवारीं येथून रवाना झाले.

रा. रा. पांडुरंगपंत लिमये हेडमास्तर इलिचपूर यांची वाशिमास बदली झाली आहे. 'प्रमोदसिंधु' कर्त्यांनीं यांच्या मुनसिपाल कामाची बाखाणणी केली आहे ती ऐकून आम्हांस फार संतोष वाटतो.

## जाहिरात.

या नोटीशीनें आकोले येथील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, टॅंक्ल बगीच्या जवळ जो सार्वजनिक पायखाना आहे त्याच्या पश्चिमेस एक त्रिकोनाकृति तुकडा आहे त्यांत राकआईल व पेट्रोलिअयम तेल ठेवण्या विषयीं योजना केली आहे. जे व्यापारी लोक तेथें जागा मिळण्या करितां अर्ज करितील त्यांना सोयस्कर असें नंबर पाडून भाड्यानें दिले जातील.

त्या प्रमाणेंच मुनिसिपल कायद्याच्या कलम ११४ तील पोट नियम (२) प्रमाणें जी लायसन्सें कमेटी देईल त्या प्रत्येक लायसन्साला दरसाल पांच रुपये फी द्यावी असा कमेटीनें ता. १२ माहे मजकुरीं नियम केला आहे.

अकोला
२४-११-८९

Krishnaji Malhar
Secretary.
A. M. C.

## वर्तमानसार.

गवळ्यांच्या शाळा— हिंदुस्थानांत दुधदुभतें पुष्कळ आहे. परंतु त्याची योग्य व्यवस्था होत नाहीं असें दिसल्यावरून मि. एच. ए. हैामन यांनीं गवळी लोकांसाठीं शाळा स्थापन करण्याचें हिंदुस्थान सरकारास सुचविलें आहे. मलई काढणें, लोणी काढणें खवा करणें, चक्का दही तयार करणें, इत्यादि कामें त्रेतायुगापासून चालत आलेल्या रितीनें होत असतात परंतु यांत्रिक कलेचें ज्ञान वाढत गेल्यानें दिवसानुदिवस सर्व व्यवहारांत सुधारणा होणें जरूर आहे. मलई काढल्यानंतर दुध पांचट होतें लोणी दुधाच्या मानानें निघावें तितकें निघत नाहीं, दही चांगलें होत नाहीं, दुधदुभत्याला वास मारतो वगैरे अनेक गोष्टी घरोघर अनुभवास येतात. दुधदुभत्या संबंधानें आपल्या सूपशास्त्रावरील कांहीं लहान मोठ्या ग्रंथांत पुष्कळ उल्लेख आहेत परंतु त्यावेळीं यंत्रांचा उपयोग होत नव्हता यंत्रविद्येचा प्रसार होत जातो तसतशीं मनुष्यांचीं सुखसाधनें वाढलीं पाहिजेत. तदनुसार गवळ्यांच्या शाळा स्थापित होणार आहेत हें पाहून पुष्कळांस आनंद होईल वरील गृहस्थ हैामन साहेब मुंबईहून लवकरच आपल्या लोकांच्या दुधदुभतें तयार करण्याच्या चालीरीती पाहण्यासाठीं पुणें शहरीं जाणार आहेत.

नेटिवावर मेहर— अखेर सिव्हिल सराव्हिसच्या वयाच्या अखेरची इयत्ता एकवीसावे वर्षापासून तेविसावे वर्षापर्यंत ठरल्याप्रमाणें सिव्हिल सरव्हिसची नवीन परीक्षा सन १८९२ सालीं एप्रिलच्या पहिल्या तारखेस नेमस्त केली आहे. उच्च उच्च प्रतीच्या जागेस नेटीव लोक सर्व प्रकारें लायक आहेत हें स्पष्टपणें सिद्ध करून दाखविण्यास संधी मिळाली हें आमचें मोठें भाग्य होय.

हिंदुस्थानचे कैवारी मि. ब्राडला साहेब पुढील महिन्यांत इंडियांत आल्यानंतर अवघे बारा चौदा दिवस राहणार आहेत. एवढ्या अल्पकाळांत आमची वस्तुस्थिती कळणें मोठें दुरापास्त आहे. खेरीज ब्रह्मदेशांतील बेबंद नगरी थिबाच्या पदच्युती बरोबर संपली आणि आज चार वर्षे इंग्रजी राज्याच्या अमदानीस सुरवात झाली हें प्रत्यक्ष पाहण्याचा मि. ब्राडला यांचा बेत होता परंतु तो सध्यां तहकूब राहिला आहे. साहेब मनकुरांस राष्ट्रीय सभा कितपत पसंत पडते तें पाहावें.

योग्य पात्रीं पदवीदान— पंजाब युनिव्हरसिटीनें व्हाइसराय लार्ड लांसडाउन यांस उद्यां मंगळवारीं 'डाक्टर आफ लिटरेचर' (महापंडित) ही सन्मानदर्शक पदवी देण्याचें ठरविलें आहे. व्हाइसराय साहेबांचा कोणता पांडित्यप्रकर्ष युनिव्हरसिटीच्या दृष्टोत्पत्तीस पडला तो नकळे!

'विधवावपन निषेध' रा. रा. व्यंकट रंगो कट्टी (धारवाड) यांनीं प्रतिपादिला आहे आणि त्यांचें साधार खंडण करणाऱ्यांस हजार रुपये बक्षीस लाविलें आहे. त्यावर बक्षीसाचा अव्हेर करून नागाठण्याहून वे. रा. रा. सदाशिवभट सखंभट वैशंपायन यांनीं खालील उत्तर सर्व वर्तमान पत्रांनीं प्रसिद्ध करण्यासाठीं छापविलें आहे:—

व्याससमृतिद्वितीये अध्याये ॥ मृतभर्तार मादाय ब्राह्मणी मान्नि माविशेत ॥ ब्राह्मणी त्यक्त.केशाच तपसा शोषयेद्वपुः ॥ या स्मृतिवाक्यावरून ब्राह्मणी स्त्रियानीं पतिमरणोत्तर सहगमन विधिपूर्वक पतीच बरोबर अग्नींत देह अर्पण करणें किंवा देह शुध्यर्थ यथा यथाकालीं केशवपन करवून निरंतर स्वधर्माचरणानें वागून कालक्रमण करणें ॥ विधवा-धर्मः ॥ मदनरत्ने स्कांद ॥ विधवाकबरी बंधो भर्तु र्बंधाय जायते ॥ शिरसोवपनं तस्मात्कार्यं विधवयासदा ॥ एकाहारः सदाकार्यो न द्वितीयः कदाचन ॥ मासोपवासो वाकर्य श्चांद्रायण मथापिवा ॥ पर्यंकशायिनी नारी विधवा पातयत्पतिं ॥ नैवांगोद्वर्तनं कार्यंस्त्रिया विधवया कचित् ॥ गंधद्रव्यस्य संभोगो नैवकार्य स्तथा पुनः ॥ तर्पणं प्रत्यहं कार्यं भर्तुस्तिलकशोदकैः ॥ तत्पितुस्त त्पितुश्चापिनाम गोत्रादिपूर्वकं ॥ नाधिरोकदुन हद्दंप्राणैः कंठगतैरपि ॥ कंचुकंननारीदध्याद्वा सोनविकृतंवसेत् ॥ वैशाखे कार्तिके माघे विशेषनियमं चरेत् ॥ प्रश्नेतः ॥ तांबूलाभ्यंजनं चैवकांस्य पात्रेच भोजन ॥ यतिश्च ब्रह्मचारीच विधवाच विवर्जयेत ॥ वरील वाक्यावरून विधवा स्त्रियांनीं बारमाहा वपन करवून निरंतर एकवार भोजन, एकादशादि नित्योपवास नियम भूमिवर निजणें, सुगंधादि द्रव्याचा उपभोग न करणें अपुत्रवतीनें तर्पणादि करणें बैलाचे गाडींत न बसणें अंगात चोळी वगैरे न घालणें तांबूलभक्षणन करणें तैलाभ्यंगोपचाराचे अंगीकरणें न० निद्यपात्रांत भोजन न० नित्यशः ब्रह्मचर्यादि स्वधर्माचरणानें वर्तन करणाऱ्या विधवा स्त्रियांना इहलोकीं यश प्राप्ती होऊन अंतीं सुख प्राप्ती होईल याविषयीं व्यास वचनादि वाक्यांवरून सिद्धच आहे तर आपला धर्म सोडून स्वधर्मानें आचरण करणें बरोबर नाहीं !! मी यथामतीनें निर्णय जाहिर केला असे विशेष विचार करणें सूज्ञाकडे आहे. कळावें हे विनंती ॥

पु० वै०

आफ्रिका खंडांतील मोठमोठ्या रानांमध्यें प्रवासी जनांला पाणी मिळत नाहीं. अशा स्थळीं परमेश्वरानें झाडापासून मनुष्यांस पाणी मिळावें अशी योजना करून ठेविली आहे. जेव्हां कोणेकास तहान लागते तेव्हां त्या रानांत आढळणाऱ्या एका जातीच्या झाडाला चाकूनें खांच करावी, आणि खालीं भांडें धरावें म्हणजे त्यांतून पाणी निघाल्या प्रमाणें स्वच्छ पाण्याची धार लागून भांडें भरतें, आणि त्याच्या योगानें ऊष्णतेच्या आणि तृषेच्या त्रासापासून मनुष्य मोकळा होऊन शांत होतो. असें आम्हीं वारंवार वाचीत असतों. त्या झाडाला प्रवाशांचें झाड किंवा पाण्याचें झाड म्हणतात. त्याच्या आकृति पुस्तकांमध्यें आढळतात. पण तीं झाडें आमच्या या मुंबईमध्यें बरीच आहेत, हें कितीकांना तरी ठाऊक असेल! एथील राणीच्या बागामध्यें आपण शिरलों, म्हणजे अमळ आंत गेल्यावर तें एक मोठें वर्तुळाकृती स्थान लागतें, त्याच्या सभोंवतीं सद्दरींनीं नारळीच्या झाडांसारखीं दिसणारीं आणि केळींच्या पानांसारखीं पानें असणारीं जी पांच सात झाडें दिसतात तींच हीं पाण्याचीं झाडें. वि० ज्ञा० वि०

आपले भावी राजे प्रिन्स आफ वेल्स म्हणजे राणीचे वडील पुत्र हे इजिप्त देशांत प्रवासास गेले होते ही गोष्ट फ्रेंच लोकांस नापसंत झाली व त्या बद्दल यांणी वेगळ्या त्या कोल्या केल्या हें पाहून इंग्लंडचे हल्लींचे मुख्य प्रधान लार्ड सालीसबरी याणीं मागच्या शनवारीं मानशन राजवाड्यांत जें एक भाषण केलें त्यांत त्या कोल्या करणाऱ्या फ्रेंच लोकांस उद्देशून ते म्हणाले कीं इंग्रजांना इजिप्त देश सोडून देण्याची वेळ अजून आली नाहीं. कारण मावीच्या पक्षाचे लोक तयारी करून कोणत्या वेळीं सरहद्दीवर हल्ला करतील याचा नेम नाहीं या प्रकारावरून दोन गोष्टी सिद्ध होतात. (१) इंग्रज लोकांच्या इजिप्त देशांतील खटपटी फ्रेंच लोकांस पसंत नाहींत व (२) इजिप्तदेश सोडून परत येण्याचें इंग्रजांस आवडत नाहीं. ज्ञा० अं०

हिंदुस्थानांतील लोकांची समाज रचना, धर्म व्यवस्था व राजनीति फार पोक्त आहेत. त्यांत सर्व तऱ्हेच्या लोकांचा समावेश होतो व सर्वांची गरज भागते. कितीही अल्प समजुतीचा मनुष्य असला किंवा त्याच्या निर्वाहाचीं साधनें कितीही थोडीं असलीं तरी त्याचे त्याचे मानानें समजातीय लोक त्यास मिळतात व त्यांशीं मिळून मिसळून जातो व आपल्या आयुष्याचा काल घालविण्याचें त्यास कधींच संकट वाटत नाहीं. आमच्या राष्ट्र बंधनाच्या ज्या निरनिराळ्या दोऱ्या आहेत त्या समाज धर्म व राजनीति यांचेच धोरणावर सर्व तणावलेल्या आहेत, आमचें राष्ट्र फार पुराणें असल्यामुळें राष्ट्र-बंधन-व्यवस्था हलकी ढिली पडून गेली आहे कीं पाहिजे तितक्या खटपटी चालू आहेत तरी परकी तत्वाचें बोट अजून यांतील त्यांत चांगले शिरकत नाहीं. जेव्हां एकदां पुरतेपणीं शिरलें म्हणजे कुजलेला सांधा निखळून जाऊन सर्व राष्ट्राचीं शकलें शकलें होऊन जातील उद्योग परंपरेची व्यवस्था याच नमुन्याचर आहे. एवढेंच नव्हे तर त्या परंपरेतील प्रत्येक धंद्यांत तिचें स्वरूप ठळठळीत नजरेस येतें. शि० क० वि०

भूकंप—नागपूर व वराड टाईम्स वरून कळतें कीं मागील रविवारीं रात्रीचें ११ वाजतां रायपूर, बिलासपूर व राजनांदगांव ह० ठिकाणीं भूकंप झाला. हा कंप पूर्व पश्चिम असून सुमारें पांच सेकंड पर्यंत होत होता. लोकांचें नुकसान वगैरे कांहीं झालें नाहीं. बस्तर संस्थांत ही हा धक्का बसला म्हणून कळतें. सु० सिं०

दुल्लनकोरच्या महाराणानीं प्रिन्स व्हिक्टर यांच्या सन्मानार्थ अर्धा लाख रुपये खर्च केले व आतां असें ठरलें कीं प्रिन्स त्या राजधानीस जात नाहींत. क० ए०

हिंदुस्थानांतील सर्व संस्थानांपैकीं बहुतेक म्हैसूर संस्थानचें काम सुरळीत पणें चाललें आहे पैशाच्या संबंधानें तर तें शिरस्थानीं आहे. गत वर्षी सुमारें १२ लक्ष रुपये शिल्लक होते. न्या० सिं०

बेगारी— जुलूमानें गरीब रयतेच्या गाड्या घोडी अधिकार बळानें पकडून ओझीं वाहण्यास लावण्याची चाल मोडली नाहीं. असें खास वाटतें ज्यास्ती पैदास नाहीं तर नाहीं पण भाड्या ऐवजीं गरीब बिचाऱ्यांस चांगला मार ही मिळतो. गेल्या १९ वे तारखेस पुणेंशहरा सारख्या खुद्द इंग्रजी अंमला खालच्या ठिकाणीं हा दुष्ट प्रकार घडल्याचें 'पुणें वैभव' वरून कळतें तेव्हां अमानी वऱ्हाड प्रांतांत बेगार प्रत्यहीं घरीत असल्याचें नवल तें काय! या संबंधानें एखादा कडक कायदा झाला तर बरें!

देवालयांत भ्रष्टाकार—पुण्यास श्रीपर्वतेश्वराच्या नंदी पर्यंत राजपुत्र व्हिक्टर गेल्यावर त्यांनीं परधर्मी लोकांना कोठपर्यंत जाण्याची मर्यादा आहे म्हणून विचारलें असतां पर्वतीच्या पंचांनीं देवाच्या गाभाऱ्यापर्यंत जाण्यास हरकत नाहीं म्हणून सांगितलें! यांत युरोपियन लोकांचा थोरपणा व आमच्या भेळकीचा लुब्रेपणा चांगला व्यक्त झाला. पु० वै०

DIARY FOR 1890.
सन १८९० सालाकरितां
रोजनिशी.
( पाकेट साईज )

इंग्रजींत इंग्रजी तारीख, व मराठींत तारीख मिती सुद्धां व शिवाय प्रत्येक पेजावर एकेक हाणः प्रत्येक तारखेला एकेक पान.

पाकेट साईज डायरी सन १८९० सालाकरितां चांगल्या भोहरेदार कागदावर छापलेली यांत मुंबई शहरची साधारण माहिती, रेल्वे, तारायन्त्र, पोष्ट, उपनयन व विवाहमुहूर्त, कोर्टखर्चास स्टांप, डिपार्टीस स्टांप वगैरे उपयुक्त माहितीसह पंचांगाचें काम करणारी. किंमत ट. ह. सह १ आणे.

विशेष सूचना— दहा प्रतीस एक प्रत कमिशन व्हाल्युपेबल पार्सल अगर रोख पैसे आले असतां पाठवूं. प्रती आमच्याकडे अगर जि. एम. वाळवेकर आणि कंपनी, बुकसेलर्स व पब्लिशर्स रामवाडी मुंबई यांच्याकडे मिळतील. म्यानेजर सुबोधप्रकाश प्रेस. गिरगांव, मुंबई.

AKOLA MEDICAL SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल.

आम्हीं येथें पेठेंत लोकांच्या सोईकरितां दवाखाना काढिला आहे. येथें सर्व रोगांची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळांतिणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार योग्य काळजीनें करूं. येथें केवळ न किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल्. एम्. ॲन्ड् एस्.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्तशुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टीक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा कलप आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक, दंतशाण, हीं औषधें मिळतील.

हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.